“

प्राचीन भारतीय परंपरेची देण म्हणजे आचार्य पाणिनी होय. पाणिनीय अष्टाध्यायी ही मानवी बुध्दीचा सर्वोत्तम अविष्कार आहे. माहेश्वर सूत्रे, सूत्रात्मकता इत्यादींचा वापर केल्याने त्यांचे व्याकरण विशेष होते. पाणिनीच्या आधीच्या आचार्यांनी प्रत्याहारासाठी वर्णांचा वापर केला नव्हता. पाणिनीने शब्दानुशासन केले.

पाणिनीने सुमारे 4000 सूत्रांत समग्र वांग्मयाला व्याकरणाच्या नियमांमध्ये विश्लेषित केले. त्यांचे व्याकरण वैदिक आणि लौकिक भाषेला विश्लेषित करते. तसेच त्यांचे सिध्दांत जगाच्या प्रकृती प्रत्ययात्मक भाषेला विश्लेषित करू शकतात. आधुनिक भाषाशास्त्राच्या दृष्टीने त्यांचे व्याकरण जनरेटिव्ह अर्थात उत्पादक म्हटले जाऊ शकतो.

या अमूल्य व्याकरणासाठी आपण सर्व त्यांचे सदैव ऋणी राहू.

– प्रो. सत्यपाल सिंग, दिल्ली विद्यापीठ ”

SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)
Nanded, Maharashtra (India)
website : www.wiidrj.com

9 788195 547906

संस्कृत व्याकरणकार
डॉ. प्रशांत बा. बिरादार
SIDDHI PUBLISHING HOUSE

# संस्कृत व्याकरणकार

संपादक
डॉ. प्रशांत बाबुराव बिरादार

# संस्कृत व्याकरणकार
# Sanskrit Vyakarankar

**डॉ. प्रशांत बाबुराव बिरादार**
संस्कृत विभाग प्रमुख
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर
आणि
अध्यक्ष संस्कृत अभ्यास मंडळ,
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

**सिध्दी पब्लिकेशन हाऊस, नांदेड**

**ISBN No. 978-81-955479-0-6**

**संस्कृत व्याकरणकार**

**Sanskrit Vyakarankar**

**संपादक – डॉ. प्रशांत बा. बिरादार**
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर. जि. लातूर
मोबाईल नं. 9764120822

**प्रकाशक**
**सिध्दी पब्लिकेशन हाऊस**
**६२४, बेलानगर, भावसार चौक,**
**तरोडा (खु.) नांदेड ३ ४३१६०५**
**मो. ९६२३९७९०६७**
**www.wiidrj.com**

**मुद्रक**
**अनुपम प्रिंटर्स , श्रीनगर, नांदेड (महा.)**
**९१७५३३२४४३७**

**प्रथमावृत्ती : फेब्रुवारी २०२२**
© **सर्वाधिकार : महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर अधीन**

**मुखपृष्ठ : तेजस रामपूरकर**

**अक्षरजुळवणी : डॉ. राजेश उंबरकर**

**मूल्य : ७५ /-**
या पुस्तकातील कोणताही भाग किंवा मजकूर संपादकाच्या व लेखकाच्या परवानगीशिवाय संदर्भासाठी वापरू नये.

# संपादकीय

संस्कृत व्याकरण जगातील सर्वात प्राचीन व समृद्ध व्याकरण आहे. व्याकरणाच्या अनेक परंपरा भारतात होऊन गेल्या. व्याकरणालाही येथे दैवी कार्य म्हणून त्याची उपासना करण्यात येत असे. व्याकरणाच्या महापुरूषाला भगवान म्हणून सन्मान देण्यात आला. अशा व्याकरणकारांच्या जीवनाचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडावा व त्यांचे अनमोल विचार आत्मसात करावे यासाठी संस्कृत व्याकरणकार नामक पुस्तक प्रकाशित करीत आहोत.

संस्कृतमधील प्रसिद्ध व्याकरणकारांचा परिचय व त्यांची ग्रंथसंपदा मराठी भाषेमध्ये सहज वाचता यावी यासाठी हा अल्पप्रयत्न करण्यात आला आहे. 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड' येथे बी.ए. च्या अभ्यासक्रमामध्ये काही व्याकरणकारांचा समावेश आहे. तेव्हा संस्कृतच्या व इतर वाचकांनाही संस्कृत व्याकरणकार व त्यांच्या ग्रंथसंपदेचा परिचय मराठीभाषेमध्ये या पुस्तकाच्या माध्यमाने होऊ शकतो.

या पुस्तकात व्याकरणकारांचा संक्षीप्त परिचय देण्यात आला आहे. तसेच त्यांच्या साहित्यांचा ही अल्पपरिचय करण्यात आला आहे. परीक्षेसोबतच आपल्या साहित्यातील ज्ञानवर्धनासाठी याचा उपयोग होईल अशी अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांची गरज, मोठ्यांची प्रेरणा आणि मित्रांच्या सहकार्यानं हे पुस्तक प्रकाशित करत आहे. माझे मित्र संस्कृतच्या सर्व प्राध्यापकांनी आपला अनमोल वेळ देऊन व्याकरणकार व त्यांच्या ग्रंथावर गहन चिंतन करून आपले योगदान दिले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. यातील राहिलेल्या उणिवा दाखवून दिल्यास त्या नंतर नक्कीच दूर करण्यात येतील.

पुस्तक लिहण्यास प्रेरणा असणारे आमच्या किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, सचिव, सर्व सन्माननीय सदस्य व महात्मा फुले महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांचा मी ऋणी आहे. तसेच माझे सर्व सहकारी, पुस्तक लिहण्यास व प्रकाशित करण्यास मदत करणारे सिद्धी पब्लिकेशन हाऊस, नांदेड यांचे प्रकाशक डॉ. राजेश उंबरकर सरांचे हार्दिक आभार.

**प्रा. डॉ. प्रशांत बाबुराव बिरादार**
संस्कृत विभाग प्रमुख
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, तथा
अध्यक्ष, संस्कृत अभ्यास मंडळ, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

# प्रस्तावना

व्याकरणाचा अभ्यास सुरू करण्यापूर्वी, त्याच्या पूर्वपरंपरेचे ज्ञान घेणे फार महत्त्वाचे आहे. प्राचीन भारतीय साहित्यातील असाधारण कर्तृत्व पाहता असे दिसते की भारतीय ऋषीमुनींच्या नजरेतून ज्ञान आणि विज्ञानाचे असे कोणतेही क्षेत्र नाहीसे झाले नव्हते. ज्या दिवशी ऋषीमुनींचा मंत्रमुग्ध करणारा आवाज सिंधूच्या काठांवर घुमत होता, त्या काळात जगात इतर कोठेही सभ्यतेचा पहिला किरणही फुटला नव्हता.

व्याकरण—शास्त्र हे भाषा शिक्षणाचे एकमेवाद्वितीय माध्यम आहे. या शास्त्राच्या प्रेमात जगातील कोणताही समाज भारतीयांच्या पुढे जाऊ शकलेला नाही. फार प्राचीन काळापासून भारतीय आर्य आपापल्या देवतांच्या आनंदासाठी सतत नवनवीन स्तोत्रे रचत होते. वेदांचे स्मरण करण्याच्या या प्रक्रियेत लोकांच्या उच्चारात फरक आणि स्वरांच्या चढाईत असमानता आढळून आली, जी आर्यांनी योग्य मानली नाही आणि वेदांच्या शुद्धतेचे रक्षण करण्यासाठी काही नियम केले गेले. ब्राह्मण ग्रंथात अनेक ठिकाणी व्याकरणाच्या पारिभाषिक शब्दांची व्याख्या दिसते. शुक्लयजुर्वेदीय माध्यंदिन वाजसनेयी शाखेच्या शतपथ ब्राह्मणामध्ये एकवचनी आणि अनेकवचन आणि छांदोग्य उपनिषदात वर्ण, उष्णता, स्पर्श इत्यादींचा उल्लेख आहे. सामवेद संहितेच्या स्तोत्रात महर्षींनी पादचुष्टयाचे व्याकरण नमूद करून देवतांची स्तुती केली. 'सर्वे स्वरा ऐंद्रस्यात्मनः' म्हणून व्याकरणाची उत्पत्ती वेदांतील स्वरांच्या उच्चारामुळे झाली. व्याकरणशास्त्राचे मूळ स्वरूप आपल्याला ऋग्वेदाच्या शेवटच्या टप्प्यातच पाहायला मिळते. 'चत्वरी श्रंगा त्रयो अस्य पादा' चा अर्थ नामाख्यातोपसर्गनिपाताः इ. सप्तसिंधवः चा उच्चार सप्तविभक्तयः असा होतो. ब्राह्मण कालखंडातील वेदांवरून पाहिले असता, त्या काळी प्राचीन भाषेशी काहीसा घट्ट संबंध आला होता असे दिसते. नवीन आकार, नवे शब्द इत्यादी दिसू लागले होते. या नव्या भाषेत लोकांनी विचार करायला सुरुवात केली होती, तरीही त्यामागे प्राचीन शब्दांची एक अफाट आणि उदात्त परंपरा कार्यरत होती, दोघांमध्ये काही फरक पाहून व्याकरणाचा जन्म झाला असावा.

पाणिनीच्या पूर्वी, अपिशाली, गार्ग्य इत्यादी भारतीय व्याकरणकारांनी व्याकरणात उत्कृष्टता दाखवली. पाणिनीने व्याकरणाच्या ज्ञानाचा कळस गाठला आहे. आजपर्यंत कुठलेही व्याकरण पाणिनीच्या मर्यादेपर्यंत पोहोचलेले नाही. पाणिनी हे भारतीय व्याकरणातील अग्रगण्य आहेत. त्यांच्या आधीही अनेक व्याकरणकार आले, पण पाणिनीचे महत्त्व त्यांना पटले नाही आणि

कालांतराने त्यांचे नावही लोप पावू लागले. लोकांनी पाणिनीला आद्य व्याकरणकार मानले आहे.

भारतीय व्याकरणाचा इतिहासात पाणिनीच्या आधीही अनेक व्याकरणकार होते त्यांच्यासह आधुनिक व्याकरणकारापर्यंतच्या साहित्यांच्या अभ्यास करून प्रस्तूत पुस्तकाचे संपादक डॉ. प्रशांत बिरादार यांच्या नेतृत्वात सर्व संस्कृतच्या प्राध्यापकांनी हा अनमोल ठेवा विद्यार्थ्यांपुढे व वाचकांपुढे ठेवला आहे. त्यांच्या या कार्याचा खरोखर वाचकांना फायदा होईल यात संशय नाही.

**प्राचार्य डॉ. वसंत बिरादार**
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर
ता. अहमदपूर जि. लातूर

# अनुक्रमणिका


| अ.क्र | नाटके | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | संस्कृत भाषेतील व्याकरण शास्त्र | प्रा. राजेन्द्र प्रसाद किशनराव आर्य | ०७ |
| २ | पाणिनी | प्रा. गणेश पेटकार | १२ |
| ३ | नन्दिकेश्वर | डॉ. शशिकांत दरगु | १७ |
| ४ | कात्यायन | प्रा. शंकर घाडगे | २२ |
| ५ | व्याकरणाचार्य महर्षी पतंजलि | प्रा. अभय पाटील | २९ |
| ६ | पतंजलिकृत महाभाष्य मे पठित संस्कृत व्याकरण के आचार्य | डॉ. अखिलेश शर्मा | ३४ |
| ७ | जयादित्य वामन | प्रा. डॉ. अरूण चव्हाण | ४० |
| ८ | भर्तृहरी जीवन परिचय | प्रा. रमेश रामलिंगी स्वामी | ५० |
| ९ | भर्तृहरी ग्रंथ परिचय | डॉ. गणंजय कहाळेकर | ५६ |
| १० | कैयट | श्रीमती बकुल भगवानराव कांबळे | ६० |
| ११ | भट्टोजीदीक्षित | डॉ. संजिवनी नेरकर | ६७ |
| १२ | आचार्य वरदराज | प्रा. ज्योती मामडगे | ७२ |
| १३ | चंद्रगोमी | डॉ. प्रशांत बिरादार | ७८ |
| १४ | पंडितराज जगन्नाथ | प्रा. पी. बी. गायकवाड | ८२ |

# संस्कृत भाषेतील व्याकरणशास्त्र

**प्रा. राजेन्द्र प्रसाद किशनराव आर्य**
संस्कृत विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर.

व्याकरणशास्त्राची परंपरा खूप प्राचीन काळापासून आहे. या शास्त्राची उत्पत्ती केव्हा झाली याबद्दल विद्वानांमध्ये एकमत नाही. व्याकरणशास्त्राचे जेष्ठ विद्वान पं. युधिष्ठिर मीमांसकजीच्या मतानुससार त्रेता युगाच्या सुरूवातीला व्याकरणशास्त्र ग्रंथरुपात सुव्यवस्थित रुपाने विकसित झाले होते. वेद, ब्राह्मण, उपनिषद्, महाभारत आदी अनेक ग्रंथांमध्ये व्याकरणाचा उल्लेख आढळतो. जसे –

**"सर्वार्थानां व्याकरणात् वैयाकरण उच्यते तन्मूलतो व्याकरण व्याकरोति इति तत्तथा"** महाभारत उद्योग. ४२-६०

**"व्याक्रियन्ते व्युत्पाद्यन्ते शब्दा अनेनेति शब्द ज्ञान जनकं व्याकरणम्"** अर्थात ज्या विद्येने योग्य, शुध्द शब्दाचे ज्ञान होते त्याला व्याकरण म्हणतात.

व्याकरण शास्त्राचे आद्य प्रवक्ता ब्रह्माजी मानले जातात. ब्रह्माजीने हे ज्ञान बृहस्पतीला व त्यांनी इंन्द्राला व्याकरणाचे उपदेश दिले. जसे-

**"ब्रह्मा बृहस्पतये प्रोवाच, बृहस्पतिरिन्द्राय, इन्द्रो भरद्वाजाय, भरद्वाज ऋषिभ्य: ऋषयो ब्राह्मणेभ्यः"**

प्राचीन काळात वेदांच्या अध्ययनास विशेष महत्त्व दिले जात होते. गुरुकुल परंपरेत वेद व इतर धार्मिक ग्रंथांच्या पठनावर जास्त भर दिला जात होता. या वेदांना समजण्यासाठी षड्वेदांग पूरक होते. या वेदांगात शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त छन्द, ज्योतिष यांचा समावेश आहे. या वेदांगात इतर शास्त्रांसोबत व्याकरणदेखील आहे. शब्दांची निर्मिती नाम, आख्यात आदींसाठी व्याकरण खूपच आवश्यक आहे. वेद शास्त्रादींचे अध्ययन करण्यासाठी आचार्य पतंजली मुनींनी असे म्हंटले आहे

की– **"ब्राहमणेन निष्कारणे धर्म: षडंगो वेदोऽध्येयो ज्ञेयश्च"** अर्थात ब्राह्मणाने विनाकारण वेद, षडंग आदींचे अध्ययन व ज्ञान आदी ग्रहण केले पाहिजे.

आचार्य पाणिनीच्या अगोदर ब्रह्म, ऐन्द्र, आपिशल, प्राजापत्य आदी अनेक व्याकरणाचार्य झाले. परन्तु या सर्वांपैकी पाणिनीचे व्याकरण सर्वात लोकप्रिय ठरले. आचार्य पाणिनीने त्यांच्यापूर्वी विखुरलेल्या सामग्रीला योग्य प्रकारे वैज्ञानिक दृष्टीने जोडून एक नवीन ग्रंथ अष्टाध्यायीची रचना केली. हे पुस्तक अशा प्रकारचे आहे की याच्या तोडीचे ग्रंथ दुसऱ्या भाषेत आजदेखील उपलब्ध नाही.

लैलिन ग्राडच्या प्रो. वात्सक्याच्या मतानुसार पाणिनीय व्याकरण हे मानवरचित रचनांपैकी सर्वोत्तम रचना आहे. हे व्याकरण प्राचीन आर्ष वाङ्मयाची अनुपम निधी आहे. हे प्राचीन व अर्वाचीन सम्पूर्ण साहित्याला सूर्याप्रमाणे प्रकाशित करीत आहे. पाणिनीच्या पूर्वी किंवा नंतरचे जे व्याकरणाचे आचार्यगण झाले ते सर्व यांच्यासमोर निष्प्रभ झाले आहेत. त्या सर्व व्याकरणाचार्यांचे केवळ ग्रंथांमध्ये वेग-वेगळया प्रसंगी फक्त नामोल्लेख आढळतो. आचार्य पाणिनीच्यानंतर त्यांचे टीकाकार, भाष्यकार, वार्तिककार व्याकरण जगात प्रसिध्दी प्राप्त करु शकले. अष्टाध्यायी आचार्य पाणिनी, वार्तिककार कात्यायन व सूत्रांवर भाष्य लिहिणारे महाभाष्यकार आचार्य पतंजली हे तिनही मुनी व्याकरण जगतात त्रयमुनी म्हणून सुप्रसिद्ध आहेत. आचार्य पाणिनीने लोकव्यवहारात प्रचलित शब्दांना घेवून आपले व्याकरण बनविले. यांचे उद्देश असे होते की, संस्कृत भाषेत असाधु शब्दांचे प्रचलन थांबविणे, भाषाची अनियमतता आणि असंयमतेला दूर करणे आणि भाषेची एकरुपता कायम ठेवणे. याच कारणामुळे एवढ्या हजारो वर्षानंतरदेखील संस्कृतचे एकच रुप पूर्ण भारतात आम्हाला दिसते. त्याच्यात इतर भाषांप्रमाणे देश, कालानुसार विविधता सापडत नाही.

व्याकरण शब्दाची व्युत्पत्ती या प्रकारे सांगितले जाते **"व्याक्रियन्ते शब्दा अनेनेति व्याकरणम्"** व्याकरणात शब्दांची सुबंत तिङन्त पदांची व्याख्या केली जाते. व्याकरण वेदरूपी पुरुषाचे मुख मानले जाते. **"मुखं व्याकरणं स्मृतम्"** शरीरातील मुखा प्रमाणे वेदांगात वेदांच्या रक्षणासाठी

व्याकरण प्रमुख आहे. ऋग्वेदात व्याकरणाचे रुपक वृषभाशी जोडले गेले आहे. या व्याकरणरुपी वृषभाचे नाम, आख्यात, उपसर्ग, निपात हे चार शिंगे आहेत व तीन काळ भूत, वर्तमान व भविष्य याचे पाय आहेत. सुप् व तिङ् हे दोन डोके आहेत. सात विभक्ती याच्या सोबत आहेत. हा व्याकरणरुपी वृषभ उर, कण्ठ, मस्तक आणि तीन स्थानांनी बांधलेला आहे. व्याकरणामुळे वेद रक्षा होते. नव-नवीन पदांची कल्पना होते. म्हणून आचार्य वररुची म्हणतात की- "ब्राह्मणांनी विनाकारणदेखील व्याकरणाचे अध्ययन केले पाहिजे" व्याकरणामुळे शब्दांची शुध्दता व अशुध्दता समजते.

महाभाष्यकार आचार्य पतंजलीनी व्याकरण अध्ययनाचे मुख्य पाच प्रयोजनांचा व काही अनुषंगिक प्रयोजनांचा उल्लेख केलेला आहे. जसे –

"**रक्षोहागमलघ्वसंदेहाःप्रयोजनम्**" अर्थात **"रक्षार्थं वेदानामध्येयं व्याकरणम्"** अर्थात वेदांच्या रक्षणासाठी व्याकरणाचे अध्ययन आवश्यक आहे. वेद मंत्राच्या उच्चारणासाठी लिंग, काळ आदींचे ज्ञान आवश्यक आहे. वेदांचे काही-काही मंत्र खूप मोठे असतात. त्यांचे उच्चारण करण्याससाठी शब्दांना लहान-लहान विभागात विभाजित करुन त्यांचे उच्चारण केले पाहिजे. स्वर व वर्णांना शुध्द उच्चारले पाहिजे. जसे – "तेऽसुराः तेऽसुरा हेलयो हेलयो इति कुर्वन्तः पराबभूवू" या ठिकाणी राक्षसांनी अशुध्द उच्चारण केल्यामुळे ते पराभूत झाले होते. त्यात काही संशय राहू नये म्हणून व्याकरण ज्ञान आवश्यक आहे. योग्य उच्चारण केल्यामुळे केलेले यज्ञ आदी सार्थक होतात.

आचार्य पतंजलीनी व्याकरण अभ्यासाचे तेरा प्रयोजन मानले आहेत. व्याकरणामुळे शुध्द उच्चारण कळते. जसे- राक्षसांनी अशुध्द उच्चारण हेलेयः हेलयः असे केल्यामुळे ते पराभूत झाले होते. म्हणून शुध्द उच्चारण करण्यासाठी व्याकरण ज्ञान आवश्यक आहे. व्याकरणाचे प्रमुख उद्देश वेद रक्षा आहे. वेदांची रक्षा पद, वर्ण, मात्रांचे योग्य उच्चारण आणि प्रयोगानेच ते शक्य आहे. ब्राह्मणाचे कर्तव्य आहे की वेद रक्षणार्थ वेदांग षडंगांचे अध्ययन केले पाहिजे. या वेदांगात व्याकरण प्रमुख आहे. संस्कृत साहित्य

अपार जलराशी प्रमाणे विशाल आहे. जन्म जन्मांतरात देखील त्याचे पूर्ण ज्ञान होणे शक्य नाही. परन्तु व्याकरणच असा एक लघु उपाय आहे. ज्याच्या मदतीने आम्ही ज्ञानार्जन करु शकतो. वैदिक किंवा लौकिक शब्दांबद्दल उत्पन्न संदेह निवारण फक्त व्याकरणच दूर करू शकतो.

प्राचीन काळी मुलांना म्हटले जात होते की, “हे बाळा! तू काही अभ्यास कर अथवा न कर परंतु व्याकरणाचे अध्ययन अवश्य कर” कारण की याच्या अध्ययनामुळे इतर शास्त्रांची गोडी आपोआपच लागत असते व तो ज्ञानार्जनासाठी प्रवृत्त होत असतो. जसे –

**यद्यपि बहुनाधीषे तथापि पठ पुत्र व्याकरणम्।**
**स्वजन: श्वजनो माभूत् सकलं शकलं सकृच्छकृत॥**

जसे व्याकरण उच्चारणामुळे स्वजन (आपला संबंधी), श्वजन (कुत्रा), सकल – सम्पूर्ण, शकल – (तुकडा), सकृत् – (एकदा), शकृत् – (शेण, कचरा) आदी. अशा प्रकारच्या चूका होवू नये म्हणून व्याकरण आवश्यक आहे.

संस्कृत व्याकरणाश्रित भाषा आहे. संस्कृतात व्याकरण म्हणजे त्याचा पायाच. ते मजबूत करण्यासाठी व्याकरण महत्त्वाचा आहे. कोणत्याही भाषेचे वर्ण, शब्द, वाक्य या तिहींचे निरूपण अत्यावश्यक आहे. संस्कृत व्याकरणात वरील तिहींवर खूपच सूक्ष्मतेने विचार आहे. म्हणून येथे उच्चारण, लेखन आदीवर खूपच गहन चिन्तन आहे. म्हणून हजारो वर्षांनीदेखील व्याकरणाचे महत्त्व कमी झाले नाही. व्याकरणशास्त्राचे जेवढे विस्तृत आणि सूक्ष्म वाचन संस्कृतात झाले तेवढे दुसऱ्या कोणत्याही भाषेत झाले नाही. म्हणून उपर्युक्त गोष्टीसाठी संस्कृत व्याकरणाचे ज्ञान आवश्यक आहे. म्हणून काळाच्या प्रवाहात नंतर–नंतरच्या काळात अनेक कौमुदी ग्रंथांची निर्मिती झाली. जे त्या-त्या काळातील मागणी प्रमाणे रचले गेले. ज्यात प्रामुख्याने सिध्दांतकौमुदी, लघुसिध्दांतकौमुदी काशिका व इतर अनेक ग्रंथांची निर्मिती झाली परन्तु या सर्वांचा मूळ आधार हा पाणिनीचा अष्टाध्यायी हा ग्रंथ आहे.

म्हणून एवढा दीर्घकाळ होवूनदेखील आम्ही संस्कृत व्याकरणाला विसरु शकत नाही. जसे एखादे भवन बांधण्यासाठी पाया मजबूत व नीटनेटका पाहिजे त्याचप्रकारे संस्कृतात गहन ज्ञानासाठी संस्कृत व्याकरण हे अत्यावश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची-

1. संस्कृत व्याकरण शास्त्र का इतिहास, पं. युधिष्ठिर मीमांसक रामलाल कपूर ट्रस्ट, बहालगढ, सोनीपत (हरियाणा) पंचम संस्करण – 1994.
2. संस्कृत व्याकरण एवं लघुसिध्दांत कौमुदी, डॉ. कपिल देव द्विवेदी, विश्व विद्यालय प्रकाशन, चौक वाराणसी, अष्टम संस्करण – 2020.
3. संस्कृत निबंध सुरभि:, ईस्टर्न बुक लिंकर्स – जवाहर नगर, नई दिल्ली प्रथम संस्करण – 1991.

# पाणिनीमुनी यांचा परिचय

## प्रा. पेठकर गणेश कुमार सोपानराव
**संस्कृत विभाग प्रमुख**
**संजीवनी महाविद्यालय, चापोली, ता. चाकूर, जि. लातूर**

**प्रस्तावना-**

आचार्य पाणिनी संस्कृत चे विश्वविख्यात व्याकरण आचार्य मानले जातात. पाणिनी मुनी संस्कृत व्याकरण शास्त्राचे सर्वात प्रतिष्ठित आणि नियामक आचार्य आहेत. संस्कृत भाषा समृद्ध रहावी म्हणून त्यांनी लिहिलेले व्याकरण शास्त्र म्हणजे अष्टाध्यायी यात आठ अध्याय आहेत म्हणून या पुस्तकाचे नाव अष्टाध्यायी असे आहे. हे संस्कृत व्याकरणाचे पुस्तक संस्कृत भाषेला स्थायित्व, समृद्ध आणि सशक्त करणारा सूत्ररूपी हा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा आहे. या व्याकरण शास्त्राला शब्दानुशासन या नावाने पण ओळखले जाते. पाणिनी पूर्वी अनेक व्याकरण आचार्यांनी व्याकरण संबंधित अनेक ग्रंथ लिहिले आहेत याचा उल्लेख स्वतः पाणिनी आपल्या अष्टाध्यायी या ग्रंथांमध्ये त्यांच्या नावाने करतात. या सर्व ग्रंथांच्या शेवटी अष्टाध्यायी हे एक मात्र व्याकरणाचे ग्रंथ आज आपल्यासमोर सुव्यवस्थित आणि सुघटित असे भेटते.

**जन्म आणि जन्मस्थान-**

महर्षी पाणिनीय यांचा जन्म चतुर्थ शतक इसवी पूर्व मानला जातो. पाणिनीच्या पित्याचे नाव पणीन (पनिन: अपत्यं पाणिनी) आहे. अपत्य अर्थामध्ये इनी प्रत्यय करून पाणिनी नाव सिद्ध होते. त्रिकांड शेष कोश यात पाणिनीचे नाव शालातुरीय असे पण आढळून येते. शालातुरो नाम ग्राम:, सोऽभिजनोऽस्यास्तीति शालातुरीयस्तत्रभवान् पाणिनि:। शालातुरीय हे नाव एका गावाचे नाव आहे त्या गावांमध्ये राहणाऱ्या व्यक्तीला शालातुरीय असे इय प्रत्यय करून हे शालातुरीय शब्द सिद्ध होते. शालातूर या नावाने आपल्याला पाणिनीच्या जन्म स्थानाची ओळख होते

जे पश्चिमी पंजाब अटक जिल्ह्यातील सध्याचे लाहोर नावाचे गाव आहे. काबूल नदी आणि सिंधू नदीला जेथे मिळते त्या संगमाच्या काही मैल अंतरावर हे गाव स्थित आहे. पाणिनीचा वैयक्तिक परिचय अत्यल्प आहे. महाभाष्य मध्ये पाणिनीला दाक्षीपुत्र म्हणून संबोधले आहे. या नावाने त्यांच्या आईची ओळख जाणवून येते. ऋग् सर्वानुक्रमणी मध्ये षड गुरुशिष्याने छंदशास्त्र निर्माता आचार्य पिंगल यांना पाणिनीचा अनुज असं म्हंटले आहे. पतंजली यांनी पिंगला ला दाक्षायण असे म्हटले आहे आणि पाणिनीला दाक्षीपुत्र या दोन्ही शब्दांनी परस्परांमध्ये कौटुंबिक संबंध आहे असे दृष्टिगोचर होतं.

**मृत्यू-**

पाणिनीच्या मृत्यू विषयी एक दंतकथा प्रसिद्ध आहे. एकदा पाणिनि एका वृक्षाखाली व्याघ्र या शब्दाची उत्पत्ती कशी झाली. याविषयी विचार करीत बसल्या असताना समोर प्रत्यक्षात वाघ येऊन थांबला पण त्याला पाहून पाणिनी पळून न जाता त्याच्या नावाची उत्पत्ती शोधू लागले वाघाची डरकाळी पाहून त्याने शोध लावला. व्याघ्रियते (डरकाळी फोडतो) म्हणून त्याला व्याघ्र असे म्हटले जाते. या दंतकथेनुसार पाणिनी याला वाघाने मारले असे सिद्ध होत नाही परंतु पंडित विष्णु शर्मा यांनी आपले ग्रंथ पंचतंत्र या पुस्तकामध्ये एक श्लोक रचिला आहे त्यामध्ये पाणी चा मृत्यू व्याघ्रद्वारे झालेला आहे असे ते सांगतात.

**"सिंहो व्याकरणस्य कर्तुरहत्प्राणान् प्रियान् पाणिनेः"**।

**पाणिनीय पंचोपदेश-**

पाणिनी यांनी संस्कृत साहित्यातील सर्वोत्कृष्ट व्याकरणकार म्हणून मान गाजवला. त्यानुसार त्यांची पाच सर्वोत्कृष्ट रचना निम्न आहेत. १. अष्टाध्यायी २. लिंगानुशासन ३. धातु पाठ ४. गणपाठ ५. उणादी कोश .

**अष्टाध्यायी**

महादेवाची घोर उपासना करून महादेवाच्या डमरू ने १४ माहेश्वर सूत्रांची निर्मिती झाली असे काही विद्वान म्हणतात. या माहेश्वर सूत्रांना प्रत्याहार सूत्र म्हणून पण ओळखले जाते.

अष्टाध्यायीला पाणिनी यांनी ८ अध्यायांमध्ये विभाजन केल्यामुळे याचे नाव अष्टाध्यायी असे ठेवले. प्रत्येक अध्यायात ४ पाद असे ३२ पाद आणि एकूण ३९७६ सूत्र आहेत.

यात अनुवृत्ती क्रमाने अध्ययन करण्यासाठी अति उपयुक्त अशी ही पद्धती आहे.

प्रथम अध्यायात यांनी मुख्यतः संज्ञा प्रकरण लिहिले आहे यामध्ये प्रथम पाद संज्ञा प्रकरण स्थानिवत प्रकरण द्वितीय पाद इतसंज्ञा प्रकरण प्रातिपदक प्रकरण असे अनेक संज्ञांचे प्रकरण प्रथम अध्यायात केलेले आहे.

द्वितीय अध्यायात समास प्रकरणाचे विधान आहे यामध्ये प्रथम अव्ययीभाव समास, बहुव्रीहि समास, तत्पुरुष समास, द्वंद्व समास आणि कर्मधारय समास या अध्यायात समासाचे सविस्तर वर्णन उपलब्ध आहे.

तृतीय अध्यायात कृत प्रत्यय जे प्रत्येक शब्दाच्या शेवटी जुडतात आणि शब्द तयार होतो असेही कृत प्रत्ययांचं प्रकरण आहे. (प्रत्यय:, परश्च) या सूत्रांनी शुरू होवून आपल्या समोर व्यावहारिक शब्दांची निर्मिती होते.

चतुर्थ अध्यायात पाणिनी यांनी तद्धित प्रकरणाचे सूत्र येथे मांडले आहेत यात प्रथम स्त्री प्रत्यय टाप, डाप आणि चाप असे आकारांत स्त्री प्रत्येक आणि ईकारांत स्त्री प्रत्ययाचे प्रथम वर्णन करून तदनंतर तद्धित प्रत्यय प्रकरण आहे.

पंचम अध्यायात प्रथम आणि द्वितीय पादामध्ये तद्धित प्रत्यय याचे वर्णन आहेत त्यानंतर तृतीय आणि चतुर्थ पादा मध्ये विभक्ती प्रकरणाचे प्रत्यय आहेत.

षष्ठ अध्यायात प्रत्यय आधारित आगम, आदेश आणि संधी संदर्भातील काही सूत्र या अध्यायात आहेत.

सप्तम आणि अष्टम अध्यायामध्ये विभक्ती साठी उपयुक्त असलेले प्रत्यय, आगम, आदेश आणि संधी यांचा उल्लेख केलेला आहे.

अशाप्रकारे या अष्टाध्यायी ग्रंथामध्ये पाणिनी यांनी संस्कृत भाषेला टिकवून ठेवण्यासाठी केलेला प्रयत्न अतिशय मौल्यवान अतुलनीय आहे.

**धातूपाठ-**

पाणिनीकृत धातु पाठ हा छोटासा ग्रंथ अत्यधिक मौल्यवान आहे. धातु म्हणजे क्रियापद, क्रियापदापासून निर्माण होणारे शब्द माणसांच्या दैनंदिन परस्पर होणारा व्यवहार संबंध त्यामध्ये उपयुक्त असलेले हे शब्द प्रयोग या धातूंपासून नच सिद्ध होतात. मनुष्य जीवन जगण्यासाठी लागणारे शब्द हे क्रिया पासूनच असतात म्हणून या धातू पाठ ग्रंथात अशा क्रियापदांचा साठा दहा गणांमध्ये पाणिनी यांनी केली आहे.

**भ्वादि अदादि जुहोत्यादि दिवादि स्वादि रेव च।**
**तुदादिश्च रुधादिश्च तनक्रयादि चुरादयः।**

संस्कृत भाषा ही जगातील इतर भाषांपेक्षा वेगळी आहे कारण तिचे सर्व शब्द धातूंच्या लहान गटातून (धातुपाठ) घेतले जाऊ शकतात. या गुणवत्तेचे महत्त्व खालील अवतरणातून दिसून येते.

मी धैर्याने सांगू शकतो की इंग्रजी किंवा लॅटिन किंवा ग्रीक भाषेत क्षुल्लक संकल्पना आहेत ज्या संस्कृतच्या मुळांपासून बनवलेल्या शब्दांनी व्यक्त केल्या जाऊ शकत नाहीत. याउलट, माझा असा विश्वास आहे की इंग्रजी शब्दकोशातील संपूर्ण संपत्ती स्पष्ट करण्यासाठी आवश्यक असलेल्या धातूंची संख्या, ज्यामध्ये २५०,००० शब्द असावेत, हे वाजवी मर्यादेत कमी झालेल्या पाणिनी धातूंपेक्षा कमी आहे. इंग्रजीमध्ये असे कोणतेही वाक्य नाही की ज्यामध्ये प्रत्येक शब्द ८०० घटकांशी संबंधित असू शकत नाही आणि पाणिनीने दिलेल्या सामग्रीचे काळजीपूर्वक विश्लेषण केल्यानंतर प्रत्येक कल्पना उर्वरित १२१ मूलभूत संकल्पनांमधून काढली जाऊ शकते.

प्रसिद्ध जर्मन इंडोलॉजिस्ट मॅक्स मुलर (१८२३-१९००), त्याच्या 'सायन्स ऑफ दॅट' या पुस्तकात.

**गणपाठ-**

पाणिनी व्याकरणातील गणपाठाचा अर्थ असा आहे की कोणत्याही बाबतीत एकमेकांशी जुळणारे सर्व शब्द गण किंवा वर्गात टाकावेत. हे विखुरलेल्या शब्द सामग्रीला एका साध्या मांडणीत एकत्रित करते. पाणिनी गणपाठात २६१ गण आहेत. 'गण' म्हणजे समूह. जेव्हा अनेक शब्दांना एकच कार्य करायचे असते, तेव्हा त्यातील पहिला किंवा मुख्य शब्द घेऊन त्यात 'इत्यादि' जोडून काम पूर्ण होते. भावादि गण ( = भू इ. गण ) प्रमाणे.

**उणादिकोष-**

उनादिसूत्राचा म्हणजे जो उण या कृत प्रत्ययाने सुरू होणारा एक सूत्रांची समूह आहे. 'कृवापजिमिसवादिसध्याशुभ्य उन्' हे उनादिचे प्रारंभिक सूत्र आहे. शाकटायन हा उनादि सूत्रांचा कर्ता मानला जातो, परंतु प्राध्यापक काल बाल पाठक यांच्या मते, उनादि सूत्रांचे लेखक शाकटायन नसून स्वतः पाणिनी होते.

उनादिसूत्र ५ पादामध्ये (भाग) विभागलेले आहे. नारायण भट्ट यांच्या मते एकूण उनादिसूत्रांची संख्या ७६५ आहे. ही संख्या श्वेतास्वामींच्या संख्येपेक्षा १२ अधिक आहे. उनादिसूत्रांचे अनेक प्रसिद्ध भाष्यकार झाले आहेत, ज्यामध्ये उज्ज्वलदत्त (त्यांचा काळ सुमारे १२५० इसवी मानला जातो), भोज आणि नारायण भट्ट इत्यादी प्रमुख आहेत. पाणिनीच्या वेळी असलेली उनादिसूत्र आजही काही सुधारित स्वरूपात अस्तित्वात आहे.

**लिंगानुशासन-**

लिडागानुशासन, पाणिनी पंचांग व्याकरणाचा एक भाग आहे. लोकांच्या मते, लिंग (पुरुष, स्त्रीलिंग, नपुंसक) शिस्त लावणाऱ्या शिस्तीला लिंगनुशासन म्हणतात. (लिंगनाम अनुसनम् क्रियातेलेनेति लिंगनुसासनम्) पाणिनी प्रणीत या शास्त्रात संस्कृत भाषेतील शब्दांचा उपदेश करण्यात आला आहे. या शास्त्राचीही सहा अधिकारांमध्ये विभागणी केली आहे. या शास्त्रात एकूण १९१ सूत्रे आहेत.

# आचार्य नन्दिकेश्वर

डॉ. शशिकान्त बसवेश्वर दरगु
संस्कृत विभाग प्रमुख,
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

संस्कृत साहित्य इतिहासातील प्रसिद्ध व्यक्तित्व म्हणजे आचार्य नन्दिकेश्वर हे होय. नन्दिकेश्वर अनेक शास्त्रांमध्ये पारंगत होते. व्याकरण, नाट्यशास्त्र, संगीत, शैवदर्शन, मीमांसा, कामसूत्र आदि शास्त्रावरील त्यांच्या रचना सर्वप्रसिद्ध आहेत. अभिनयदर्पण, भरतार्णव, नन्दिकेश्वरकाशिका व इतर ग्रंथसंपदेवरुन नन्दिकेश्वर हे एक पौराणिक व्यक्तिमत्व होते असे लक्षात येते. तसेच 'लिंगधारणचंद्रिका' या वीरशैवसिद्धांत दर्शन प्रतिपादक ग्रंथात शैवागम, श्रुती व स्मृती साहित्यातील समन्वयदृष्टी पहावयास मिळते. नाट्यशास्त्रात त्यांना भरत यांचा शिक्षक व कामसूत्र ग्रंथात त्यांना कामशास्त्रप्रवक्ता म्हणून संबोधिले आहे.[i]

**संस्कृत साहित्यात नन्दिकेश्वर यांची नावे –**

१ नन्दिकेश्वर,[ii] २ नन्दिकेशान,[iii] ३ नन्दिकेश,[iv] ४ नन्दीश्वर,[v] ५ नन्दीश,[vi] ६ नन्दिन्,[vii] ७ नन्दी,[viii] ८ शैलादि,[ix] ८ नन्दिभरत,[x] ९ तण्डु [xi] याप्रमाणे विविध ग्रंथात नन्दिकेश्वर यांचा नाम उल्लेख आलेला आहे. याविषयी पुराण, नाट्यशास्त्र, संगीतशास्त्र व अन्य ग्रंथात विवरण प्राप्त होते, यावरुन नन्दिकेश्वर शिलादपूत्र, शिवाचे अनन्यभक्त, अन्तेवासी व प्रमुख शिवगण होते.

**आचार्य नन्दिकेश्वर यांचा देश व काल -**

डॉ. मनमोहन घोष यांच्या मते नन्दिकेश्वर हे दाक्षिणात्य होते, कारण दक्षिण भारतात मंदिरामध्ये आजही नन्दीची मूर्ती पाहावयास मिळते व तिचा पूजाही होते. तसेच 'अभिनयदर्पण' व 'भरतार्णव' यांच्या पांडूलिपी दक्षिणभारतात व तेलगु भाषेत प्राप्त आहेत. यावरून असे सिद्ध होते की नन्दिकेश्वर दाक्षिणात्य होते. कालमानाविषयी नाट्यशास्त्र व अर्थशास्त्र यांचा कालखंड इसवीपूर्व पाचवे शतक मानला जातो यावरुन नन्दिकेश्वर यांचा कालावधी इसवी पूर्व पाचवे शतक ते सहावे शतक या दरम्यान किंवा आसपासचा असावा असे मत डॉ. पारससाथ द्विवेदी यांनी मांडले आहे.[xii] तसेच पाणिनी व नन्दिकेश्वर या दोघांनी १४ माहेश्वर सूत्रांना आधारभूत मानून व्याकरणग्रंथ रचना केली, त्यावरून हे दोघेही

इसवी पूर्व सहाव्या शतकात होऊन गेले असावेत, असे मत मांडले आहे.[xiii] तर आधुनिक अन्तःक्षेत्रमाध्यमाद्वारे प्रकाशित कोशात नन्दिकेश्वर यांचा कालखंड इसवी पूर्व २५० वर्ष मानलेला आहे.[xiv]

**आचार्य नन्दिकेश्वर यांच्या रचनाः**

१ नन्दिकेश्वरसंहिता (नंदीश्वरसंहिता), २ अभिनयदर्पण, ३ भरतार्णव, ४ **नन्दिकेश्वर-काशिका**, ५ रुद्रडमरुद्भवसूत्राविवरण, ६ नन्दिभरत, ७ भरतार्थचन्द्रिका, ८ताललक्षण, तालादिलक्षण, तालाभिनय लक्षण, ९ नन्दिकेश्वरतिलक, १० योगतारावली, ११ प्रभाकरविजय, १२ लिंगधारणचंद्रिका

**नन्दिकेश्वरकाशिका**

'नन्दिकेश्वरकाशिका' ही माहेश्वरसूत्रावरील शैवदर्शन प्रतिपादन करणारी प्रमाणित व्याख्या आहे. नन्दिकेश्वरकाशिकेनुसार भगवान शिवांनी सनक, सनन्दन व सनतकुमार या सिद्धांच्या उद्धाराकरीता नृत्यसमयी १४ वेळा डमरू वाजविला. त्यातून १४ सूत्रांचा बोध झाला. व्याख्याकार उपमन्यु यांच्या अनुसार १४ सूत्र डमरूच्या नादातून प्राप्त झाल्यावर त्याचे रहस्य केवळ नन्दिकेश्वर यांना माहित होते म्हणून सर्व मुनींनी नन्दिकेश्वर यांना प्रश्न विचारले. तेव्हा नन्दिकेश्वर यांनी ३६ कारिकांमध्ये १४ माहेश्वरसूत्रांची व्याख्या केली.[xv] तर काही ठिकाणी कारिकांची संख्या २७ अशी नमूद करण्यात आली आहे. नागेशभट्टांनी सुद्धा 'शब्देन्दुशेखर' ग्रंथात नन्दिकेश्वर यांचा उल्लेख 'शिवसूत्रांचे भाष्यकार' असाच केला आहे. आज उपलब्ध व्यांख्यामध्ये शिवसूत्रावरील व्याख्या दार्शनिक दृष्टीने सर्वश्रेष्ठ मानली जाते. उपमन्युने या ग्रंथावर 'तत्त्वविमर्शिणी' नावाची टीका लिहीली आहे.

**नन्दिकेश्वरकाशिका- १४ माहेश्वरसूंत्राचे शैवदर्शनानुसार विवेचन –**

नृत्तावसाने नटराजराजो ननाद ढक्कां नवपंचवारम्।
उद्धर्तुकामः सनकादिसिद्धानेतद्विमर्शे शिवसूत्रजालम्॥ १॥
अत्र सर्वत्र सूत्रेषु अन्त्यवर्णचतुर्दशम्।
धात्वर्थं समुपादिष्टं पाणिन्यादीष्टसिद्धये॥ २॥
**॥ अइउण्॥ १॥**
अकारो ब्रह्मरूपः स्यान्निर्गुणः सर्ववस्तुषु।
चित्कलामिं समाश्रित्य जगद्रूप उणीश्वरः॥ ३॥
अकारः सर्ववर्णाग्र्यः प्रकाशः परमेश्वरः।
आद्यमन्त्येन संयोगादहमित्येव जायते॥ ४॥
सर्वं परात्मकं पूर्वं ज्ञप्तिमात्रमिदं जगत्।

ज्ञप्तेर्बभूव पश्यन्ती मध्यमा वाक ततः स्मृता॥ ५॥
वक्त्रे विशुद्धचक्राख्ये वैखरी सा मता ततः।
सृष्ट्याविर्भावमासाद्य मध्यमा वाक समा मता॥ ६॥
अकारं सन्निधीकृत्य जगतां कारणत्वतः।
इकारः सर्ववर्णानां शक्तित्वात् कारणं गतम्॥ ७॥
जगत् स्रष्टुमभूदिच्छा यदा ह्यासीत्तदाऽभवत्।
कामबीजमिति प्राहुर्मुनयो वेदपारगाः॥ ८॥
अकारो ज्ञप्तिमात्रं स्यादिकारश्चित्कला मता।
उकारो विष्णुरित्याहुर्व्यापकत्वान्महेश्वरः॥ ९॥

**॥ ऋऌक्॥ २॥**

ऋऌक् सर्वेश्वरो मायां मनोवृत्तिमदर्शयत्।
तामेव वृत्तिमाश्रित्य जगद्रूपमजीजनत्॥ १०॥
वृत्तिवृत्तिमतोरत्र भेदलेशो न विद्यते।
चन्द्रचन्द्रिकयोर्यद्वद् यथा वागर्थयोरपि॥ ११॥
स्वेच्छया स्वस्य चिच्छक्तौ विश्वमुन्मीलयत्यसौ।
वर्णानां मध्यमं क्लीबमृऌवर्णद्वयं विदुः॥ १२॥

**॥ एओङ्॥ ३॥**

एओं मायेश्वरात्मैक्यविज्ञानं सर्ववस्तुषु।
साक्षित्वात् सर्वभूतानां स एक इति निश्चितम्॥ १३॥

**॥ ऐऔच्॥ ४॥**

ऐऔच् ब्रह्मस्वरूपः सन् जगत् स्वान्तर्गतं ततः।
इच्छया विस्तरं कर्त्तुमाविरासीन्महामुनिः॥ १४॥

**॥ हयवरट्॥ ५॥**

भूतपंचकमेतस्माद्धयवरणमहेश्वरात्।
व्योमवाय्वम्बुवह्न्याख्यभूतान्यासीत् स एव हि॥ १५॥
हकाराद् व्योमसंज्ञं च यकाराद्वायुरुच्यते।
रकाराद्वह्निस्तोयं तु वकारादिति सैव वाक्॥ १६॥

**॥ लण्॥ ६॥**

आधारभूतं भूतानामन्नादीनां च कारणम्।
अन्नाद्रेतस्ततो जीवः कारणत्वाल्लणीरितम्॥ १७॥

**॥ ञमङणनम्॥ ७॥**

शब्दस्पर्शौ रूपरसगन्धाश्च ञमङणनम्।
व्योमादीनां गुणा ह्येते जानीयात् सर्ववस्तुषु॥ १८॥

**॥ झभञ्॥ ८॥**

वाक्पाणी च झभञासीद्विराड्रूपचिदात्मनः।

सर्वजन्तुषु विज्ञेयं स्थावरादौ न विद्यते॥

वर्गाणां तुर्यवर्णा ये कर्मेन्द्रियमया हि ते॥ १९॥

**॥ घढधष्॥ ९॥**

घढधष् सर्वभूतानां पादपायू उपस्थकः।

कर्मेन्द्रियगणा ह्येते जाता हि परमार्थतः॥ २०॥

**॥ जबगडदश्॥ १०॥**

श्रोत्रत्वंनयनघ्राणजिह्वाधीन्द्रियपंचकम्।

सर्वेषामपि जन्तूनामीरितं जबगडदश्॥ २१॥

**॥ खफछठथचटतव्॥ ११॥**

प्राणादिपंचकं चैव मनो बुद्धिरहंकृतिः।

बभूव कारणत्वेन खफछठथचटतव्॥ २२॥

वर्गद्वितीयवर्णोत्थाः प्राणाद्याः पंच वायवः।

मध्यवर्गत्रयाज्जाता अन्तःकरणवृत्तयः॥ २३॥

**॥ कपय्॥ १२॥**

प्रकृतिं पुरुषंचैव सर्वेषामेव सम्मतम्।

सम्भूतमिति विज्ञेयं कपय् स्यादिति निश्चितम्॥ २४॥

**॥ शषसर्॥ १३॥**

सत्त्वं रजस्तम इति गुणानां त्रितयं पुरा।

समाश्रित्य महादेवः शषसर् क्रीडति प्रभुः॥ २५॥

शकारद्राजसोद्भूतिः षकारात्तामसोद्भवः।

सकारात्सत्त्वसम्भूतिरिति त्रिगुणसम्भवः॥ २६॥

**॥ हल्॥ १४॥**

तत्त्वातीतः परं साक्षी सर्वानुग्रहविग्रहः।

अहमात्मा परो हल् स्यामिति शम्भुस्तिरोदधे॥ २७॥

**॥ इति नन्दिकेश्वरकृता काशिका समाप्ता॥**[xvi]

अशा प्रकारे उपरोक्त प्रतीत २७ कारिकामध्ये नन्दिकेश्वर यांनी १४ माहेश्वरसूत्रांवर शैवसिद्धांत सम्मत विवेचन केलेले आहे. यात शिव-शक्ती, परब्रह्म, आत्मा, प्रकृति, गुणत्रय, पंचप्राण, कोशत्रय, अन्तःकरणचतुष्टय, पंचवायु, पंचप्राण, इंन्द्रिये, विषय, महाभूतादी सर्वांचे विवेचक स्वरूप माहेश्वरसूत्राच्या माध्यमातून नन्दिकेश्वर यांनी स्पष्ट केले आहे. व्याकरण केवळ प्रकृति-प्रत्यय नसून ते एक दर्शन आहे ही अवधारणा रोपित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आचार्य नन्दिकेश्वर यांनी केले आहे.

संस्कृत व्याकरणाच्या मूलस्त्रोताकडे जावयाचे असेल तर 'नन्दिकेश्वर-काशिका' ग्रंथाचे अध्ययन अध्यापन आवश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथ:


1. आचार्य नन्दिकेश्वर और उनका नाट्य साहित्य, डाँ पारसनाथ द्विवेदी, संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी.१९८९
2. भरतार्णव १३७, ६३८, ७०५, ७६४ तथा नन्दिकेश्वरकाशिका उपमन्युकृत टीका, पृ.०१
3. भरतार्णव ६६६, ७६५, ८८९, ९७४
4. भरतार्णव १९३, ७७१, ९२३ तथा नन्दिकेश्वरकाशिका उपमन्युकृत टीका, पृ.०१
5. लिंगपूराण पूर्वार्ध अध्याय ४२-४४ तसेच कूर्मपूराण उत्तरार्ध अध्याय ४३, हरिवंश पुराण १८२।८६ व वाराहपूराण
6. Ibid
7. नाट्यशास्त्र, चौखम्बा प्रकाशन, वाराणसी,३।३, ३।३१
8. लिंगपूराण पूर्वार्ध अध्याय ४२-४४ तसेच कूर्मपूराण उत्तरार्ध अध्याय ४३, हरिवंश पुराण १८२।८६ व वाराहपूराण
9. भरतार्णव ६६०, ७७४, ७८६
10. बृहद्देशी (मतङ्ग) पृ.३२, काव्यमीमांसा (राजशेखर) १।१ संगीतरत्नाकर (शाङ्र्गदेव) १।१७
11. अभिनयदर्पण ४-५ तसेच नाट्यशास्त्र ४ अध्याय.
12. https://www.catawiki.com/en/l/-28669257sculpture--1bronze-nandikeshwara-india-second-half-20th-century
13. आचार्य नन्दिकेश्वर और उनका नाट्य साहित्य, डाँ पारसनाथ द्विवेदी, संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी.१९८९ अध्याय१. पृ. २२
14. Ibid पृ.२९
15. https://hi.wikipedia.org/wiki/नन्दिकेश्वरकाशिका
16. नन्दिकेश्वरकाशिका, पृ.०१
17. https://hi.wikipedia.org/wiki/नन्दिकेश्वरकाशिका

# कात्यायन

## प्रा. शंकर धारबा घाडगे

संस्कृत विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महाविद्यालय
राणीसावरगाव ता.गंगाखेड जि.परभणी

**प्रस्तावना**

कोणत्याही भाषेचे अंग-प्रत्यांग यांचे विश्लेषण व विवेचन जे करते त्याला  व्याकरण असे म्हणतात. व्याकरण ही एक अशी विद्या आहे ज्याच्या द्वारे कोणत्याही भाषेचे लिहिणे, वाचणे व बोलणे यांचे नियम व्याकरणात असतात. भाषेची शुद्धता व सुंदरता टिकून ठेवण्यासाठी व्याकरणाच्या नियमाचे पालन करावे लागते. जसे शरीराच्या अंग-प्रत्यांग यांचे विश्लेषण किंवा विवेचन करण्याचे शरीरशास्त्र, देश-प्रदेश इत्यादी   चे वर्णन करणारे भूगोल असते. त्याचप्रमाणे भाषेचे विवेचन व विश्लेषण करणारे व्याकरण आहे. व्याकरणाला शब्दानुशासन असेसुद्धा म्हटले जाते. अर्थात व्याकरण शब्दासंबंधी अनुशासन करते.

**व्याकरणाची आवश्यकता :**

इ. स. पूर्व साडेचार ते पाच हजार वर्षांपूर्वी वेदांची निर्मिती झाली. संहिता ब्राह्मणे आरण्यके व उपनिषदे असे चतुर्विद वेदांचे स्वरूप आहे. भाषाही स्थळ कालपरत्वे बदलत असते. त्यामुळे प्राचीन भाषा अर्वाचीन काळात क्लिष्ट व दुर्बोध वाटू लागते. या कारणानेच नंतरच्या काळात वेद समजणे कठीण झाले होते. अंधश्रद्धेने केवळ पाठांतर निरुपयोगी असल्याने, प्राचीन भाषेचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून वेदांचा अर्थ लावण्याची गरज भासू लागली. या गरजेतूनच वेदांगाचा जन्म झाला. या सहा विभागांमध्ये व्याकरणाची गणना होते. हे पुढील श्लोकात दिसून येते.

**शिक्षा व्याकरणं छंदो निरुक्ते ज्योतिषं तथा।**

**कल्पश्चेति षड्ंगानि वेदस्याहुर्मनीषिण:॥**

अर्थात शिक्षा, व्याकरण, छंद, निरुक्त, ज्योतिष व कल्प ही सहा वेदांगे आहेत. या सहा वेदांगा मध्ये व्याकरणाचे प्राधान्य सर्वांनी मान्य केले आहे. व्याकरणाविषयी अनेक सूक्ती आढळून येतात. **'मुखं व्याकरणं स्मृतम्'** या पाणिनीय शिक्षणातील कारिका अंशाने सांगितले आहे. ज्याप्रमाणे कोणताही पदार्थ सेवन करावयाचा असेल तर प्रथम तो आपण तोंडात घालतो. वेदार्थ तत्वज्ञान अवगाहन करावयाचे असेल तर त्याची सुरुवात व्याकरणाने करावी लागेल. वेदांगामध्ये व्याकरण हे प्रमुख मानले आहे. **'प्रधानं च षट्सु अंगेषु  व्याकरणं प्रधाने हि कृतो यत्न फलवान् भवति'।** या महाभाष्यातील वचनाने तसेच **'प्रथमं छंदसामङगं प्राहुर्व्याकरणं बुंधा':।** या वाक्यपदीयातील वचनाने, सहा वेदांगामध्ये व्याकरणाचेच प्राधान्य प्रतिपादन केलेले आहे.व्याकरणाध्ययनाशिवाय जगातील कोणताही व्यवहार अशक्य आहे, हे सर्व मान्य आहे.

**व्याकरण संज्ञा आणि स्वरूप:**

'भाषा शिकण्यास व भाषा समजण्यास शब्दांचा योग्य प्रयोग करण्यास उपयुक्त असा मार्ग म्हणजे व्याकरण होय'.वि+आ+कृ यापासून व्याकरण हा शब्द निर्माण झालेला आहे **'व्याक्रियनते विवेच्यन्ते प्रकृतीप्रत्ययादयो यत्र तद् व्याकरणम्'।** ज्यामध्ये शब्दांच्या प्रकृती (मूळ शब्द वा धातू) आणि प्रत्यय इत्यादींचे विवेचन केले जाते. त्याला व्याकरण असे म्हणतात. **'शब्दज्ञानजनकं व्याकरणम्'।** अशी व्याकरणाची दुसरी एक व्याख्या आहे. शब्दांविषयी अधिक ज्ञान निर्माण करणारे ते व्याकरण शास्त्र होय. **व्याकरणाची परंपरा:**

प्राचीन भारतात संस्कृत व्याकरणकरांची परंपरा फार प्राचीन व मोठी आहे. आपणास फक्त अतिप्रसिद्ध पाणिनी व शाकटायनादी व्याकरणकरांची नावेच माहिती आहेत. प्राचीनकाळी व्याकरण आठ प्रकारचे म्हणजे आठ लेखकांनी लिहिलेले आहे. परंतु हे आठ प्रकार कोणते

याबाबत विद्वानांमध्ये एकमत नाही. हैमवद् वृत्यावचूर्णि नामक हैम व्याकरणाच्या टीकेत आठ व्याकरणांची नावे आहेत.

**ब्राह्ममैशानमैन्द्रं च प्राजापत्यं बृहस्पतिम्।**

**त्वाष्ट्रमापिशलं चेति पाणिनीयमथाष्टमम्।**

ब्राह्मा, ईशानकृत, इंद्रकृत, प्रजापतिकृत, बृहस्पतिकृत, त्वष्ट्रकृत, अशापिशल व पाणिनीय अशी आठ व्याकरणे होती. वाल्मीकिरामायणामध्ये मात्र नऊ प्रकारच्या व्याकरणाचा उल्लेख आहे. स्वतः पाणिने देखील अष्टाध्यायीमध्ये गार्ग्य, शाकल शाकटायन इत्यादी दहा वैयाकरणांची नांवे उद्‌धृत केलेली आहेत. परंतु त्यांच्या व्याकरणाचे महत्त्व व लोकप्रियत्व पाणिनीय व्याकरणाइतके नाही. शंभर वर्षापर्यंत पाणिनीय व्याकरणाची पठन व पाठन हे आपल्या मूळ स्वरूपामध्ये अर्थात अष्टाध्यायी सूत्रपाठ क्रमानुसार चालत असे. परंतु जेव्हा संस्कृतची जागा अपभ्रंश भाषांनी घेतली, तसेच संस्कृत केवळ शिष्टलोकांची भाषा राहिली. तेव्हा अध्ययन करणाऱ्यांना सोपे व्हावे, यासाठी सूत्र-पाठ - क्रमाबरोबरच प्रक्रिया-क्रम देखील सुरू झाला. परिणामतः पाणिनीय अष्टाध्यायीच्या सूत्रांच्या आधारावरच प्रक्रियाकौमुदी, प्रक्रियासर्वस्व, सिद्धांतकौमुदी यासारख्या अनेक प्रक्रिया ग्रंथाना पठन व पाठन परंपरेमध्ये स्थान मिळाले. परंतु ज्याप्रमाणे व्याकरणात पाणिनीय व्याकरणाला मूर्धन्य स्थान मिळाले, त्याप्रमाणे प्रक्रिया ग्रंथात सिद्धांतकौमुदीला सर्वोत्तम ग्रंथ म्हणून प्रसिद्धी मिळाली.

सिद्धांतकौमुदीमध्ये अष्टाध्यायीची सर्व सूत्रे संग्रहीत केले आहेत. त्यांच्या अभ्यासात देखील मोठे कष्ट आहेत, असा विचार करून, नंतरच्या काळातील व्याकरण शिकणाऱ्याची गरज व सामर्थ्य मनात ठेवून, वरदराजाने सिद्धांतकौमुदी चा संक्षेप करून मध्यसिद्धांतकौमुदी, लघुसिद्धान्तकौमुदी व सारसिद्धांतकौमुदी हे तीन ग्रंथ निर्माण केले.

पण पाणिनीय व्याकरणासारखे दुसरे व्याकरण अजूनपर्यंत केवळ संस्कृतातच नव्हे तर विश्वातील कोणत्याही भाषेमध्ये निर्माण झालेले नाही. पाणिनीय व्याकरणाची वैज्ञानिकता पाहून आधुनिक भाषाशास्त्रज्ञांनी पाणिनीला सुपरकॉम्प्युटर असे म्हटले आहे. यानंतर वार्तिककार वररुची कात्यायन यांची माहिती पुढील प्रमाणे पाहू.

**कात्यायनाचा काळ:**

कात्यायनाच्या काळा विषयी अनेक विद्वानांमध्ये मतभेद दिसतात. काही विद्वान ई.स.पू २६००ते ई.स.पू. ३०० मानतात तर काही विद्वान ई.स.पू. ५०० ते ई.स.पू.३०० मानतात. अशा अनेक मतभेदावरून विद्वानांनी एक निश्चय करून कात्यायनाचा काळ हा ई.स.पू.२५० निश्चित केल्याचे दिसून येतो.

**कात्यायनाचा जन्मस्थान व अध्ययन:**

विद्वानांच्या विविध मतमतांतरानंतर कात्यायन हे दक्षिण भारतात असल्याचे सिद्ध केले आहे. त्याचबरोबर त्यांचे शिक्षण तक्षशिला विश्वविद्यालयात झाल्याचे दिसून येते. त्यांची माता व गुरु यांचे नाव अज्ञात आहे.

**कात्यायनाची विविध नावे:**

पुरुषोत्तमदेव यांनी आपल्या 'त्रिकांडशेष अभिधान कोष' या ग्रंथात कात्यायनाच्या अनेक नावाचा उल्लेख केलेला आहे. कात्य, पुनर्वसू, मेधाजित आणि वररुची असे होय. कात्य हे नाव गोत्रा संबंधी असून, याचा उल्लेख महाभाष्यात आहे. पुनर्वसू हे नाव नक्षत्रा संबंधी आहे. 'भाषावृत्ती' मध्ये पुनर्वसुला, वररुचीचा पर्याय सांगितला आहे. मेधाजित चा कोठेच उल्लेख सापडत नाही.

'कथासरित्सागर आणि बृहत्कथामंजरी' या ग्रंथात कात्यायन वररुची यांचे अन्य एक नाव 'श्रृतधर' सुद्धा सांगितले आहे. हेमचंद्र व मेदिनी या कोश ग्रंथात कात्यांयनाच्या वररुचीचा नामोल्लेख दिसून येतो.

**अन्य कात्यायन:**

वार्तिककार कात्यायन वररुची आणि प्राकृतप्रकाशकार वररुची असे दोन व्यक्ती आहेत. प्राकृत प्रकाशकार वररुची 'वासवदत्ता' या ग्रंथाचे प्रणेते सुबंधू यांचे मामा असल्याने सहाव्या शतकाच्या हर्ष विक्रमादित्य यांच्या काळातील होते. पाणिनीय सूत्रांच्या वार्तिककारापेक्षा खूप पूर्वी हे होऊन गेले आहेत. प्राकृत प्रकाशकार वररुची यांचा गोत्र कात्यायन होता. या आधारावरून वार्तिककार आणि प्राकृत प्रकाशकार हे दोन्ही व्यक्ती वेगवेगळे असल्याचे दिसून येते. तसेच सम्राट अशोकाच्या लेखातील प्राकृत वररुची यांची प्राकृत स्पष्टपणे नवीन असल्याचे दिसून येते. मद्रासमधून 'चतुर्भाणी' प्रकाशित झाली. त्यामध्ये 'उभयसारिका' नामक भाण वररुचीकृत नाही. कारण की, वार्तिककार वररुची तद्धीतप्रिय या नावाने प्रसिद्ध होते. 'उभयसारिका' या ग्रंथात तद्धितांचा प्रयोग अतिशय अल्प प्रमाणामध्ये होता.

हुयेनत्सांगने, भगवान बुद्ध निर्वाणानंतर तीनशे वर्षांनी पाली वैयाकरण म्हणून ज्या कात्यायनाची, आपल्या भ्रमण वृत्तांतामध्ये चर्चा केलेली आहे. हा कात्यायन सुद्धा वार्तिककारापेक्षा वेगळा आहे. हा कात्यायन एक बौद्ध आचार्य होता. यांनी 'अभिधर्मज्ञानप्रस्थान' नामक ग्रंथाची रचना केली होती. कात्यायन नामक एक प्रधान जैन स्थावर सुद्धा झालेला आहे.

आफरेक्टच्या हस्तलिखित ग्रंथ सुचीमध्ये वररुची आणि कात्यायने यांनी रचलेल्या ग्रंथाची चर्चा केलेली आहे.या ग्रंथामध्ये किती वार्तिककार कात्यायन झालेले आहेत यांचा निर्णय लावणे कठीण आहे.

हेमचंद्र मेदीनी या कोशामध्ये कात्यायनाच्या वररुची नावाचा उल्लेख आहे.

गोमिलपुत्र कात्यायन यांनी 'छंदोपरिशिष्टकर्मप्रदीप' या ग्रंथाची रचना केली आहे. काही विद्वानांनी असा अनुमान केला आहे की,

श्रोतसूत्रकार आणि स्मृती प्रणेता कात्यायन एकच आहेत. पण हा सिद्धांत योग्य वाटत नाही. हरिवंश पुराण या ग्रंथात विश्वामित्र वंशीय 'कति' चे पुत्र कात्यायान गणाचा उल्लेख आहे. कात्यायन गणात वेद शाखेचे प्रवर्तक अनेक व्यक्ती झाले असून, यापैकी एक याज्ञवल्क्य  शुक्ल यजु: अर्थात वाजसनेयी शाखेचे प्रवर्तक आहेत. श्रोत सूत्रकार कात्यायन या वाजसनेयी शाखेचे अनुवर्तक होते. यावरून असे अनुमान काढले जाते की, विश्वमित्र वंशीय यज्ञावलक्याचे अनुवर्त्ती कात्यायन ऋषीच श्रोत सूत्राचे रचनाकार आहेत तर गोमिल पुत्र कात्यायन स्मृतीकार आहेत.

**कात्यायनाची ग्रंथसंपदा :**

वररुची कात्यायन नऊ शुल्बसूत्रांपैकी एका ग्रंथाचे रचनाकार आहेत. वररुची कात्यायनाने 'वेदसर्वानुक्रमणी' आणि 'प्रातिशाख्य' या ग्रंथांची रचना केलेली आहे. कात्यायनांनी रचलेल्या 'भ्राजसंज्ञक' श्लोकांची चर्चा महाभाष्य या ग्रंथात केलेली आहे.कैयट आणि नागेश भट्ट यांच्या मतानुसार भ्राजसंज्ञक श्लोक वार्तिककारांनी रचलेले आहेत.

**वार्तिकांची निर्मिती व महत्त्व :**

व्याकरण मुनित्रयीमध्ये कात्यायनाचा द्वितीय क्रमांक असून, वररुची कात्यायन हे पाणिनीय सूत्राचे प्रसिद्ध वार्तिककार आहेत. वार्तिकाशिवाय पाणिनीय व्याकरण अर्धवट वाटते. विषयक संक्षेप करण्याच्या प्रवृत्तीमुळे शब्दांचे स्पष्टीकरण करण्यास्तव लिहिलेले व्याकरण दुर्बोध वाटू लागली आणि त्यावर अधिकचे स्पष्टीकरण आवश्यक झाले. त्यामुळे पाणिनीच्या अष्टाध्यायी या ग्रंथावर सर्वप्रथम कात्यायनाने वार्तिके लिहून ही अडचण दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. वार्तिकाचे लक्षण याप्रमाणे आहे.

**उक्तानुक्तदुरुक्तानां चिंता यत्र प्रवर्तते I**

**तद् ग्रंथ वार्तिकं प्राहुवार्तिकज्ञा: मनीषिण:l**

ज्या ग्रंथात मुळात सांगितलेला, न सांगितलेला तसेच भलतेच काहीतरी सांगितले असल्यासारखा भासणारा शब्द यासंबंधी सर्व प्रकारचा विचार ज्यांमध्ये केला जातो, त्यास विद्वान लोक **'वार्तिक'** असे म्हणतात.

असे हे वार्तिकाचे लक्षण कात्यायनाने लिहिलेल्या वार्तिकांना पूर्णपणे लागू पडते. त्यांना अनुसरूनच येथे पाणिनीची सूत्र स्पष्ट केली आहेत. कात्यायनांनी पाणिनीच्या अष्टाध्यायातील जवळपास १५०० सूत्रांवर ४००० वार्तिक लिहिले आहेत. अष्टाध्यायीच्या सूत्रामध्ये आवश्यक संशोधन, परिवर्तन व परिवर्धन करण्यासाठी कात्यायनाने जे नियम सांगितले त्यांना वार्तिक असे म्हणतात. कात्यायनाने या सूत्रांचा अनुवर्ती होऊन अर्थ केला आहे. तर्क-वितर्क करून सूत्रांचे संरक्षण केले आहे. परंतु काही ठिकाणी सूत्रांमध्ये परिवर्तन केले आहे. काही ठिकाणी पाणिनीने सूत्रांमध्ये दोष दाखवून प्रतिषेध केला असेल तेथे कात्यानाला परिशिष्ट द्यावे लागले आहेत.

काही काळानंतर कात्यायनाने लिहिलेली वार्तिके पाणिनीची सूत्रे स्पष्ट करण्यास अपुरी वाटू लागली. त्यामुळे पतंजलीने पाणिनी सूत्रांना अनुसरून वार्तिकांच्या समावेश पूर्वक 'महाभाष्य' नामक प्रसिद्धभाष्य ग्रंथ लिहिला आहे.

**सारांश:**

वरीलप्रमाणे कात्यायनाच्या वार्तिकांचा सर्वांगीण दृष्टीने विचारविनिमय केले असता असे दिसून येते की, पाणिनीय अष्टाध्यायीमध्ये ज्या गोष्टी राहिल्या होत्या, त्या स्पष्ट करण्यासाठी कात्यायनाने वार्तिकांची रचना केली आहे. याच वार्तिकांचा आधार घेऊन पतंजलीने महाभाष्य या व्याकरण ग्रंथाची निर्मिती केल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:**

1. युधिष्ठिर मीमांसक, संस्कृत व्याकरण शास्त्र का इतिहास, भारतीय प्राच्यविद्या प्रतिष्ठान अजमेर १९६१
2. उमेशचंद्र पांडे, संस्कृत व्याकरण, चौखंबा विद्याभवन वाराणसी २००२
3. कात्यायनमुनिप्रणित, अल्बेर्तेन वेबर, चौखंबा संस्कृत सीरिज १९७२

# व्याकरणाचार्य महर्षी पतंजली


## प्रा. अभय सखाराम पाटील

संस्कृत विभाग प्रमुख

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव


पतंजली महामुनी हे व्याकरणमहाभाष्याचे कर्ते, योगदर्शनाचे प्रणेते व आयुर्वेदातल्या चरकपरंपरेचे जनक होते. भारतात होवून गेलेल्या अग्रगण्य विद्वानांत पतंजलीचे स्थान आहे. म्हणूनच त्यांना नमन करताना भर्तृहरीने आपल्या वाक्यपदीय ग्रंथाच्या प्रारंभी श्लोक लिहिला.

'योगेनचित्तस्य पदेनवाचा मलं शरीरस्य च वैद्यकेत।

योऽपाकरोत्तं प्रवरं मुनीनां पतंजलीं प्राद्यलिरानतोऽस्मि।

योगाने चित्ताचा, पदाने वाणीचा व वैद्यकाने शरीराचा मल ज्याने दूर केला, त्या मुनिश्रेष्ठ पतंजलीला मी अंजलिबंध करून नमस्कार करतो.

**जीवन परिचय–**

महर्षि पतंजलीचा जन्म ई. स. पूर्व 200 मध्ये झाला. काही विद्वानांच्या मते महर्षि पतंजलीचे जन्मस्थान मध्यप्रदेशाची राजधानी भोपाळजवळ एका छोट्या गावात झाला. पतंजलीस शुंग राजाच्या समकालीन मानले जाते. कारण महर्षि पतंजली शुंग राजाचे राजपुरोहीत होते. काही पौराणिक कथावरून पतंजलीच्या वडिलांचे नाव अंगिरा होते. ऋषी अंगीरास सृष्टीकर्ता ब्रह्माचा पुत्र मानतात. त्यांच्या आईचे नाव 'गोणिका' होते. डॉ. भांडरकर यांनी पतंजलीचा काळ 158 इ. स. पूर्व सांगितला आहे. बोथलिक यांनी पतंजलीचा कालखंड 200 ई. पूर्व तसेच कीथ यांनी त्याचा कालखंड 140 ते 150 इ. स. पूर्व मानतात. गोणार्थ (गोंडा उत्तर प्रदेश) मध्ये झाला.

पंडीत रामचंद्र दीक्षित यांनी 'पतंजली चरित' या नावाचे त्याचे चरित्र लिहीले आहे. त्यात पतंजलीला 'शेषाचा अवतार' मानून त्याविषयी आख्यायिका दिली आहे.

एकदा भगवान श्रीविष्णू शेषशयेवर झोपले असताना शंकराने तांडव नृत्य सुरू केले. विष्णूची निद्रा गाढ नसल्यामुळे साहजिकच त्याचे लक्ष त्या नृत्याकडे गेले. ते नृत्य पाहताना विष्णूला इतका आनंद झाला की, तो त्याच्या देहात मावेना. म्हणून त्याने आपला देह वाढविण्यासाठी सुरूवात केली. विष्णूचा देह वाढताच त्याचा भार शेषाला असह्य झाला. तो आपल्या सहस्त्रमुखांनी फुत्कार टाकू लागला. त्यामुळे लक्ष्मी घाबरली. तिने नृत्य पाहण्यात तल्लीन झालेल्या विष्णूला हालवून जागे केले. तो

जागा होताच साहजिकच त्याचा देह आकुंचित झाला. शेषाने मग निःश्वास सोडला तो विष्णूला म्हणाला 'आज तुम्ही माझी परीक्षा पाहायची ठरवली होती काय?' त्यावर विष्णूने शेषाला शिवाच्या तांडवनृत्याचे कलात्मक श्रेष्ठत्व विशद करून सांगितले. शेष म्हणाला, 'मलाही ते नृत्य एकदा पाहायचे आहे.' त्यावर विष्णूने त्याला सांगितले, 'तू पृथ्वीवर पुन्हा एकदा अवतार घे, म्हणजे त्या अवतारात तुला शिव तांडव पाहता येईल.'

त्याप्रमाणे शेष निघाला व अवतार घेण्यासाठी योग्य ठिकाण शोधू लागला. त्यात गोणिका नावाची स्त्री पुत्रप्राप्तीसाठी तप करीत असलेली त्याला दिसली. शेषाने तिला मनोमन मातृरूपात स्विकारायचे ठरविले. मग ओंजळ भरून सूर्याला अर्घ्य देत असता शेष सूक्ष्म रूपाने तिच्या ओंजळीत पडला. तिने ओंजळीतले पाणी खाली टाकताच तो बालक रूपाने तिच्यासमोर उभा राहिला. गोणिकीने त्याला आपला पुत्र मानून कडेवर उचलून घेतले. ती त्याला म्हणाली, "तू माझ्या ओंजळीतून पतन पावलास म्हणून तुझे नाव पतंजली असे ठेवते"

पतजंली बाल्यावस्थेतच अध्ययन करू लागला. मग तो तपाला बसला, त्याने शिवाला प्रसन्न करून घेतले. शिवाने त्याला चिंदबर क्षेत्री आपले तांडव नृत्य दाखवले मग त्याने त्याला आदेश दिला की, 'तू पदशास्त्रावर भाष्य लिही' त्याप्रमाणे चिदंबर येथेच राहून पतंजलीने पाणिनीची सूत्रे व काव्यायनाची वार्तिके यावर विस्तृत भाष्य लिहीली. ते महाभाष्य नावाने प्रसिद्ध आहे.

**'पातंजलमहाभाष्य चरक प्रतिसंस्कृतैः।**
**मनोवाक्कायदोषोणां दन्त्रेडहिपतये नमः।।**

योगसुत्रे, महाभाष्य आणि चरकसंहितेचे प्रतिसंस्कारण या तीन कृतींनी अनुक्रमे मन, वाणी आणि देह यांच्या दोषांचा निरास करणाऱ्या पतंजलीला माझा नमस्कार असो.

पतंजलींनी व्याकरणमहाभाष्य लिहून तर संस्कृत भाषेला गौरवाच्या शिखरावर नेवून बसवले. संस्कृत आणि अपभ्रंश शब्दांनी सारखाच अर्थ व्यक्त होत असला तरी धार्मिक दृष्ट्या संस्कृत शब्दाचाच उपयोग करावा असे पतंजलीचे म्हणने होते.

पतंजलीच्या महाभाष्याची ख्याती ऐकूण हजारो पंडित पतंजलीकडे अध्ययनासाठी येवू लागले. पतंजली एका पडद्याच्या आड बसून शेषनागाच्या रूपाने एकाच वेळी त्या शत सहस्त्र शिष्यांना शिकवू लागले. त्याने सर्व शिष्यांना अशी आज्ञा दिली होती की, कोणीही पडद्याच्या आत डोकावू नये पण एकाच वेळी इतक्या शिष्यांना एकच मनुष्य वेगवेगळे भाग कसे शिकवू शकतो, याचे कुतूहल जागृत झाले. ते

शमविण्यासाठी त्यांनी एके दिवशी पडदा उघडला. तेव्हा सहस्त्रमुख अशा शेषनागाच्या रूपातून पतंजली सर्वांना अध्यापन करत असल्याचे त्यांना दिसले. पण त्या शेषनागाचे तेज इतके ज्वलंत होते की, त्या तेजाने ते सगळे शिष्य एकदम जळून गेले. जो एकत्र पाणी आणण्यासाठी म्हणून बाहेर गेला होता. तो तेवढा वाचला. पतंजलीने आपले महाभाष्य लायक शिष्यांना शिकवण्याचा आदेश त्याला दिला. मग पतंजली चिंदबर क्षेत्रातून निघाला व गोनई गावी आला. तिथे आपल्या मातेचे दर्शन घेवून तो परत आपल्या शेषरूपात प्रविष्ट झाला.

मौर्य सम्राट बृहद्रथाचा वध करणाऱ्या पुण्यमित्र शुंगचा समकालीन होता. त्या दोघांचा परिचय नव्हे तर परस्पर मित्रभावही असल्याचे पतंजलीच्या महाभाष्यावरून सुचित होते. पतंजलीने व्याकरणाची परीक्षा पाटलीपुत्र नगरात दिली, अशी परंपरा आहे. तेथेच पुण्यमित्र व पतंजली यांची मैत्री झाली असावी. बौद्ध धर्म स्विकारून वैदिक धर्माला विरोध करणाऱ्या मौर्य कुळाचा उच्छेद करून भारतात पुनश्च वैदिक धर्मी राज्याची प्रस्थापना करण्याची योजना त्या दोघांनी तिथेच आखली असावी. पतंजलीच्या संदर्भातील आख्यायिकांची ऐतिहासिक जुळणी करून अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

विष्णूने आपले शरीर फुगवले आणि शेषाला असह्य झाले. याचा सरळ अर्थ असा की पृथ्वीपतीरूपी विष्णूने अर्थात मौर्य सम्राटाने आपल्या अधिकार मर्यादांचे केलेले अतिक्रमण पतंजलीप्रमाणेच मध्य भारतातील सर्व नागकुलोत्पन्नांना असह्य झाले होते. पतंजलीचा आणि नागकुळाचा घनिष्ठ संबंध होता, असे दिसते. कारण पतंजलीला नागाचाच अवतार मानले आहे. या नागांची पुण्यमानव या नावाची एक संघटना पुण्यमित्राच्या नेतृत्वाखाली निर्माण झाली असावी.

### पतंजलीद्वारा रचित ग्रंथसंपदा

भारतीय साहित्यात महर्षि पतंजली द्वारा लिखीत तीन प्रमुख ग्रंथ रचना आहेत. ज्यात 'योगसुत्र, अष्टाध्यायी व भाष्य या सर्वात योगसुत्र सर्वात प्रसिद्ध ग्रंथ होय. योगसुत्राचे भाषांतर विश्वातील  बऱ्याच भाषामध्ये केले आहे. पतंजली यांनी 'महाभाष्य' नावाची पाणिनीच्या अष्ठाध्यायीवर टिका लिहीली. महाभाष्याचा कालखंड 200 इ. स. पूर्व होय.

### महाभाष्य

पाणिनीच्या अष्टाध्यायीतील सूत्रांवरील आणि कात्यायनाने हा सूत्रांवर लिहिलेल्या वार्तिकांवरील आचार्य पतंजलीने चिकित्सक दृष्टीने लिहिलेली टीका म्हणजे महाभाष्य होय. महाभाष्य 'प्रश्नोत्तर' पद्धतीने लिहिले आहे. पाणिनी प्रमाणेच पतंजलीच्या काळाबद्दलही मतभेद आहेत.

त्याचा काळ इ. स. पूर्व १५० असावा असे मानले जाई. परंतु महाभाष्यातील काही उल्लेखांवरून पतंजलीचा काळ इ. स. पूर्व 50 असल्याचे आजच्या काळातील विद्वानांना वाटते.

पुढील उद्देशाने पतंजलीने महाभाष्य लिहिले

1. कात्यायनाच्या नवीन सूचना समाधानकारक नसतील, तेथे त्यांतील दोष दाखवून पाणिनीच्या सूत्रांचे पतंजली समाधान करतो.
2. कात्यायनाने नवीन म्हणून केलेल्या सुधारणा पाणिनीने इतरत्र अप्रत्यक्ष रितीने कशा सूचित केलेल्या आहेत, ते दाखवून कात्यायनाचे बदल अनावश्यक असल्याचे दाखविणे.
3. ज्या महत्त्वाच्या सूत्रांवर कात्यायनाची टीका उपलब्ध नसेल, तेथे चिकित्सक पद्धतीने सूत्रांचे स्पष्टीकरणे करणे.
4. जे प्रयोग पाणिनीच्या सूत्रांनी सिद्ध होत नसतील, त्यांना चरितार्थ (योग्य, सफल, सार्थ) करण्यासाठी स्वतःची भर घालणे.

पाणिनीवर पतंजलीची अपार श्रद्धा होती. त्याचा उल्लेख करताना प्रत्येक वेळी भगवान, आचार्य, मांगलिक किंवा सुहृद असे कोणते तरी विशेषण लावूनच तो पाणिनीचा आदरपूर्वक उल्लेख करतो. पतंजली आपल्या शिष्यांना अष्टाध्यायी शिकवित असताना त्यांतील काही सूत्रांचे सविस्तर समीक्षण करीत असे आणि ते आह्निक रूपात (एका दिवसात रचलेला ग्रंथभाग) लिहून ठेवीत असे. याचाच अर्थ असा की, महाभाष्यातील पंचाऐंशी आह्निके म्हणजे त्याने विद्यार्थ्यांना शिकविलेले पंचाऐंशी दिवसांचे पाठ होत.

पाणिनीचे कट्टर समर्थन करणाऱ्या पतंजलीने त्याची सूत्रे वेदवाक्यांप्रमाणे मानली आहेत. त्याने अष्टाध्यायीतील एकूण सूत्रांपैकी 1689 सूत्रांवर भाष्य लिहिले असून, उरलेली सूत्रे जशीच्या तशी महाभाष्यात घेतली आहेत. त्यांपैकी 1228 सूत्रांवर केवळ कात्यायनाची आणि सव्वीस सूत्रांवर इतर आचार्यांचीही टीका होती, त्यांचे परीक्षण केले आणि वार्तिके उपलब्ध नसलेल्या 435 सूत्रांवर भाष्य लिहिले.

महाभाष्याची रचनाशैली न्यायघटित भाषेत असून ती सुबोध आहे. जिवंत संस्कृत गद्याचा नमुना म्हणून महाभाष्याची ख्याती आहे. क्लिष्ट शास्त्रीय सिद्धांतांची उकल सोप्या, व्यावहारिक दृष्टांतांनी करण्याची लकब ह्या पाहण्यास मिळते. महाभाष्यातील उपमा, न्याय, दृष्टांत व सुभाषितेही समर्पक व लोक व्यवहारातील आहेत. उदाहरणार्थ–

**व्यंजनानि पुनर्नट भार्यावद् भवन्ति।**
**तद्यया नटानां स्त्रियो रङ्गगा यो यः पृच्छति**
**कस्य यूयं कस्य यूयं तं तं तव तव इत्याहुः।**

**अर्थ**–व्यंजने ही नटांच्या बायकांप्रमाणे असतात. (कसे ते पहा) रंगमंचावरील नटांच्या बायकांना जो जो कोण विचारतो की, तुम्ही कोणाच्या? तुम्ही कोणाच्या? आम्ही तुझ्याच' असे उत्तर देतात.

अनेक ठिकाणी आपल्या म्हणण्याला पुष्टी देण्यासाठी त्याने समर्पक वाक्यप्रचारांचा उपयोग केला आहे. उदाहरणार्थं 'न हि भिक्षुकाः सन्तीति स्थाल्यो नाधिश्रीयन्ते '=' याचक आहेत म्हणून कोणी स्वयंपाक करायचा थांबत नाही.' 'पर्याप्तो हयेकः पुलाकः स्थाल्या निदर्शनाय' = 'शितावरून भाताची परीक्षा.'

पतंजलीने अनेक सारगर्भ शब्द वापरले आहेत. एका वाक्याचा मजकूर त्याने काही ठिकाणी एका शब्दात आणला आहे. उदाहरणार्थ– 'उष्ट्रासिकाः' = 'उंटाप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारांनी बसणे', 'वहंलिट' = 'चालता चालता शेत खाणारा पशू' इत्यादी.

महाभाष्याच्या प्रारंभी शब्दाची परिभाषा देताना त्याने सांगितले आहे की, ज्या ध्वनीमुळे पदार्थांचे ज्ञान होते, त्याला व्यवहारात शब्द असे म्हणतात. ध्वनी म्हणजेच शब्द शब्द हा नित्य असून, त्याचाच अर्थबोध होतो. नित्य शब्दालाच स्फोट अशी संज्ञा आहे. स्फोटाची उत्पत्ती होत नाही व म्हणून नाशही होत नाही. बोलताना ध्वनीच्याद्वारे नित्य स्फोटरूपी शब्दांचा आविष्कार तेवढा होतो आणि तोच श्रोत्याला अर्थबोध करून देतो. या दृष्टीने शब्दाचे नित्य व कार्य कार्य असे दोन भेद होतात. स्फोटरूपी शब्द नित्य व ध्वनिरूपी किंवा उत्पाद्य असतात. पतंजलीने शब्दांच्या दोन स्वरूपांचा स्वीकार केला असून, शब्द आणि अर्थ यांचा संबंध नित्य मानला आहे. तसेच त्याने पदाचे गुण, क्रिया, आकृती व द्रव्य असे चार अर्थ मानले आहेत. वरील उदाहरणांवरूनआपल्या असे लक्षात येईल की, पतंजलीने विनोद आणि गंभीरता यांचा संगम, समयोचित लौकिक दृष्टांत देऊन विषय प्रतिपादनात जिवंतपणा आणला आहे. संस्कृत व्याकरणाच्या इतिहासात ह्या ग्रंथाला महत्त्वाचे स्थान आहेच; परंतु त्यात तत्कालीन रीतिरिवाज, कलाकौशल्य, धर्म लोकांची राहणी इत्यादी बाबींची माहितीही अनुषंगाने आली आहे . म्हणून ऐतिहासिक दृष्ट्याही महाभाष्याचे महत्त्व विशेष आहे. आपली अद्वितीय प्रतिभा आणि विद्वत्ता यांच्यामुळे पतंजलीला आचार्य परंपरेत मानाचे स्थान मिळाले. व्याकरणशास्त्रात महाभाष्यातील शब्द प्रमाण मानला जाऊ लागला. एवढेच नव्हे तर महाभाष्याला विरोधी आणि महाभाष्यात न सांगितलेले वचन अप्रमाण मानले जाऊ लागले. व्याकरणशास्त्राला त्याने दर्शनाच्या पदवीला नेऊन पोहोचवले. ही त्याची असामान्य कामगिरी मानावी लागेल.

ह्या ग्रंथावर अनेक टीका लिहिल्या गेल्या. तथापि त्यांतील तीन विशेष प्रसिद्ध आहेत.

1. भर्तृहरिकृत महाभाष्यदीपिका किंवा त्रिपदी (इ. स. चवथे शतक)
2. कैयटचा प्रदीप (अकरावे शतक)

**3-** नागेशाचा उद्योग (अठरावे शतक)

# पतंजलि कृत महाभाष्य मे पठित संस्कृत व्याकरण के आचार्य

डॉ. अखिलेश अ. शर्मा
संस्कृत विभाग
मूलजी जेठा महाविद्यालय जलगांव

संस्कृत भाषा एवं व्याकरण की परम्परा को यद्यपि हम किसी काल गणना मे नहीं बांध सकते है,इसीलिए कुछ विद्वान इसे अनादि भी कहते है । पुनरपि आधुनिक व्याकरण काल को लगभग ढाई हजार वर्ष पुराना माना जाता है । महर्षि पाणिनी लिखित अष्टाध्यायी एवं पतंजलि कृत महाभाष्य इसके अन्यतम उदाहरण है। इतिहास के रूप मे भी हमे बहुत हि कम व्याकरण के आचार्यों के विषय मे पता है परंतु आचार्य पतंजलि ने अपने महाभाष्य आदि ग्रन्थ तथा अन्य आचार्यों ने भी यत्र तत्र संस्कृत व्याकरण के जिन महान् आचार्यों का स्मरण किया है हम उन्हें यहाँ संक्षेप से दर्शाते हैं -----

१) बृहस्पति :- आचार्य बृहस्पति का नाम महाभाष्य के पस्पशाह्निक में इति इस रूप में प्राप्त होता है- "बृहस्पतिरिन्द्राय दिव्यम्" । ऋक् तन्त्रकार भी ऋकतन्त्र - १४ में कहते हैं "ब्रह्मा बृहस्पतये प्रोवाच बृहस्पतिः इन्द्राय"।

२) इन्द्र:- इन्द्र व्याकरण शास्त्र के प्रथम संस्कर्ता हैं। पतञ्जलि ने पस्पशाह्निक में कहा है –"बृहस्पतिश्च प्रवक्ता इन्द्रश्चाध्येता" इन्द्र ने सूत्रात्मक संस्कृतव्याकरण रचा था और प्रकृति प्रत्यय विभाग द्वारा उन्होंने प्रक्रिया नयी प्रकल्पित की थी। तैत्तिरीय संहिता (६-४-७) में भी कहा है– "वाग्वै पराच्यकृतावदत् ते देवा इन्द्रमब्रुवन् इमां नो वाचं व्याकुर्विति तामिन्द्रो मध्यतोऽवक्रम्य व्याकरोत् ।

३) भागुरि - महाभाष्य ७-३-४५ सूत्र में भागुरि का नाम इस प्रकार प्राप्त होता है - "वर्णिका भागुरी लोकायतस्य वर्तिका भागुरि लोकायतस्य"। परन्तु आचार्य कैय्यट के मत में तो भागुरी टीका विशेष है- "भागुरी टीका

विशेषः”। भागुरी व्याकरण विषयक न्यासकार का प्रमाण काशिकावृत्ति न्यास (६-२–३७) में प्राप्त है- वष्टि भागुरिरल्लोपमवाप्योरुपसर्गयोः।
४) पौष्करसादि :- इनका नाम पाणिनि सूत्र में तो प्राप्त नहीं होता है। पर महाभाष्य में ८-४-४८ सूत्र के वार्तिक "चयो द्वितीयाः शरि पौष्करसादेः” में आचार्य पौष्करसादि का स्मरण पतञ्जलि स्पष्ट रूप से करते हैं।
५) चारायण :- ये संस्कृत व्याकरण शास्त्र के प्रवक्ता थे इस विषय में कोई स्पष्ट प्रमाण तो प्राप्त नहीं होता है परन्तु महाभाष्य (१–१–७३) में • पतञ्जलि पाणिनि और रौदि के साथ-साथ चारायण का स्मरण भी करते हैं। इससे प्रतीत होता है कि चारायण भी व्याकरण के प्रवक्ता थे कैय्यट ने भी कहा है-“कम्बलप्रियस्य चारायणस्य शिष्या इति (कम्बलचारायणीयाः, ओदनपाणिनीयाः, घृतरौढीयाः)।
६) काशकृत्स्न :- ये पाणिनि शब्दानुशासन के प्रसिद्ध आचार्य हैं। महाभाष्यपस्पशाह्निक में काशकृत्स्न शब्दानुसाशन का उल्लेख प्राप्त होता है। जैसे- पाणिनिनाप्रोक्तं पाणिनीयम्, आपिशलम्, काशकृत्स्नमिति। कवि कल्पद्रुम ग्रन्थ में बोपदेव ने भी आठ वैयाकरणों में काशकृत्स्न का स्मरण किया है.

इन्द्रश्चन्द्रः काशकृत्स्नापिशली शाकटायनः।
पाणिन्यमरजैनेन्द्रा जयन्त्यष्टादिशाब्दिकाः॥

७) रौढि :- आचार्य रौढि का स्मरण काशिकाकार (६-२-३६) में इस प्रकार करते हैं – “आपिशलपाणिनीयाः, पाणिनीयरौढीयाः, रौढीयकाशकृत्स्नाः” इन उदाहरणों में प्राप्त आपिशल, पाणिनि, काशकृत्स्न सभी व्याकरण के आचार्य हैं। इसलिए इनके साथ में स्मृत आचार्य रौढि भी वैयाकरण हैं।
महाभाष्य (१–१–७३) सूत्र में "घृतरौढीयाः" उदाहरण प्राप्त होता है। महाभाष्य के (४–१७६) सूत्र में भी कहा है "सिद्धां तु रौढयादिषूपसंख्यानात्"। काशिकाकार ने स्वीकार किया है - "घृत प्रधानो रौढिः तस्य छात्राः घृतरौढीयाः”।
८) गौतम :- महाभाष्य (६-२-३६) में गौतम का स्मरण किया गया है। “आपिशल पाणिनीयव्याडीयगौतमीयाः"। इसमें से प्रारम्भ के तीनों

वैयाकरण हैं तो उनके साथ उच्चारित होने से गौतम भी व्याकरण के आचार्य ही हैं। तैत्तरीयप्रातिशाख्य में भी गौतम का नामोल्लेख प्राप्त होता है- प्रथमपूर्वो हकारश्चतुर्थस्तस्य संस्थानं
प्लाशिकौण्डिन्यगौतमपौष्करसादीनाम्" ।

६) व्याडि:- पुरुषोत्तमदेव ने भाषावृत्ति (६-१७७) में गालव के साथ व्याडि का मत इस रूप में उल्लिखित किया है - "इकां यण्व्यवधानं व्याडिगालवयोरिति वक्तव्यम्" महाभाष्य में भी स्थान स्थान पर व्याडि का स्मरण है। जैसे आपिशल पाणिनीयव्याडीयगौतमीयाः (६-२-३६) । व्याडि का ही दूसरा नाम दाक्षायण है। महाभाष्य (२-३-६६) में कहा है "शोभना खलु दाक्षायणस्य संग्रहस्मृतिः" पतञ्जलि संग्रहग्रन्थ का रचनाकार व्याडि को ही स्वीकार करते हैं।

१०) आपिशलि :- आचार्य आपिशलि का उल्लेख अष्टध्यायी के "वा सुप्यापिशलेः (६-१–६२) में हुआ है। पतञ्जलि ने भी ४-२-४५ सूत्र में आपिशलि के मत को इस रूप में उद्‌धृत किया है एवञ्च कृत्वाऽपिशलेराचार्यस्य विधिरुपपन्नो भवतीति ।

भाष्यकार (४-१-१४) सूत्र में भी कहते हैं"आपिशलमधीते ब्राह्मणी आपिशला ब्राह्मणी" आपिशलि का व्याकरण बहुत प्रसिद्ध है उस समय उसका अध्ययन स्त्रियाँ भी करती थी। आपिशल व्याकरण के बहुत से सूत्र अभी भी प्राप्त होते हैं।

११) काश्यप :- अष्टाध्यायी में आचार्य काश्यप का मत दो बार उद्‌धृत है- तृषिमृषि कृषेः काश्यपस्य (१-२-२५). नोदात्तस्वरितोदयमगार्ग्यकाश्यप गालवानाम् (८-४-६६)। वार्तिककार ने भी (४-२-६६) में काश्यप का उल्लेख निम्न रुप से किया है- "काश्यपकौशिकग्रहणं च कल्पे नियमार्थम्"। भाष्यकार ने भी "काश्पकौशिकाभ्यामेवेनिः कल्पे तद्विषयो भवति, नान्येभ्यः" कहकर काश्यपाचार्य का स्मरण किया है। पर इनके व्याकरण के सूत्र उपलब्ध नहीं होते हैं।

१२) गालव:- आचार्य गालव का अष्टाध्यायी में निम्न चार स्थानों पर उल्लेख प्राप्त होता है – १. इको ह्रस्वोऽङ्यो गालवस्य (६–३–६०)। २.

तृतीयादिषु भाषित - पुंस्कंपुंवद् गालवस्य (७–१–७४) । ३. अङ् गार्ग्यगालवयोः (७-३-६६) । ४.

नोदात्तस्वरितोदयमगार्ग्यकाश्यपगालवानाम् (८-४-६६)। भाष्यकार ने ७-३-६६ व ८-४-६६ सूत्र की व्याख्या नहीं की है, पर ६-३-६० व ७-१-७४ सूत्र पर गालव के मत की समीक्षा की है।

१३) गार्ग्यः- अष्टाध्यायी में पाणिनि गार्ग्य का स्मरण तीन स्थानों पर करते हैं-१. अड़गार्ग्यगालवयोः (७–३–६६) । २. ओतो गार्ग्यस्य (८-३-२०) । ३. नोदात्त स्वरितोदयमगार्ग्यकाश्यपगालवानाम् (८–४–६६)।
की ही व्याख्या की है। पर भाष्य में गार्ग्य शब्द का उल्लेख बहुत स्थानों पर भाष्यकार ने उपरोक्त तीनों सूत्रों में से "ओतो गार्ग्यस्य" (८-३-२०) सूत्र किया गया है।

१४) चाक्रवर्मण:- चाक्रवर्मण का उल्लेख अष्टाध्यायी के "ई३ चाक्रवर्मणस्य" (६–१–१२६) सूत्र में हुआ है। साथ ही उणादिसूत्र (३-१४४) में "कपश्चाक्रवमर्णस्य" रूप से चाक्रवर्मण का उल्लेख आया है।

१५) भारद्वाज :- भारद्वाज का वर्णन अष्टाध्यायी में "ऋतो भारद्वाजस्य" (७-२-६३) सूत्र के व्याख्यान अवसर पर पतञ्जलि ने भारद्वाज मत की समीक्षा की है। “कृकर्णपर्णाद् भारद्वाजे" (४-२-१४५) सूत्र में भारद्वाज शब्द देश के लिये ही है और काशिका में गोत्र लिए भी प्रयुक्त है। महाभाष्य में निम्न स्थानों पर भारद्वाजीय वार्तिकों का उल्लेख प्राप्त होता है। जैसे-१-१-२० व ५६ में। १-२-२२ में। १-३-६७ में ३-१-३८, ४८ में ४-१७६ में। ६-४-४७ व १५५ में कात्यायन के वार्तिकों के साथ भारद्वाज के वार्तिकों की समानता देखी जाती है। जैसे- कात्यायन - घुसंज्ञायां प्रकृतिग्रहणं शिदर्थम्। भारद्वाज- घुसंज्ञायां प्रकृतिग्रहणं शिविकृतार्थम् ।

१६) शाकटायन :- आचार्य शाकटायन का उल्लेख अष्टाध्यायी में तीन बार प्राप्त होता है - १. लङः शाकटायनस्यैव (३–४–१११) २. व्योर्लघु प्रयत्नतरः शाकटायनस्य (८-३-१८) । ३. त्रिप्रभृतिषु शाकटायनस्य (८-४-४६) । निरुक्त (१-१२) में भी शाकटायन का मत उद्धृत है। पतञ्जलि ने (३–२–११५) व (३-३-१) में शाकटायनाचार्य का स्मरण किया हैं।

१७) शाकल्य :- अष्टाध्यायी में शाकल्य को निम्न चार स्थानों में स्मरण किया गया है - १. सम्बुद्धौ शाकल्यस्येतावनर्षे (१-१-१६)। २. इकोऽसवर्णे शाकल्यस्य ह्रस्वश्च (६-१-१२७)। ३. लोपः शाकल्यस्य (८-३-१६)। ४. सर्वत्र शाकल्यस्य (८-४-५०)।

पतञ्जलि ने उपरोक्त सूत्रों में से (६-१-१२७) सूत्र की व्याख्या की है और उसमें शाकल्य के मत में समास का प्रतिषेध दर्शाया है। और उन ऊँ सूत्र के व्याख्यान के अवसर पर शाकल्य को याद किया है। इस प्रकार भाष्यकार ने दो बार शाकल्य का स्मरण किया है।

१८) स्फोटायन:- "आवस्फोटायनस्य" (६-१-१२३) सूत्र के व्याख्यान अवसर पर पतञ्जलि ने स्फोटायनाचार्य का मत स्थापित किया है। पदमञ्जरीकार ने भी लिखा है- ''स्फोटोऽयनं परायणं यस्य स्फोटायनः= स्फोटप्रतिपादनपरो वैयाकरणाचार्यः"।

१६) पाणिनि/दाक्षीपुत्र :- भाष्यकार ने पाणिनि का बहुत स्थानों पर स्मरण किया है। (१–१–२०) में भाष्यकार कहते हैं "सर्वे सर्वपदादेशा दाक्षी पुत्रस्य पाणिनेः"। पाणिनि को भाष्यकार भगवत शब्द से सम्बोधित करते हैं- "कथं पुनरिदं भगवतः पाणिनेराचार्यस्य लक्षणं प्रवृत्तम्। एकशेषनिर्देशाद्वा स्वरभिन्नानां भगवतः पाणिनेराचार्यस्य सिद्धम्"।

२०) कात्यायन / कात्यः- यह वार्तिककार हैं। यद्यपि पाणिनि व्याकरण पर बहुत से वार्तिककारों ने वार्तिक रचे है पर कात्यायन उनमें सबसे प्रसिद्ध हैं। भाष्य में भी "न स्मपुराद्यतन इति ब्रुवत कात्यायनेनेह किं वार्तिकारः प्रतिषेधेन करोति (३-२-११८) व सिध्यत्येवं यत्त्विदं वार्त्तिककारः पठति (७–११) इन दो अवसरों पर कात्यायन का स्मरण किया गया है। (३-२-३) में भाष्यकार कात्यायन को कात्यः नाम से सम्बोधित करते हैं- "प्रोवाच भगवान् कात्यः"। इन्हीं का दूसरा नाम वररुचि है। यथा- १. पुनर्वसु वररुचि, २. मेघाचित् कात्यायनश्च सः पुनर्वसुर्वररुचिः"। भाष्य (४–३–१०१) में "वाररुचं काव्यमिति' ऐसा कहा है अर्थात् जो काव्यकार वररुचि हैं। वही वार्तिककार कात्यायन हैं।

२१) कोष्टा:- अष्टाध्यायी (१-१-३) सूत्र के भाष्य में एक स्थान पर आचार्य कोष्टा का वार्त्तिक उपलब्ध होता है। (क्रोष्ट्रीयाः पठन्ति ) ।

२२) सुनाग:- महाभाष्य के निम्न स्थलों पर सौनाग वार्तिक का उल्लेख मिलता है- २-२-१८ में। ३-२-५६ में। ४-१-७४ व ८७ में। ४-३-१५५ में। ६-३-४३ में। इसके रचयिता सुनाग थे। "सुनागस्यचार्यस्य शिष्याः सौनागाः"। सौनाग वार्तिक विस्तृत हैं इनके मत का महाभाष्यदीपिका, काशिका, भाषावृति, धातुवृत्ति, त्रिपादीटीका आदि ग्रन्थों में वर्णन पाया जाता है।

२३) वाडव :- अष्टाध्यायी (८-२–१०६) सूत्र के भाष्य में भाष्यकार कहते हैं- "अनिष्टज्ञो वाडवः पठति" इसके व्याख्यान के अवसर पर उद्योत में नागेश कहते हैं- सिद्धं त्विदु तोरिति वार्त्तिक वाडवस्य ।

२४) कुणरवाडव :- भाष्यकार ने महाभाष्य (३-२-१४) व (७–३-१) सूत्र में कुणरवाडव का मत उद्धृत किया है और भी भाष्यकार ने कहा है - पदेषु पदैकदेशान् इति नियमात् कुणरवादवोऽपि भवितुमर्हति ।

२५) वैयाघ्रपाद्य :- आचार्य वैयाघ्रपाद्य का नाम भाष्य में बहुत जगह उदाहरण रुप में प्राप्त होता है।

२६) सौर्य भगवान् :- अष्टध्यायी (८-२-१०६) सूत्र में "तत्र सौर्यभगवता उक्तम् अनिष्टज्ञो वाडवः पठति।" रूप से सौर्य भगवान का उल्लेख प्राप्त होता है कैय्यट के अनुसार सौर्य नगर के निवासी वैयाकरण सौर्य है। "सौर्य नाम नगरं तत्रत्येनाचार्येणदमुक्तम्" ।

इनके अतिरिक्त महाभाष्य में गोनदर्दीय का उल्लेख (१-१-२१) में। (१-१-२६) में व अन्य स्थलों में भी प्राप्त होता है तथा गोणिकापुत्र का (१-४-५१) में। यह दोनों नाम पतञ्जलि के हैं एवं भवन्तः इस पद से आचार्य किसी अन्य आचार्य का स्मरण करते हैं।

महाभाष्य में अन्ये, अपरे आदि शब्दों के द्वारा अनेक आचार्यों के मत उद्धृत हैं।

संदर्भ -


1. महाभाष्य – पतंजलि, व्याख्याकार –चारुदेव शास्त्री, चौखंभा प्रकाशन, वाराणसी

# काशिकाकार जयादित्य व वामन

प्रा. डॉ. अरुण चव्हाण
कै. लक्ष्मीबाई देशमुख
महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ जिल्हा - बीड

अलौकिक साहित्याची निर्मिती करून कुठेच आपल्या नावाचा उल्लेख करायचा नाही असे जणू व्रतच भारतातील प्राचीन साहित्यिकांनी घेतलेले दिसून येते. याच शृंखलेत काशिकेसारखी अजोड रचना करणाऱ्या जयादित्य व वामन यांचाही उल्लेख करावा लागतो. या दोघांच्याही बाबतीत नावाच्या पलीकडे अधिक माहिती उपलब्ध होत नाही. त्यांचा काळ , त्यांचे निवासस्थान इत्यादी काही त्रोटक माहिती विद्वानांनी मोठ्या परिश्रमाने एकत्र केली आहे. पण या माहितीचा आधारही बव्हंशी अनुमानच आहे. कल्हणाच्या राजतरंगिणी नामक ग्रंथांत जयापीड नावाच्या राजाचा उल्लेख येतो आणि त्याच्या एका मंत्र्याचे नाव वामन होते. यावरून काही विद्वानांनी जयापीड हा जयादित्य असल्याची कल्पना करून त्यालाच काशिकाकार म्हटले आहे. मॅक्समूलरने मात्र या मताचे खंडन केले आहे. काशिकाकार जयादित्य हे काश्मीरराज जयापीड याच्या आधी होऊन गेले , हे इतिहासाच्या अवलोकनाने सिद्ध होते असे ते म्हणतात. चिनी प्रवासी इत्सिंगाच्या उल्लेखावरून ही बाब स्पष्ट होते. काशिकेचे प्रकाशक पंडित बालशास्त्री यांनी जयादित्याला बौद्ध मानले आहे. त्यांनी ग्रंथाच्या प्रारंभी मंगलाचरण केले नाही आणि पाणिनीच्या सूत्रांमध्ये काही ठिकाणी बदल केले असल्याने ते बौद्ध ठरतात , असे मत त्यांनी मांडले. पण हे ही मत सार्वत्रिक मान्यता पावले नाही.

जयादित्याचा व वामानाचा काळ :-

**१) जयादित्याचा काळ:-**

चिनी प्रवासी इसिंगच्या प्रवासवर्णनातील उल्लेखाप्रमाणे जयादित्याचा मृत्यू विक्रम संवत ७१८ म्हणजे इ. सन ६६१ मध्ये झाला. .जर हा उल्लेख प्रमाण मानला तर जयादित्याच्या काळाची ही अंतिम सीमारेषा ठरते. काशिकेतील १/३/२३ व्या सूत्रात भारविच्या किरातार्जुनीयम् चा एक श्लोक उद्धरण म्हणून उल्लिखित आहे. राजा

दुर्विनीताने किरातार्जुनीयम् च्या पंधराव्या सर्गावर टीका लिहिली होती. या राजा दुर्विनीताचा शासनकाळ विक्रम संवत ५३९ ते ५६९ म्हणजे इसवी सन ४८२ ते ५१२ मानण्यात येतो. म्हणून भारवी हे इ. सन ४८२ च्या पूर्वी होऊन गेले हे सिद्ध होते. या तर्काप्रमाणे काशिकाकार हे भारावीच्या पूर्वी असू शकत नाहीत. म्हणून विक्रम संवत ५३९ म्हणजे इ. सन ४८२ ही काशिकेची पूर्वसीमा मानली जाऊ शकते.

२) **वामनाचा काळ:-**

संस्कृत वाङ्मयात वामन नावाचे अनेक विद्वान होऊन गेले आहेत.
१)विश्रांतविद्याधर नामक जैन व्याकरणाचे कर्ते वामन
२) अलंकार शास्त्राचे रचयिता वामन
३) लिङ्गानुशासनाचे निर्माते वामन

या सर्व वेगवेगळया व्यक्ती आहेत. काशिकेचे रचयिता असलेले वामन या सर्वांहून भिन्न आहेत. पुरुषोत्तमदेवाने भाषावृत्ति नामक ग्रंथ रचला. यात त्यांनी काशिका आणि भागवृत्ति यांचे पाठ एकत्रितपणे मांडले आहेत. यावरून हे दिसून येते की भागवृत्तिकाराने ठीकठिकाणी काशिकेचे खंडन केले आहे.यात काही उद्धरणात जयादित्याचे तर काही उदाहरणात वामनाचे खंडन केले आहे. भागवृत्तिचा काळ विक्रम संवत ७०२ ते ७०५ म्हणजे इसवी सन ६४५ ते ६४८ म्हणून जयादित्याचा काळ यापूर्वीचा ठरतो.

कन्नड पंचतंत्रात जयादित्याला आणि वामनाला गुप्तवंशीय विक्रमांक साहसांकाचा समकालीन मानले आहे. हा विक्रमांक म्हणजे चंद्रगुप्त द्वितीय आहे. पाश्चात्य विद्वानांच्या मतांनुसार याचा काळ विक्रम संवत ४६७ ते ४७० पर्यंत म्हणजे इसवी सन ४१० ते ४१३ मानला गेला आहे. हाच विक्रम संवताचा प्रवर्तक आहे, असे मानले जाते. या मताप्रमाणे जयादित्य व वामानाचा काळ इसवी सन ४१० च्या आसपासचा असावा.

निष्कर्षाच्या स्वरूपात आपल्याला असे म्हणता येईल की, जयादित्य व वामानाचा काळ इसवी सनाच्या पाचव्या शतकापासून सातव्या शतकांदरम्यान मानता येऊ शकतो. विद्वानांच्या मतांचा सारासार विचार करता इसवी सनाचे सातवे शतक हा या दोघांचा काळ असावा याची जास्त शक्यता वाटते.

या दोहोंचा जन्म, वंश, जीवन, मृत्यु ,परिवार, इतर साहित्यकृती इत्यादी काहीही सुस्पष्ट नसले तरीसुद्धा त्यांच्या वृत्तीचे महत्त्व अजिबात कमी होत नाही .

## काशिका

**प्रस्तावना-**

एकीकडे अष्टाध्यायी आणि अष्टाध्यायी क्रमाचा अवलंब करून तयार केलेल्या सर्व ग्रंथात पाणिनीच्या संक्षिप्त शैलीचे अनुकरण झाले आहे तर दुसरीकडे महाभाष्यकारांची अति विस्तृत आणि श्रमसाध्य अशी शैली आहे. या दोघांचा सुवर्णमध्य साधून व्याकरण शास्त्राच्या सर्व विषयांचे ज्ञान करून देण्यासाठी काही वृत्तिकारांनी प्रयत्न केले. यात महाभाष्याच्या आधारावर सोप्या पद्धतीने सूत्रांची उदाहरणांसह व्याख्या करत योग्य तो आशय स्पष्ट करणारी 'काशिका' नावाची जयादित्य व वामनाची वृत्ति (व्याख्याग्रंथ) प्रसिद्ध आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीवर सध्या उपलब्ध असणाऱ्या सर्व वृत्तिंमध्ये काशिका ही सर्वात प्राचीन वृत्ति आहे. या वृत्तिमध्ये प्रत्येक सूत्राची अनुवृत्ति, उदाहरण, प्रत्युदाहरण व शंका समाधान यांचा समावेश केलेला आहे. पाणिनीय व्याकरणावरील परंपरागत अशा सर्वच विषयांचे प्रयत्नपूर्वक संरक्षण करण्याचे श्रेय या काशिकावृत्तिलाच जाते. गणपाठ, इष्टिंचे व्याख्यान इत्यादींची शुद्धस्वरूपात मांडणीसुद्धा या ग्रंथात केलेली आढळते. या ग्रंथात महाभाष्याव्यतिरिक्त अन्य व्याकरण संप्रदायातील उदाहरणांचा समावेशही केलेला दिसून येतो. अनुपलब्ध अशा वैदिक ग्रंथांतील उदाहरणे काशिकावृत्तिमध्ये दिलेली दिसून येतात. अशा प्रकारे या काशिकावृत्तिचे महत्त्व अनेक अंगांनी स्पष्टपणे दिसून येते.

**काशिका वृत्ति विभाग -**

काशिका एक वृत्तिग्रंथ आहे. आपल्या ग्रंथाच्या प्रारंभीच 'व्युत्पन्नरुपसिद्धिर्वृत्तिरियं काशिका नाम |' असे म्हणून काशिकाकाराने स्वतःच्या या ग्रंथाला काशिकावृत्ति असे संबोधले आहे. वृत्ति हा शब्द 'वृतु वर्तने' या धातूला 'क्तिन्' (ति ) प्रत्यय जोडल्याने निष्पन्न होतो. काशिकाविवरणपञ्जिकेचे रचयिता आचार्य जिनेंद्रबुद्धि यांनी 'वृत्ति'

शब्दाची व्याख्या करताना म्हटले आहे - 'पाणिनिप्रणीतानां सूत्राणां विवरणं वृति: |' याशिवाय पदमञ्जरीचे रचयिता हरदत्त यांनी 'सूत्रार्थप्रधानो ग्रन्थो वृत्तिः ।' अर्थात् सूत्रार्थ ज्यात मुख्य आहे असा ग्रंथ म्हणजे वृत्ति असे म्हणून वृत्तिशब्दाचे विवेचन मांडले आहे. स्वतः काशिकाकारांनी आपल्या वृत्तिग्रंथाचे प्रतिपाद्य सांगताना म्हटले आहे. -

इष्ट्युपसङ्ख्यानवती शुद्धगणा विवृतगूढसूत्रार्था |
व्युत्पन्नरूपसिद्धिवृत्तिरियं काशिका नाम ॥

इष्टिंच्या (म्हणजे सूत्रात उल्लेख नसलेल्या लक्ष्यांचे साधुत्व सांगणाऱ्या महाभाष्यातील वचनांना इष्टि म्हणतात) उपसंख्यानाने (व्याख्यानाने ) युक्त , शुद्ध गणपाठाने युक्त , सूत्राचा गूढ अर्थ विशद करणारी आणि व्युत्पन्न ( व्युत्पत्तिने सिद्ध झालेल्या) शब्दरुपांची सिद्धि प्रदर्शित करणारी ही काशिकावृत्ति आहे.

सध्या उपलब्ध असलेल्या वृत्तिंमध्ये काशिका ही सर्वात प्राचीन वृत्ति आहे. काशिकेच्या पूर्वीसुद्धा अनेक वृत्तिग्रंथ अस्तित्वात होते. आज ते उपलब्ध नाहीत, पण त्यांचे उल्लेख मात्र आढळून येतात. भर्तृहरीने 'विग्रहभेदं प्रतिपन्ना वृत्तिकारा: ।' असे म्हणून त्यांच्या पूर्वी अनेक वृत्तिकार असल्याचे संकेत दिले आहेत काशिकाकारांनी स्वतः सुद्धा 'वृत्तौ भाष्ये तथा धातुनामपरायणदिषु ।' असे म्हणून ग्रंथाच्या प्रारंभीच इतर वृत्तिंचे अवलोकन केल्याचे सांगितले आहे. पंडित युधिष्ठिरजी मीमांसक यांनी काशिकेनंतरच्या ३० वृत्तिग्रंथांची नावे दिली आहेत. आधुनिक काळातही महर्षी स्वामी दयानंद सरस्वती, पंडित ब्रह्मदत्तजी जिज्ञासु, आचार्या प्रज्ञादेवी इत्यादींचे पाणिनीय सूत्रांवरील वृत्तिग्रंथ प्रसिद्ध आहेत.

**काशिकेचे नामकरण-**

काशिका या वृत्तिच्या नामकरणाविषयी दोन मते मांडली जातात. १)पदमञ्जरीकार आणि वृत्तिप्रदीपकार रामदेव मिश्र यांच्या मते 'काशिकेति देशतोऽभिधानात् । काशिषु भवा -- ।' असे म्हणून काशीमध्ये रचली गेल्याने काशिका असे नामकरण झाले हे मत मांडले आहे.

२) भाषावृत्तिचे विवृत्तिकार (वृत्तिंचे विवेचनकार ) सृष्टिधराचार्य यांनी' काशयति = प्रकाशयति सूत्रार्थमिति काशिका ।' असे म्हणून सूत्रार्थाला

प्रकाशित करणारी ती काशिका असे या नावाविषयी आपले मत मांडले आहे.

काशिकेला 'एकवृत्ति' असेही दुसरे नाव आहे. विमलमतिंनी रचलेला भागवृत्ति नामक प्रसिद्ध वृत्तिग्रंथ आहे. यात वैदिक आणि लौकिक असे दोन भाग करून भागशः सूत्रांची व्याख्या केली आहे. म्हणूनच तिचे नाव भागवृति असे आहे. याउलट काशिकेत वैदिक आणि लौकिक सूत्रांची यथास्थान व्याख्या असल्याने या वृत्तिचे नाव 'एकवृत्ति' असे प्रसिद्ध झाले.

**जयादित्याचा व वामनाचा वृत्तिविभाग -**

जयादित्याने संपूर्ण अष्टाध्यायीवर वृत्ति रचली होती. वामनानेही संपूर्ण अष्टाध्यायीवर वृत्ति लिहिली होती. न्यासकारांनी (काशिकेचे व्याख्याकार) जी उद्धरणे दिली आहेत ती संपूर्ण काशिकेवरील दोहोंच्याही सम्मिलित वृत्तिच्या आधारावरच दिली आहेत.

चिनी प्रवासी इत्सिंगाने काशिकेला जयादित्याची रचना म्हणून संबोधले आहे. त्याने वामनाचा निर्देश केलेलाच नाही. भाषावृत्यर्थविवृतिचे रचनाकार सृष्टिधराचार्य यांनीही काशिकेला जयादित्य विरचित असेच म्हटलेले आहे.

पंडित बालशास्त्रींनी संपादित केलेल्या काशिकेच्या प्रथम चार अध्यायाच्या शेवटी जयादित्याचे तर उर्वरित चार अध्यायाच्या शेवटी वामनाचे नाव छापले आहे. हरी दीक्षित यांनी 'प्रौढमनोरमा' ग्रंथावर 'शब्दरत्न' नावाची व्याख्या रचली आहे. त्यात त्यांनी प्रथम तृतीय पंचम व षष्ठ या अध्यायांचे रचनाकार जयादित्य तर उर्वरित (म्हणजे तृतीय, चतुर्थ, सप्तम व अष्टम अध्याय) यांचे रचयिता वामन असल्याचे सांगितले आहे. अशी मतमतांतरे असली तरीही पंडित युधिष्ठिरजी मीमांसक यांनी 'संस्कृत व्याकरणशास्त्र का इतिहास' या त्यांच्या ग्रंथात सर्व मतांचा सारासार विचार करून असा निष्कर्ष मांडला आहे की, सध्या उपलब्ध असलेल्या काशिकेचे प्रारंभीचे पाच अध्याय जयादित्याने रचले आहेत आणि शेवटचे तीन अध्याय वामनाने रचलेले आहेत.

**काशिकेची वैशिष्ट्ये -**

१) काशिकेमध्ये शुद्ध गणपाठाचा समावेश केलेला आहे जो कि यापूर्वीच्या इतर वृत्तिग्रंथामध्ये आढळत नाही. २) काळाच्या ओघात लुप्त

झालेल्या वृत्तिंचा व ग्रंथकारांचा उल्लेख करून त्यांतील उद्धरणे काशिका वृत्तिमध्ये समाविष्ट केली आहेत. तो ऐतिहासिक ठेवा याच ग्रंथात सापडतो. ३) महाभाष्यात उपलब्ध नसलेल्या व्याख्यानांचे प्राचीन वृत्तिंच्या आधारे काशिकाकाराने प्रतिपादन केले आणि म्हणूनच कुठे कुठे महाभाष्यकारांशी यांची मतभिन्नता आढळते.
४) काशिकेत उदाहरणे व प्रत्युदाहरणे ही बहुतकरून प्राचीन वृत्तिंना अनुसरूनच असल्याने ऐतिहासिक तथ्यांचे ज्ञान होण्यास हा ग्रंथ उपयोगी सिद्ध होतो. ५) ऐतिहासिक दृष्टीने पाणिनीय परंपरेचे अवलोकन करण्यासाठीसुद्धा हा ग्रंथ उपयुक्त आहे.

**काशिकेची व्याख्यानपध्द्ती -**

काशिका वृत्तीच्या सूक्ष्म निरीक्षणाने या ग्रंथाची शैली स्पष्ट होते. ती अशी - १)काशिकाकार सर्वप्रथम सूत्राचा सर्वसामान्य अर्थ प्रस्तुत करतो. २) त्यानंतर त्या अर्थाला अनुसरून सर्व उदाहरणे प्रस्तुत करतो. ३) त्यापुढे तो सूत्रात आलेल्या प्रत्येक पदाचे प्रयोजन सिद्ध करण्यासाठी प्रत्युदाहरणाचा आश्रय घेतो. ४) सूत्रातील पदाची पुढील कोणत्या सूत्रांपर्यंत अनुवृत्ती होते तेही तो स्पष्ट करतो. या सर्व वैशिष्ट्यामुळे सध्या उपलब्ध असणाऱ्या व्याकरण ग्रंथात अनुवृत्तिच्या विषयी हा ग्रंथ सर्वप्रथम प्रमाण मानला जातो. काही विशिष्ट सूत्रात उपयोजिलेल्या संज्ञा किंवा पारिभाषिक शब्द इतरत्र कुठे वापरला गेला आहे किंवा नाही याचाही काशिकाकार सूत्राचे व्याख्यान करताना उल्लेख करतो. ५) भाष्य इत्यादींमध्ये उपलब्ध वार्तिकांचा निर्देश करताना काशिकाकरांनी केवळ उपयोगी वर्तिकांचाच उल्लेख केलेला आहे.

नैयायिकांचे अनुसरण करणाऱ्या शास्त्रार्थरसिक असणाऱ्या नव्यवैयाकरणांनी जो वाक्प्रपंच केला आहे तो अध्ययनेच्छुकांना क्लेशदायक आहे. अपेक्षित शब्दज्ञानासाठी तो फार काही उपयोगाचा नाही .म्हणूनच नैयायिकांचे अनुसरण करणाऱ्या शास्त्रार्थरसिक असणाऱ्या नव्य वैयाकारणांनी जो वाकूप्रपंच केला आहे तो अध्ययनेच्छुकांना क्लेशदायक चाहे. अपेक्षित शब्दज्ञानासाठी तो फार काही उपयोगाचा नाही. म्हणूनच अष्टाध्यायीक्रमाचा अवलंब करून काशिकावृत्तिंचे अनुसरण करत व्याकरणाचे अध्ययन करणे अधिक लाभप्रद आहेअसे प्रामाणिक समीक्षक सांगतात. अशाप्रकारे गांभीर्याने विचार केल्यास असे दिसून येते की धैर्याने आणि मनःपूर्वक काशिकावृत्तिचा काही काळपर्यंत स्वाध्याय व अभ्यास केल्यास पाणिनीय व्याकरणात निश्चितच नैपुण्य प्राप्त होऊ शकेल.

# काशिकेचे व्याख्याग्रंथ काशिका

**प्रस्तावना -**

एकीकडे अष्टाध्यायी आणि अष्टाध्यायी क्रमाचा अवलंब करून तयार केलेल्या सर्व ग्रंथात पाणिनीच्या संक्षिप्त शैलीचे अनुकरण झाले आहे तर दुसरीकडे महाभाष्यकारांची अति विस्तृत आणि श्रमसाध्य अशी शैली आहे. या दोघांचा सुवर्णमध्य साधून व्याकरण शास्त्राच्या सर्व विषयांचे ज्ञान करून देण्यासाठी काही वृत्तिकारांनी प्रयत्न केले. यात महाभाष्याच्या आधारावर सोप्या पद्धतीने सूत्रांची उदाहरणांसह व्याख्या करत योग्य तो आशय स्पष्ट करणारी 'काशिका' नावाची जयादित्य व वामनाची वृत्ति (व्याख्याग्रंथ) प्रसिद्ध आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीवर सध्या उपलब्ध असणाऱ्या सर्व वृत्तिंमध्ये काशिका ही सर्वात प्राचीन वृत्ति आहे. या वृत्तिमध्ये प्रत्येक सूत्राची  अनुवृत्ति, उदाहरण, प्रत्युदाहरण व शंका समाधान यांचा समावेश केलेला आहे. पाणिनीय व्याकरणावरील परंपरागत अशा सर्वच विषयांचे प्रयत्नपूर्वक संरक्षण करण्याचे श्रेय या काशिकावृत्तिलाच जाते. गणपाठ, इष्टिंचे व्याख्यान इत्यादींची शुद्धस्वरूपात मांडणीसुद्धा या ग्रंथात केलेली आढळते. या ग्रंथात महाभाष्याव्यतिरिक्त अन्य व्याकरण संप्रदायातील उदाहरणांचा समावेशही केलेला दिसून येतो. अनुपलब्ध अशा वैदिक ग्रंथांतील उदाहरणे काशिकावृत्तिमध्ये दिलेली दिसून येतात. अशा प्रकारे या काशिकावृत्तिचे महत्त्व अनेक अंगांनी  स्पष्टपणे दिसून येते.

**काशिका एक वृत्तिग्रंथ-**

काशिका एक वृत्तिग्रंथ आहे. आपल्या ग्रंथाच्या प्रारंभीच 'व्युत्पन्नरुपसिद्धिर्वृत्तिरियं काशिका नाम |' असे म्हणून काशिकाकाराने स्वतःच्या या ग्रंथाला काशिकावृत्ति असे संबोधले आहे. वृत्ति हा शब्द 'वृतु वर्तने' या धातूला 'क्तिन्' (ति ) प्रत्यय जोडल्याने निष्पन्न होतो. काशिकाविवरणपञ्जिकेचे रचयिता आचार्य जिनेंद्रबुद्धि यांनी 'वृत्ति' शब्दाची व्याख्या करताना म्हटले आहे - 'पाणिनिप्रणीतानां सूत्राणां विवरणं वृतिः |' याशिवाय पदमञ्जरीचे रचयिता हरदत्त यांनी 'सूत्रार्थप्रधानो ग्रन्थो वृत्तिः ।' अर्थात् सूत्रार्थ ज्यात मुख्य आहे असा ग्रंथ

म्हणजे वृत्ति असे म्हणून वृत्तिशब्दाचे विवेचन मांडले आहे. स्वतः काशिकाकारांनी आपल्या वृत्तिग्रंथाचे प्रतिपाद्य सांगताना म्हटले आहे. -

इष्ट्युपसङ्ख्यानवती शुद्धगणा विवृतगूढसूत्रार्था |
व्युत्पन्नरूपसिद्धिवृत्तिरियं काशिका नाम ॥

इष्टिंच्या (म्हणजे सूत्रात उल्लेख नसलेल्या लक्ष्यांचे साधुत्व सांगणाऱ्या महाभाष्यातील वचनांना इष्टि म्हणतात) उपसंख्यानाने (व्याख्यानाने ) युक्त, शुद्ध गणपाठाने युक्त, सूत्राचा गूढ अर्थ विशद करणारी आणि व्युत्पन्न ( व्युत्पत्तिने सिद्ध झालेल्या) शब्दरुपांची सिद्धि प्रदर्शित करणारी ही काशिकावृत्ति आहे.

सध्या उपलब्ध असलेल्या वृत्तिंमध्ये काशिका ही सर्वात प्राचीन वृत्ति आहे. काशिकेच्या पूर्वीसुद्धा अनेक वृत्तिग्रंथ अस्तित्वात होते. आज ते उपलब्ध नाहीत, पण त्यांचे उल्लेख मात्र आढळून येतात. भर्तृहरीने 'विग्रहभेदं प्रतिपन्ना वृत्तिकारा: ।' असे म्हणून त्यांच्या पूर्वी अनेक वृत्तिकार असल्याचे संकेत दिले आहेत काशिकाकारांनी स्वतः सुद्धा 'वृत्तौ भाष्ये तथा धातुनामपरायणदिषु ।' असे म्हणून ग्रंथाच्या प्रारंभीच इतर वृत्तिंचे अवलोकन केल्याचे सांगितले आहे. पंडित युधिष्ठिरजी मीमांसक यांनी काशिकेनंतरच्या ३० वृत्तिग्रंथांची नावे दिली आहेत. आधुनिक काळातही महर्षी स्वामी दयानंद सरस्वती, पंडित ब्रह्मदत्तजी जिज्ञासु, आचार्या प्रज्ञादेवी इत्यादींचे पाणिनीय सूत्रांवरील वृत्तिग्रंथ प्रसिद्ध आहेत.

**काशिकेचे नामकरण -**

काशिका या वृत्तिच्या नामकरणाविषयी दोन मते मांडली जातात. १)पदमञ्जरीकार आणि वृत्तिप्रदीपकार रामदेव मिश्र यांच्या मते 'काशिकेति देशतोऽभिधानात् । काशिषु भवा -- ।' असे म्हणून काशीमध्ये रचली गेल्याने काशिका असे नामकरण झाले हे मत मांडले आहे.

२) भाषावृत्तिचे विवृत्तिकार (वृत्तिंचे विवेचनकार ) सृष्टिधराचार्य यांनी' काशयति = प्रकाशयति सूत्रार्थमिति काशिका ।' असे म्हणून सूत्रार्थाला प्रकाशित करणारी ती काशिका असे या नावाविषयी आपले मत मांडले आहे.

काशिकेला 'एकवृत्ति' असेही दुसरे नाव आहे. विमलमतिंनी रचलेला भागवृत्ति नामक प्रसिद्ध वृत्तिग्रंथ आहे. यात वैदिक आणि लौकिक असे दोन भाग करून भागशः सूत्रांची व्याख्या केली आहे. म्हणूनच तिचे नाव भागवृति असे आहे. याउलट काशिकेत वैदिक आणि लौकिक सूत्रांची यथास्थान व्याख्या असल्याने या वृत्तिचे नाव 'एकवृत्ति' असे प्रसिद्ध झाले.

**जयादित्याचा व वामनाचा वृत्तिविभाग -**

जयादित्याने संपूर्ण अष्टाध्यायीवर वृत्ति रचली होती. वामनानेही संपूर्ण अष्टाध्यायीवर वृत्ति लिहिली होती. न्यासकारांनी (काशिकेचे व्याख्याकार ) जी उद्धरणे दिली आहेत ती संपूर्ण काशिकेवरील दोहोंच्याही सम्मिलित वृत्तिच्या आधारावरच दिली आहेत.

चिनी प्रवासी इत्सिंगाने काशिकेला जयादित्याची रचना म्हणून संबोधले आहे. त्याने वामनाचा निर्देश केलेलाच नाही. भाषावृत्यर्थविवृतिचे रचनाकार सृष्टिधराचार्य यांनीही काशिकेला जयादित्य विरचित असेच म्हटलेले आहे.

पंडित बालशास्त्रींनी संपादित केलेल्या काशिकेच्या प्रथम चार अध्यायाच्या शेवटी जयादित्याचे तर उर्वरित चार अध्यायाच्या शेवटी वामनाचे नाव छापले आहे. हरी दीक्षित यांनी 'प्रौढमनोरमा' ग्रंथावर 'शब्दरत्न' नावाची व्याख्या रचली आहे. त्यात त्यांनी प्रथम तृतीय पंचम व षष्ठ या अध्यायांचे रचनाकार जयादित्य तर उर्वरित (म्हणजे तृतीय, चतुर्थ, सप्तम व अष्टम अध्याय) यांचे रचयिता वामन असल्याचे सांगितले आहे. अशी मतमतांतरे असली तरीही पंडित युधिष्ठिरजी मीमांसक यांनी 'संस्कृत व्याकरणशास्त्र का इतिहास' या त्यांच्या ग्रंथात सर्व मतांचा सारासार विचार करून असा निष्कर्ष मांडला आहे की, सध्या उपलब्ध असलेल्या काशिकेचे प्रारंभीचे पाच अध्याय जयादित्याने रचले आहेत आणि शेवटचे तीन अध्याय वामनाने रचलेले आहेत.

**काशिकेचे व्याख्याग्रंथ -**

१) न्यास (काशिका - विवरणपञ्जिका) काशिका वृत्तिवर काशिकाविवरणपञ्जिका नावाची टीका आचार्य जिनेन्द्रबुद्धि यांनी रचली तिलाच संक्षेपाने 'न्यास' असेही संबोधतात. इसवी सनाच्या सातव्या

शतकात ही टीका रचली गेली असे विद्वानांचे मत आहे. सरळ, सुबोध आणि गंभीर विषयाचा सोप्या शब्दात अर्थ
करून सांगणारी आहे.

2) पदमञ्जरी-

काशिकावृत्तिवर श्री हरदत्तांनी एक उत्तम अशी टीका लिहिली. इसवी सनाच्या अकराव्या शतकात प्रस्तुत टीका रचली गेली असावी. या टीकेत प्रत्येक सूत्राच्या प्रत्येक पदाचे विश्लेषण केले आहे म्हणूनच की काय तिचे गांभीर्य आणि महत्त्व विद्वानांमध्ये प्रसिद्ध आहे. १) न्यास (काशिका - विवरणपञ्जिका) काशिका वृत्तिवर काशिकाविवरणपञ्जिका नावाची टीका आचार्य जिनेन्द्रबुद्धि यांनी रचली तिलाच संक्षेपाने 'न्यास' असेही संबोधतात. इसवी सनाच्या सातव्या शतकात ही टीका रचली गेली असे विद्वानांचे मत आहे. सरळ, सुबोध आणि गंभीर विषयाचा सोप्या शब्दात अर्थ करून सांगणारी आहे.

३) पदमञ्जरी- काशिकावृत्तिवर श्री हरदत्तांनी एक उत्तम अशी टीका लिहिली. इसवी सनाच्या अकराव्या शतकात प्रस्तुत टीका रचली गेली असावी. या टीकेत प्रत्येक सूत्राच्या प्रत्येक पदाचे विश्लेषण केले आहे म्हणूनच की काय तिचे गांभीर्य आणि महत्त्व विद्वानांमध्ये प्रसिद्ध आहे.

# भर्तृहरी जीवन परिचय

**प्रा. रमेश रामलिंगी स्वामी**
संस्कृत विभाग
राजर्षी शाहू महविद्यालय लातूर

**(मराठी नामभेद: भर्तृहरी, भर्तरी, भर्तरीनाथ) (जीवनकाळ: अंदाजे इ.स.चे ५ वे शतक) हा उज्जयिनीचा राजा विक्रमादित्य याचा थोरला सावत्र भाऊ होता. नीतिशतक, शृङ्गारशतक व वैराग्यशतक या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शतकत्रय या संस्कृत भाषेतील ग्रंथसंग्रहाचा रचनाकार म्हणून हा प्रसिद्ध आहे. याला पिंगला नामक पत्नी होती. नाथपंथीय आख्यायिकांनुसार गृहस्थाश्रम त्यजून याने संन्यासाश्रम स्वीकारला, अशी समजूत आहे. नाथपंथीय सिद्धांच्या नामावलीतील भर्तरीनाथ म्हणजे हाच असल्याची सांप्रदायिक मान्यता आहे.**

संस्कृत साहित्यात ⇨*वाक्यपदीय* हा ग्रंथ लिहिणारा व्याकरणकार भर्तृहरी आणि शतकत्रयकर्ता भर्तृहरी असे एकाच नावाचे दोन ग्रंथकर्ते होऊन गेल्याचे दिसते. भारतात इ. स. च्या सातव्या शतकात आलेला चिनी प्रवासी इत्सिंग ह्याने भर्तृहरिनामक एका भारतीय विद्वानाचा उल्लेख आपल्या लेखनात केलेला आहे. हा भर्तृहरी भारतात येण्याच्या चाळीस वर्षे आधी ह्या भर्तृहरीचे निधन झाले होते, असे इत्सिंगने म्हटले आहे. इत्सिंगच्या ह्या लेखनाचा काळ इ. स. ६९१ हा असल्यामुळे त्याने उल्लेखिलेल्या ह्या भर्तृहरीचे निधन ६५१ मध्ये झाले असावे. *वाक्यपदीय* हा ग्रंथ ह्याच भर्तृहरीने लिहीला, असा स्पष्ट उल्लेख इत्सिंगने केलेला आहे. तथापि दिङ्नागाच्या (४८०-५४०) *त्रैकाल्यपरीक्षेच्या* तिबेटी भाषांतरात भर्तृहरीचे काही श्लोक उदधृत केलेले असल्यामुळे चौथ्या शतकाचा शेवट किंवा पाचव्या शतकाची

सुरुवात असा त्याचा काळ असावा, असे काही अभ्यासक मानतात. *वाक्यपदीयकार* भर्तृहरी आणि शतकत्रयकर्ता भर्तृहरी हे एकच असावेत , हे निश्चितपणे सांगता येत नाही. तथापि ते एक नसावेत, असे मानण्याकडे विद्वानांचा सर्वसाधारण कल आहे. शतकत्रयात व्याकरणाचे काही अपप्रयोग आलेले आहेत. ते लक्षात घेता, त्याचे कर्तृत्व महावैयाकरण असलेल्या *वाक्यपदीयकार* भर्तृहरीला देणे अवघड आहे. शिवाय, शतकत्रयातील काही उल्लेखांवरुन त्याचा कर्ता शैव-वेदान्ती असावा, असेही दिसते.

उपर्युक्त *वाक्यपदीय* ह्या ग्रंथात भाषाशास्त्र, अर्थविचार आणि तत्त्वमीमांसा ह्यांचे सिद्धांत एकत्र गुंफिलेले आहेत. अर्थविचाराला आणि तत्त्वमींमासेला व्याकरणशास्त्राची अंगे मानून कात्यायनाने त्यांना आपल्या वार्त्तिकांत पहिल्यांदा महत्त्व दिले. तथापि त्यांचा विस्तृत ऊहापोह मात्र भर्तृहरीनेच आपल्या *वाक्यपदीयात* केला. म्हणून संस्कृत व्याकरणाचा पहिला उपलब्ध दर्शनग्रंथ म्हणून वाक्यपदीयाला फार महत्त्व आहे. ह्या ग्रंथाखेरीज वैयाकरण भर्तृहरीचा आज उपलब्ध असलेला दुसरा ग्रंथ *महाभाष्यादिपिका* किंवा *त्रिपदी* हा होय.

पतंजलीच्या *महाभाष्यावरील* ही टीका असून ती पहिल्या सात आह्निकांपर्यंत उपलब्ध आहे. भांडारकर प्राच्यविद्यासंशोधन मंदिराच्या वार्षिकांतून ती क्रमशः प्रसिद्ध झालेली आहे (१९६४-६९).

*शृंगारशतकाच्या* वाङ्मयीन एकजिनसीपणावरुन व त्याच्याशी संबद्धअसलेल्या गूढकथांवरुन ते पूर्णतः एकाच कर्त्याचे-अर्थात भर्तृहरीचे-असावे, यात शंका नाही.

तथापि परंपरेनुसार *नीतिशतक* आणि *वैराग्यशतक* याही कृती भर्तृहरीच्या मानल्या जातात. शतकत्रयातील श्लोक ‘मुक्तक’ या स्वरुपाचे म्हणजे सुटेसुटे असल्याने त्यांची उसनवारी अन्य ग्रंथांत होणे किंवा त्यांत

भर पडणे किंवा स्वतः भर्तृहरीनेही एखाद दुसरा श्लोक अन्य ग्रंथांतून घेणे हे अस्वाभाविक नाही.

*शृंगारशतक, नीतिशतक* आणि *वैराग्यशतक* या तीन शतकांमध्ये परस्परविरुद्ध अशा बऱ्याच वृत्ती, भावना आणि विचार दिसून येतात. पण तेवढ्यावरुन या रचना भिन्नकर्तृक म्हणता येणार नाहीत, कारण मुक्तकरचनेमध्ये हेही अस्वाभाविक नाही. शिवाय, तो एकाच भर्तृहरीचा भिन्नभन्न काळचा वैयक्तिक आविष्कार असणेही असंभवनीय नाही.

*शृंगारशतकाचे* कवीने पाच विभाग कल्पिले असून त्यांत प्रणयाचे मोठे रम्य चित्रण केलेले आहे. स्त्रीसौंदर्य, स्त्रियांचे विभ्रम आणि विनयादी गुण, स्त्रीवाचून मनुष्यस्वभावात येणारी रुक्षता, विलोभनीयतेबरोबरच दुःख, मोह यांचेही कारण असणारी स्त्री यांचे कवीने मनोहर वर्णन केले आहे. यानंतर खरा विरक्त आणि विरक्तीचा आव आणणरा दांभिक यांतील भेद विशद करुन संपूर्ण विरक्ती, ईशभक्ती हेच जीवनाचे ध्येय असेल पाहिजे, असे प्रतिपादले आहे. उपसंहारात षड्ऋतूंतील सृष्टिसौंदर्यामुळे प्रणयजीवनातील उल्हास कसा वृद्धिंगत होतो, याचे काव्यमय वर्णन आहे.

**नीतिशतक** हे दहा ‘पद्धती’मध्ये विभागलेले असून प्रत्येक पद्धतीत दहा श्लोक आहेत. विद्वत्व, स्वाभिमान, शौर्य, द्रव्य, दुर्जननिंदा, सज्जनप्रशंसा, परोपकार, दृढनिश्चय, दैव आणि कर्म यांचे यात परोपरीचे वर्णन आहे. *नीतिशतकात* वेदान्त, नीतिबोध, धर्मपरता, उद्यमशीलता यांवरील भर सहज आणि स्पष्ट जाणवण्यासारखा आहे. त्यात भर्तृहरी हा ‘जीवनात वावरणारा एक सामान्य माणूस, पण अनुभवाने पोळलेला आणि मतांना धार आलेला एक गंभीर द्रष्टा’ अशा प्रकृतीचा कवी दिसतो. विविध अलंकार, पौराणिक निदर्शने, आशयघनता, खोली, व्यापकता, कळकळ, उपरोध, दैनंदिन जीवनातील उदाहरणे, रोखठोक शैली, अनघड पण हृद्याला भिडणारी शब्दचातुरी यांमुळे सर्वच काव्य अत्यंत रमणीय आणि रसपूर्ण झालेले आहे.

**वैराग्यशतकात** तृष्णा, सुखोपभोगांच्या नादी लागल्याने होणारी वंचना, याचकवृत्ती, यतिवृत्ती, वैराग्य, भक्ती, ज्ञानसाधना या सर्वांचे अतिशय कळकळीने वर्णन केलेले आहे. चित्ताला स्थैर्य आणि शान्ती लाभावी, यासाठी सगुणोपासना, योगसाधना, ब्रह्मानुभूती ही साधनप्रणाली भर्तृहरीने *वैराग्यशतकात* आवर्जून उपदेशिलेली आहे.

**नीतिशतक**: एक संस्कृत काव्य. कर्ता ⇨ *भर्तृहरि*. तत्त्वदर्शी आणि नीतिबोधपर असे शंभर श्लोक ह्या काव्यात अंतर्भूत आहेत. *नीतिशतका*चा काळ निश्चितपणे सांगता येणार नाही, कारण भर्तृहरीचाच काळ निश्चितपणे ठरविता येत नाही.

*नीतिशतका*तील शंभर श्लोकांचे, विषयानुसार दहादहा श्लोकांचा एक गट ह्याप्रमाणे कवीने एकूण दहा गट पाडलेले आहेत. अशा गटाला 'पद्धती' असे नाव दिलेले आहे. अज्ञ, विद्वस्, मानशौर्य, अर्थ, दुर्जन, सुजन, परोपकार, धैर्य, दैव आणि कर्म ह्या विषयांशी *नीतिशतका*तील दहा पद्धती संबद्ध आहेत. असे असले, तरी ह्या काव्यातील प्रत्येक श्लोक आपल्यापरीने स्वयंपूर्णच आहे. 'मुक्तक' ह्या नावाने ओळखली जाणारी, एकश्लोकी, स्वतंत्र, स्वयंपूर्ण रचनेची परंपरा संस्कृतात आहे. रचनाबंधाच्या दृष्टीने भर्तृहरीचे हे शंभर श्लोक म्हणजे मुक्तकेच होत.

*नीतिशतका*चा उद्देश उद्‌बोधनाचा असल्यामुळे त्याचा कल वैचारिकतेकडे आहे. जीवन डोळसपणे जगण्याच्या जाणिवेतून कवीने केलेले सूक्ष्म, व्यापक अवलोकन आणि त्यामुळे त्याच्या विचारांना आलेला ठामपणा, *नीतिशतका*त दिसून येतोच. तथापि भर्तृहरीचे तरल, संवेदनशील कविमन आणि त्याचे समृद्ध भावविश्वही त्यात प्रकटलेले दिसते.

जीवनाची वाटचाल मनुष्याला स्वप्रयत्नांनी आणि एकट्याने करावयाची असते हे खरे परंतु जीवन जगत असता मनुष्य एकटा नसतो. आप्त, मित्र, मतलबी, धूर्त, शत्रू, अज्ञ, शहाणे, धनिक, सत्ताधारी अशा

विविधपरींच्या लोकांचे कडे त्याच्याभोवती असते. प्रत्येकाचे स्वभाव, विचार, आचरण निराळे. ह्या तिहींतही परस्परभिन्नता. विचार, उच्चार आणि आचार यांची एकवाक्यता फक्त सज्जनांमध्ये असते. मनुष्याला तात्त्विक शहाणपण शिकण्याची आवश्यकता सदैव आहे. म्हणूनच भर्तृहरी अज्ञ–विद्वान, दुर्जन–सुजन, दैव–कर्म अशा विरोधी जोड्या उभ्या करून त्यांचे स्वरूप, गुणावगुण, आचरण पद्धती यांवर मार्मिक प्रकाश टाकताना दिसतो. सज्जनांचे कमलासारखे मृदू मन, संकटात पर्वतासारखे खंबीर राहण्याची त्यांची शक्ती, वाणीची मधुरता, परोपकाराला वाहिलेले जीवन या गोष्टी तत्त्व म्हणून कळत असल्या, तरी अंगी वळत नाहीत पण अज्ञानाचे रूप कळले म्हणजे ज्ञानाचा प्रकाश उमलू लागतो. दुर्जनांचे देखणे बहिरंग व विषतुल्य अंतरंग कळले म्हणजे सज्जनांची थोरवी कळते. सत्ता आणि संपत्तीचा मोह माणसाला पडतो. कांचनापुढे जग लोटांगण घालते. धनिकाची खुशामत करण्यासाठी माणूस श्वानलीला करतो. अंधदृष्टीच्या माणसाला जीवनाची मूल्ये नीट कळावी लागतात, म्हणजे मग तो नीतीकडे वळू लागतो. या दृष्टीने माणूस, पिता, पुत्र, कलत्र, मित्र यांच्या अंतरंगावर भर्तृहरीने प्रकाश टाकला आहे. केव्हा 'तृष्णां छिन्धि, भज क्षमां, जहि मदं, पापे रतिं मा कृथाः ।' असा रोखठोक उपदेशही केला आहे. जीवनाची उन्नती प्रयत्नाधीन आहे. दैव अटळ आहे हे खरे पण त्याचा बाऊ करण्यात अर्थ नाही, हे लक्षात घेऊन प्रयत्नांची कास धरण्याची, धैर्याने जीवन जगण्याची महती कवीने स्पष्ट शब्दांमध्ये वर्णिली आहे व हे करताना अमृतप्राप्तीसाठी प्रचंड परिश्रम करणाऱ्या देवांचा दाखला जसा दिला आहे, तसेच निंदा–प्रशंसा, संपत्ती–दारिद्र्य, जीवन–मरण यांची पर्वा न करता निश्चयी धीराचे पुरुष न्याय्य मार्गावरून रेसभरही ढळत नाहीत, हे अनुभविक बोलही ऐकविले आहेत. *नीतिशतका*तील उपदेशाचे रूप असे माणसाला धीर देणारे, ऐहिक कल्याणाचा आणि पारमार्थिक श्रेयाचा मार्ग

दाखविणारे आहे. जीवनातील स्वार्थ, दुष्टता, मनाचा कोतेपणा इत्यादींनी भर्तृहरीचा भ्रमनिरास झालेला असला, तरी तो जीवनद्वेष्टा नाही, तर अनुभवांनी शहाणा झालेला आहे व आपल्याला गवसलेले हे शहाणपण मनुष्यमात्रापुढे मांडण्याची त्याला तळमळ आहे. म्हणूनच *नीतिशतक* हे केवळ बोधपर काव्य होत नाही. भर्तृहरीच्या अंतर्मनातील भावव्यथा त्यात प्रकट झालेली आहे. सामान्यपणे हे खरे की, जाणते हेवामत्सराने जळत असतात सत्ताधारी गर्वाने पछाडलेले असतात सामान्य माणसे अज्ञानाने मरगळलेली असतात. अशा परिस्थितीत तत्त्वदर्शी माणसाचे शहाणपण त्याच्या अंगातच जिरून-सुकून जाण्याची वेळ येते. असे असूनही भर्तृहरीची तळमळ त्याला स्वस्थ बसू देत नाही. ही आंतरिक तळमळ भर्तृहरीच्या काव्याचा थोर विशेष आहे.

विविध वृत्तांची सफाईदार रचना, भाषेचा प्रसंगोपात्त सामासिक डौल, अन्यत्र अतीव साधेपणा हे भर्तृहरीचे ठळक विशेष. खूपसा मोठा विचार छोट्या वाक्यखंडात वा आटोपशीर पद्यपंक्तीत व्यक्त करण्याची संस्कृत भाषेची जी शक्ती आहे, तिने कीथसारखे पाश्चात्य समीक्षकही हरखून गेले आहेत परंतु भर्तृहरीचा विलक्षण प्रसाद, परखड विचार मोजक्या शब्दांत प्रकट करण्याची त्याची शक्ती, त्याची अनुभवसंपन्नता आणि आंतरिक तळमळ हे गुण त्याचेच होत. त्याचे काव्य विचारशील कविमनाचे एक प्रसन्न दर्शन आहे. भर्तृहरी हा यूरोपमध्ये ख्याती पावलेला बहुधा पहिला संस्कृत कवी असावा. *नीतिशतका*तील श्लोकांचे डच आणि जर्मन भाषांत अनुवाद झालेले आहेत. मराठीतही ह्या काव्याचे अनेक अनुवाद झालेले आहेत.

# भर्तृहरी ग्रंथ परिचय- वाक्यपदीय

**प्रा. डॉ. गणंजय कहाळेकर**
संस्कृत विभाग प्रमुख
म. ज्योतिबा फुले महाविद्यालय मुखेड

वाक्यपदीय हा संस्कृत व्याकरणाचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. त्याला त्रिकांडी असेही म्हणतात. वाक्यरचना हा व्याकरण मालिकेतील मुख्य तात्विक मजकूर आहे. त्याचे लेखक महावैय्याकरण आणि योगीराज भर्तृहरी आहेत. त्यांच्या गुरूचे नाव वसुरत होते. कोणी भर्तृहरीला तिसऱ्या, कोणी चौथ्या व सहाव्या किंवा सातव्या शतकात स्थान दिले आहे. भर्तृहरींनी वाकपदी भाषेचे स्वरूप (वच) आणि तिचा बाह्य जगाशी असलेला संबंध यावर आपले मत मांडले आहे. हे पुस्तक तीन भागात विभागलेले आहे ज्याला "कांडा" म्हणतात. हे सर्व पुस्तक श्लोकात लिहिलेले आहे. पहिला "ब्रह्मकांड" ज्यामध्ये १५७ कारिका आहेत, दुसरा "वाक्यकांड" ज्यामध्ये ४९३ कारिका आहेत आणि तिसरा "पदकांड" म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचा पहिला कांड ब्रह्मकांड आहे, ज्यामध्ये शब्दाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. यामध्ये शब्दाला ब्रह्म मानले असून ब्रह्मप्राप्तीचे मुख्य साधन म्हणून शब्दाचे वर्णन केले आहे.

वाक्यकांडत भर्तृहरी यांनी शिक्षेबाबत वेगवेगळी मते मांडली आहेत. पदकांडत जात, द्रव्य, काळ इत्यादी इतर तात्विक व्यवस्थांचे विषय चर्चिले गेले आहेत. यामध्ये भर्तृहरी हे दाखवण्याचा प्रयत्न करतात की भिन्न विचार एकाच गोष्टीचे वेगवेगळे परिमाण प्रकट करतात. अशा प्रकारे तो आपल्या व्याकरणावर आधारित तत्त्वज्ञानाद्वारे सर्व तत्त्वज्ञान एकत्र करण्याचा प्रयत्न करीत आहे.

प्रथम काण्ड (ब्रह्मकाण्ड)

थोडक्यात व्याकरण हे एक प्रकारचे आगमशास्त्र आहे. त्याची प्रचिती महेश्वरातून आहे. आगमानुसार शब्दाची चार रूपे आहेत - "परा", "पश्यंती", "मध्यमा" आणि "वैखरी". या "परा" मध्ये ब्रह्म आहे. म्हणूनच वक्तपदाच्या पहिल्या कारिकेतच शब्द तत्वाला आदि आणि अनंत आणि

अक्षर ब्रह्म असे म्हटले आहे. या परवरूप ब्रह्मापासून जगाच्या वस्तूंची उत्पत्ती आणि वर्तन हे विवर्तनाच्या रूपात विचारात घेतले आहे. पहिल्या कांडात तत्व या शब्दाचे तात्विक स्वरूप मानले गेले आहे, म्हणून त्याला **"ब्रह्मकांड"** असे नाव देण्यात आले आहे आणि त्याचे वाक्प्रचार साध्या स्वरूपात सिद्ध झाले आहे. खरे तर हे अपघाती प्रकरण आहे. हे महसूलाच्या दृष्टिकोनातून लिहिलेले आहे. या प्रकरणातील काही उपयुक्त आणि जाणून घेण्यासारख्या गोष्टी पुढीलप्रमाणे आहेत-

महर्षींनी 'वेद' हा त्या ब्रह्मप्राप्तीचा मार्ग आणि स्वरूप म्हटले आहे. तो एक असला तरी तो अनेक असल्याचे दिसून येते. म्हणूनच चार वेदांना रिक, यजुष, साम आणि अथर्वण या नावांनी संबोधले जाते. ऋग्वेदाच्या २१, यजुर्वेदाच्या १००, सामवेदाच्या १००० आणि अथर्ववेदाच्या ९ मिळून वेदांच्या ११३० शाखा आहेत. असे असले तरी, सर्व वेदांचा आणि त्यांच्या शाखांचा एकमात्र प्रस्तावित विषय "कर्म" आहे. हे लक्षात ठेवावे की ज्या शाखेत शब्द किंवा मंत्र पठण केले जाते, त्या शब्दाचा उच्चार त्याच पद्धतीने केल्यास फळ मिळते. तोच शब्द दुसऱ्या शाखेत त्याच फॉर्ममध्ये वाचल्याने हा उच्चार होईल, अन्यथा ते होणार नाही, किंवा दुसरा कोणताही परिणाम देणार नाही.

उत्पन्नाशिवाय ड्युटी आणि नॉन ड्युटी ठरवता येत नाही. ऋषींमध्ये असलेल्या अतिसंवेदनशील वस्तूला पाहण्याचे ज्ञानही आगमाद्वारे प्राप्त होते (वाक्य. १.३७). कोणतेही खरे ज्ञान तर्काद्वारे मिळवता येत नाही, ते बदलण्यायोग्य असते. भूतकाळ आणि भविष्य हे सर्व उच्च स्तरावरील ऋषींना दिसते. ज्ञानाच्या आत्मप्रकाशामुळे आत्म्याचे स्वरूप आणि ज्ञात पदार्थाचे स्वरूप दोन्ही प्रकट होतात. त्याचप्रमाणे शब्दात अर्थाचे स्वरूप आणि त्याचे स्वतःचे स्वरूप दोन्ही दिसतात.

ज्याप्रमाणे जयपुष्पाच्या लाल रूपाशी संबंधित स्फटिक प्राप्त होते, त्याचप्रमाणे स्फोटातून प्राप्त होणारा आवाज प्राप्त होतो. काही

म्हणतात की ज्याप्रमाणे इंद्रियांचा गुण, असंवेदनशील असणे, हे वस्तूंच्या ज्ञानाचे कारण आहे, त्याचप्रमाणे आवाज, संवेदनाहीन असणे, हे शब्दांच्या ज्ञानाचे कारण आहे. दुसरे मत असे आहे की "अंतर" दोषामुळे, स्फोटाचे स्वरूप माहित नाही, फक्त आवाज समजला जातो. तिसरा मत असा आहे की स्फोट झाल्याची भावना आहे परंतु अंतराच्या दोषामुळे ते अस्पष्ट राहते, कारण अंतरामुळे वस्तूची "मॅग्निच्युड" स्पष्टपणे दिसत नाही.

रेणूंमध्ये सर्व प्रकारच्या शक्ती असतात, म्हणूनच भेद आणि संसार (वियोग आणि संयोजन) च्या रूपात कार्य रेणूंसह (जगातील सर्व गोष्टी) केले जाते. हे रेणू सावली, आटप, तामस आणि शब्दांच्या रूपात बदलत राहतात. या शक्ती प्रकट होण्याच्या वेळी मोठ्या प्रयत्नाने प्रेरित होतात. आणि ज्याप्रमाणे ढग तयार होतात (पाण्याचे अणू हळूहळू एकत्र होऊन), त्याचप्रमाणे शब्दाचे अणू एकत्र येऊन सर्व कार्य करतात. या अणूंचे नाव "शब्द" किंवा "शब्द अणू" आहे.

अशाप्रकारे शब्दाच्या प्रगतीशील रूपाचे आणि शब्दापासूनच संपूर्ण जगाच्या निर्मितीचे वर्णन ब्रह्मकांडात आहे.

**दुसरा काण्ड**

दुसऱ्या काण्ड, "पद" हा वाचक आहे किंवा "वाक्य" ही त्याची ज्वलंत कल्पना आहे. वेगवेगळया मतांवर टीका केली जाते. या प्रकरणात भर्तृहरीने म्हटले आहे - शब्द आणि अर्थ हे एकाच परमतत्त्वाचे दोन भेद आहेत जे वेगळे राहत नाहीत (२.३१). ऋषींना तत्वाचे प्रत्यक्ष ज्ञान असते पण ते हाताळू शकत नाहीत. म्हणून त्या अवर्णनीय घटकांना वर्तणुकीच्या वेळी लोक ज्या प्रकारे वागवतात, त्याच पद्धतीने केले पाहिजे (२.१४३). प्रत्येकजण "प्रतिभा" प्रामाणिक मानतो आणि या आधारावर लोकांना पक्ष्यांच्या वर्तनाबद्दल देखील माहिती असते (२. १४९). बी पेरण्याबरोबरच "लाह" रस इत्यादी मिसळल्याने त्या बियांच्या फळांच्या रंगात आणि फळांमध्ये फरक पडतो. "शास्त्रार्थ" ही प्रक्रिया केवळ अज्ञानी लोकांना

समजावून सांगण्यासाठी आहे, तत्व समजावून सांगण्यासाठी नाही. शास्त्रात प्रक्रियेद्वारे अविद्येची कल्पना आहे. "अविद्या" ची ओळख झाल्यानंतर, आगमाच्या पर्यायांशिवाय असलेली शास्त्रशुद्ध प्रक्रिया जेव्हा प्रक्रिया रिकामी असते तेव्हा "विद्या" स्वरूपात प्रकट होते. म्हणूनच असत्याच्या मार्गानेच सत्याची प्राप्ती होते, असे म्हटले आहे, ज्याप्रमाणे मुलांना शिकवताना प्रथम धर्मग्रंथांचेच पठण केले जाते. इ. तात्विकदृष्ट्या व्याकरणाच्या घटकांची कल्पना ४९३ करिकांतील दुसऱ्या कांडात आहे.

**तिसरा काण्ड**

तिसऱ्या काण्डत 'पदविचार' ही प्रक्रिया झाली आहे. पदांची चाचणी अर्थानुसार केली जाते. न्याय-वैशेषिकांच्या मते, आकाशात सामान्य (जात) नाही, परंतु वाकपदीयानुसार, मुख्य किंवा औपचारिक देशभक्तीमुळे (३.१५-१६) आकाशात एक जात आहे. "ज्ञान" म्हणजे स्व. विषयाचे ज्ञान आणि त्याचे समुपदेशनाचे ज्ञान, हे दोन्ही वेगळे आहेत. या कांडात १३ विभाग आहेत, ज्यामध्ये ४५० हून अधिक करिकांना व्याकरणाच्या तात्विक बाबींची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. हे प्रकरण खंडित आहे.

संदर्भ :


1. Dasgupta, S. N. De, S. K. A History of Sankrit Literature, Classical Perlod, Calcutta, 1962.
2. lyer K.S. Subramaniya, Blrartrharl, Poon
3. Kosambi, D.D. The Epigrams Attributed to Bhartrihari, Bombay, 1948.जोशी, शि. द. मंगरुळकर, अरविन्द
4. Dasgupta, S. M. De, S. K. A History of Sanskrit Literature (Classical Period), Calcutta, 1947.
5. Keith, A. B. A History of Classical Sanskrit Literature, Oxford, 1928.
6. गद्रे, रा. ना. *भर्तृहरिविरचित नीतिशतक*, पुणे, १९६१ १९६४.

# कैयट

प्रा. श्रीमती कांबळे बकुल भगवानराव
सहाय्यक प्राध्यापिका,
संजीवनी महाविद्यालय, चापोली, ता. चाकूर जि. लातूर

**छन्द: पादौ तु वेदस्य हस्तौ कल्पोड्थ पठ्यते**
**ज्योतिषामयनं चक्षुनिरून्तं श्रोत्रमुच्यते |**
**शिक्षा घ्राणं तु वेदस्य मुखं व्याकरणं स्मृत्**
**तस्मात्सांगमधीत्यैव ब्रम्हलोके महीयते ||**

षड् वेदांगांमध्ये व्याकरणाला अन्यय साधारण असे महत्व आहे. हे वरील श्लोकावरूनच आपल्या लक्षात येते वेदरूपी पुरूषाचे मुख म्हणजे व्याकरण असे येथे प्रतिपादीत केले आहे. संपूर्ण शरीरामध्ये ज्याप्रमाणे मुख हे केंद्रस्थानी असते. आकर्षणाचे केंद्रस्थान असते तद्वतच व्याकरण देखील भाषेमध्ये केंद्रस्थानी असते. व्याकरणाशिवाय भाषेचे कार्य व विकास संभवत नाही कारण व्याकरण म्हणजे भाषेची विशिष्ट नियमावली होय. म्हणून व्याकरणाचा व्युत्पत्ति शास्त्रानुसार अर्थ “व्याक्रियन्ते शब्दा अनेन इति व्याकरणम्|” असा मांडला जातो. आचार्य सायनाचार्य व्याकरणाविषयी म्हणतात की “व्याकरणमपि प्रकृति-प्रत्ययादि-उपदेशेन पदस्वरूपं तदर्थं निश्चयाच प्रसज्यते |”

अशा या व्याकरणाचे प्रयोजन स्पष्ट करताना आचार्य वररूचि म्हणतात की रक्षा, ऊह, आगम, लघु, असंदेह –म्हणजेच व्याकरणाने वेदांची म्हणजेच पर्यायाने भाषेची रक्षा करता येते, तसेच ऊह म्हणजे योग्या लिंग, वचन, विभब्जिचा वापर शक्य होतो. योग्य पद्धतीने शबदात आगम शक्य होतो. तसेच व्याकरणाच्या ज्ञानामुळे भाषेत लाघवाता येते. व कुठलाही संदेह (शंका) राहत नाही. व्याकरणामुळे भाषेची क्लिष्टता दुर होऊन सर्व शंकर दूर होतात.(1)

त्यामुळे कोणत्याही भाषाध्यायन करीता व्याकरणाचा अभ्यास अनिवार्य ठरतो.

संस्कृत भाषा आणि तीचे व्याकरण इतर भारतीय भाषांच्या तुलनेत अत्यंत प्राचीन ठरते. त्याचप्रमाणे संस्कृत भाषेची व्याकरण परंपरा ही अगदी वैदीक काळापासुन प्रचलीत असलेली दिसते. अनेक व्याकरणकार व त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध असलेले दिसतात ज्यांच्यामुळे संस्कृत भाषाही उत्तरोत्तर समृद्ध झालेली आपणास दिसते. अगदी पाणिनि पासुन ते नागेश भट्टापर्यंत ही व्याकरणाची परंपरा समृद्ध होताना दिसते हा समृद्ध प्रवाह आजतागायत प्रवाहीत होत आहे हे विशेष या प्रवाहातील महत्वपुर्ण नाव म्हणजे व्याकरणकार **कैयट** होय. **कैयट**या महान व्याकरणकारांनी महर्षि पतंजलीच्या ‘महाभाष्य’ या व्याकरण ग्रंथावर ‘प्रदीप नावाचा टीका ग्रंथ लिहुन प्रसिद्ध व्याकरणकारांमध्ये स्वत: चे स्वतंत्र असे स्थान निर्माण केले आहे.

वैयाकरणकार कैयट यांचा थोडक्यात परिचय आपणास पूढीलप्रमाणे मांडता येतो.

| | | |
|---|---|---|
| नाव | – | कैयट |
| उपाधि | – | प्रदीपकार |
| वर्ण | – | कश्मीरी ब्राम्हण: |
| स्थितीकाळ | – | (युधिष्ठिरमीमांसकानुसार) 1090 विक्रमी |
| पिता | – | श्री जैयट : |
| माता | – | अज्ञात |
| गुरू | – | माहेश्वर: |
| शिष्य | – | उद्योतकर: (प्रमुखशिष्य:) |
| जन्मस्थान | – | काश्मीरप्रदेश |
| कृती | – | महाभाष्य प्रदीप उत प्रदीपटीका (महाभाष्योपरिटीकाग्रन्थ: ) |

**अन्यविवरण :-**

पाणिनीय महाभाष्य या प्रसिद्ध ग्रंथावर अनेक व्याकरणकारानी टीकाग्रंथ लिहलेले आढळतात त्यात प्रामुख्याने भर्तृहरी व त्यानंतर कैयाटांचे नाव येते. वैय्याकरणकार कैय्यट यांनी महाभाष्यावर 'प्रदीपनामक' प्रसिद्ध टीकाग्रंथाची रचना करून 'प्रदीपकार:' या उपाधिने सन्मानित झाले. कैयाटांच्या प्रदिप या टीकाग्रंथावर प्रामुख्याने भर्तृहरिच्या वाक्यपदीयम् या टीकाग्रंथाचा प्रभाव दिसतो. तरी हा ग्रंथ व्याकरण परंपरेत सन्मानीतआहे. या प्रदीपटीका ग्रंथावर पूढे सहसा पंधरा लेखकांनी टीकाग्रंथ लिहलेले आढळतात. नागेशभट्टांनी या ग्रंथावरप्रदीपोद्योत अथवा उद्योत नामक टीका लिहीली आहे. 'संस्कृत व्याकरण शास्त्र का इतिहास' या ग्रंथात लेखकांने 'महाभाष्यांवरील टीकाकारांमध्ये कैयटांचे नाव तृतीय स्थानी ठेवले आहे. त्यांनी प्रथमत: भर्तृहरि त्यानंतर अज्ञातकर्तक (स्कन्दस्वामी) तद्वंतर तृतीय स्थानी 'कैयाट यांचा उल्लेख केला आहे. येथे त्यांच्याविषयी अत्यंत विस्तृतपणे त्यांची माहिती मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्याचे विवेचन पूढीलप्रमाणे करता येते.

'कैयट' यांचा कालखंड (सं) 1100 च्या पूर्वीच्या सांगीतला आहे. कैयट यांनी महाभाष्यावर 'प्रदीप' नामक अत्यंत महत्वपुर्ण टीकाग्रंथ लिहीला. महाभाष्यावरील उपलब्ध समस्त टीकाग्रंथामध्ये भर्तृदरिंच्या महाभाष्यादीपिका या टीकाग्रंथानंतर 'प्रदीप' हीच सर्वात प्राचीन टीकाग्रंथ होय.

* कैयटांचा परिचत देत असताना 'महाभाष्यप्रदीप' या ग्रंथाच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी असलेल्या, **"इत्युपाध्यायजैटपुत्र कैयटकृते महाभाष्य प्रदीपे |"** या वाक्यावरून कैयाटांच्या पित्याचे नाव "जैयट उपाध्याय" होते हे सिद्ध होते. 1779 मध्ये मम्मटविरचित 'काव्यप्रकाश' या ग्रंथावर "सुधासागर" नामक टीका ग्रंथ लिहणाऱ्या भीमसेनाने कैयट आणि उव्वट ला मम्मटाचे अनुज (मोठे भाऊ)

संबोधले आहे. परंतू 'यजुर्वेदभाष्य' नामक ग्रंथाच्या शेवटी उव्टाने आपल्या पित्याचे नाव "वज्रट" असे लिहीले आहे. म्हणून भीमसेनाचा लेख अशुद्ध असल्याने केवळ कैयट, उव्वट, मम्मट या नावातील साधर्मामुळे त्याचा भ्रम झाला असावा म्हणुन प्रमाण योग्य माणण्यात येत नाही.

* तसेच इतिहासात कैयट नावाचे दोन व्यक्ति आढळतात. आनन्दवर्धनाचार्यकृत देवीशतकाची कैटकृत एक व्याख्या (टीका) उपलब्ध होते. या 'देवीशतक' व्याख्येमध्ये कैयाटांच्या वडिलांचे नाव 'चन्द्रादित्य' आहे म्हणून हा देवीशतकाचा कैयाट 'प्रदीपकार' कैयटाहून वेगळा असलेला दिसतो.
* कैयाटांच्या गुरूंचे नाव 'महेश्वर' सांगीतले जाते
* कैयाटांच्या परमशिष्य म्हणुन 'उद्योतकर' यांच्या नावाचा उल्लेख आढळतो कैयट शिष्य उद्योतकर ही एक वैय्याकरणकार होतो.
* कैयटांचे जन्मस्थान अथवा त्यांच्या निवासस्थानाचा असा स्पष्ट उल्लेख कोठे आढळत नाही परंतु कैयाट, मम्मट, रूद्रट, उद्भट इत्यादी नावातील साम्यामुळे / सादृश्यतेमुळे कैयाट हे कश्मिर निवासी होते असे मानले जाते.
* कैयट यांच्या विषयी संपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याने त्यांच्या कालनिश्चिती विषयी अचूक माहिती प्राप्त होत नाही तरी काही प्रमाणाद्वारे त्यांचा कालखंड निश्चितीस साहयता मिळते. सवत् | १२१५ मध्ये सर्वानन्द ने अमरकोषाच्या टीकासर्वस्व नावाच्या ग्रंथामध्ये भैत्रेयरधित विरचित धातुप्रदीप आणि त्याची टीका उद्धृत केली आहे. या मैत्रेय तन्त्रप्रदीप १/२/१ मध्ये "कज्जटस्तु कार्तिक्या प्रभ्रतीति भाष्यकार वचनादेवविध विषये पञ्चमी भवतीति मन्यते |"

अशा प्रकारे कैयटांच्या नावाचा उल्लेख केलेला आढळतो. तसेच हा मैत्रेयरक्षित आपल्या 'तन्त्रप्रदीप' आणि 'धातुप्रदीप' या ग्रंथामधून

धर्मकीर्ति व त्याने रचलेल्या रूपावतार या ग्रंथालाही उद्धृत करतो. धर्मकीर्ति या रूपावतारमध्ये पद्मञ्जरीकार हरदत्ताचा उल्लेख करतो. जेव्हा या हरदत्त विरचित पद्मञ्जरी व कैयटविरचित महाभाष्य प्रदीप यांची तुलना केल्यास असे लक्षात येते की अनेक ठिकाणी दोन्ही ग्रंथ अक्षरश: समानच आहेत. परंतु दोन्ही ग्रंथाच्या अभ्यासान्ती असे लक्षात येते की कैयाट हा हरदत्तापेक्षा पूरातण आहे. वरील विवेचनावरून ग्रन्थकर्ता व त्यांचा कालखंड अधीक स्पष्टपणे खालील तक्त्याद्वारे मांडला आहे.

| | ग्रन्थकर्ता | ग्रन्थनाम | काळ |
|---|---|---|---|
| 1. | सर्वानन्द | टीकासर्वस्व | 1215 वि. |
| 2. | "धातु | प्रदीप टीका | 1190 वि. |
| 3. | मैत्रेयरक्षित | धातुप्रदीप | 1165 वि. |
| 4. | धर्मकीर्ति | रूपावतार | 1140 वि. |
| 5. | कैयट | महाभाष्यप्रदीप | 1090 वि. |

अशाप्रकारे केवळ अनुमानाद्वारे हा क्रम लावता येतो पण येथे निश्चितता देता येत नाही.

## महाभाष्यप्रदीप

पाणिनीय संप्रादायामध्ये कैयट विरचित 'महाभाष्यप्रदिप' हा टीका ग्रंथ विशेष महत्वपुर्ण ठरतो कारण यात कैयाटांनी 'महाभाष्य' या सारख्या कठिण ग्रंथाची समीक्षा ज्या सहज सुलभतेने मांडली आहे. यावरूणच त्यांचे पाण्डित्य येथे स्पष्ट होते. 'प्रदिप' ग्रंथा शिवाय 'महाभाष्य' सारख्या कठिण ग्रंथ समजने अशक्य आहे.

प्रदिप हा टीका ग्रंथ कैयाटांनी भर्तृहारीच्या "वाक्यपदीय" व प्रकीर्ण काण्ड यांच्या आधारे रचला असल्याचे ते स्वत: च ग्रंथारंभीच मांडतात या टीकाग्रंथात केवळ एकाच ठिकाणी कैयाट भर्तृहारीच्या महाभाष्यदीपीका कडे संकेत करतात.

पाणिनिय ‘महाभाष्याला’ समजण्याकरीता अत्यंत उपयुक्त ठरणारा हा टीकाग्रंथ कैयाटांनी मांडला ज्याच्याशिवाय ‘महाभाष्य’ पूर्णपणे समजणे कठीण आहे.

कैयाटांच्या ‘प्रदिप’ या टीकाग्रंथाचे महतव जाणूनच अनेक व्याकरणकारांनी या ग्रंथावर टीकाग्रंथ रचलेले आहेत. त्यांची नावे खालील प्रमाणे सांगता येतात.

**महाभाष्यप्रदिप टीकाकार**

1) चिन्तामणि
2) नागनाथ
3) रामानन्द सरस्वती
4) ईश्वरानन्द सरस्वती
5) अन्नभट्ट
6) नारायण शास्त्री
7) नागेश भट्ट
8) मल्लय यन्वा
9) रामसेवक
10) प्रवर्तकोपाध्याय
11) आदेन
12) नारायण
13) सर्वेश्वर सोमयाणी
14) हरिराम
15) अज्ञातवर्तक्

वैविक संस्कृत - |||

महाभाष्य –प्रदिप – प्रकाश का परिचय या लेखात अत्यंत रोचक माहिती मिळते.

महाभाष्य हा केवळ व्याकरण शास्त्राचा प्रमाणिक ग्रंथ नसुन तो संपूर्ण विद्यांचे भांडार आहे. याची भाषा अत्यंत प्रांजल, लालित्यपुर्ण, सहज – सुबोध आहे. आणि अद्‌भूत लेखन शैलीने युक्त असलेला हा ग्रंथ कालांतराने अल्पमतींसाठी अत्यंत कठीण होत गेला याचे कारण म्हणजे वैदिक विद्यांचा ऱ्हास होणे हे ही सांगीतले जाते.

भर्तृहारींच्या वाक्यपदीय मधून असे सूचीत केले गेले की काही काळासाठी बैजि, सौभव आणि हर्यक्ष इत्यादी विद्वानांच्या शुष्क तर्कांमुळे या महाभाष्याचे महत्व कमी होत गेले.

अशावेळी हा ग्रंथावरील व्याख्येची आवश्यकता निर्माण झाली व अनेक व्याकरण कारांनी यावर टीकाग्रंथही निर्माण केले, त्यात प्रथम टीका भर्तृहरी यांची 'महाभाष्यदीपीका' अथवा 'माहाभाष्यटीका' आहे. यानंतर संपुर्ण महाभाष्यावर उपलब्ध एकमात्र टीका कैयाटांची 'महाभाष्यप्रदीप' आहे. ही अत्यंत महत्वपूर्ण टीका आहे. महाभाष्याला समर्पक रीतीने समजण्यासाठी ही टीका अत्यंत उपयुक्त ठरते. याचे महत्व जाणूनच अनेक, गुरूकुल व विद्यापिठांमध्ये, विश्वविद्यालयांमध्ये महाभाष्याला समजण्याकरीता ही टीका शिकवली जाते याचे महत्व जाणून बऱ्याच टीकाकारांनी महाभाष्यावर टीकाग्रंथ न लिहता 'प्रदिप' या ग्रंथा वरच टीका लिहीलेली आढळतात.

एकंदरीत वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की कैयट हे अत्यंत प्रौढ प्रतिभाशाली व्याकरणकार संस्कृत व्याकरणशास्त्राच्या इतिहासात होऊन गेले त्यांच्यामुळे आजही महाभाष्यासारख्या कठीण ग्रंथाला समजून घेणे सहज शक्य झाले.

संदर्भसुची :-


1) https://hi.m.wikipedia.org
2) https://sanskritjagat.blogspot.com
3) युधिष्ठिर, भिमासंक, संस्कृत, व्याकरणशास्त्र का इतिहास, भारतीय प्राच्यविद्या प्रतिष्ठान ; 24/312 रामगंज अजमेर पृष्ट क्र. 363-369
4) https://cm.facebook.com/वैदिकसंस्कृत

# भट्टोजी दीक्षित

**प्रा. डॉ. संजिवनी नेरकर**
संस्कृत विभाग प्रमुख
वै. धुंडा महाराज देगलुरकर, महाविद्यालय, देगलूर

भट्टोजीदीक्षित हे चतुर्मुखी प्रतिभाशाली, सुप्रसिद्ध व्याकरणकार होते. वेदांतशास्त्रात ते आचार्य अप्पायदीक्षित यांचे शिष्य होते. प्रक्रियाप्रकाशचे लेखक कृष्ण दीक्षित हे त्यांचे व्याकरणाचे शिक्षक होते. भट्टोजीदीक्षितांची प्रतिभा विलक्षण होती. वेदान्ताबरोबरच त्यांनी धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, उपासना इत्यादींवर हृदयस्पर्शी ग्रंथही रचले आहेत. एकदा वादविवादाच्या वेळी त्यांनी पंडितराज जगन्नाथ यांना म्लेच्छ म्हटले होते. त्यामुळे पंडितराजांचे त्यांच्याशी कायमचे वैर होते आणि त्यांनी 'मनोरमा'चे खंडन करण्यासाठी 'मनोरमा-कुचमर्दिनी' नावाचे भाष्य रचले. पंडितराज हे त्यांचे गुरुपुत्र शेष वीरेश्वर दीक्षित यांचे पुत्र होते.

**परिचय :-**

आचार्य हे महाराष्ट्रीयन ब्राह्मण होते.यांच्या वडिलांचे नव लक्ष्मीधर आणि लहान भावाचे नाव रंगोजी होते. पंडितराज जगन्नाथ यांनी केलेल्या प्रौढमनोरमा खंडन यामुळे असे प्रतीत होते की,आचार्यांनी नृसिंह पुत्र शेषकृष्ण यापासून व्याकरणाचे अध्ययन केले होते.त्यांनी तसा उल्लेख शब्दकौस्तुभ मध्ये गुरु हा शब्द उपयोजून केला आहे. "तदेतत सकलमभिधाय प्रक्रियाप्रकाशे गुरुचरणे उक्तम"

**काल :-**

डॉ. बेळवलकर यांनी आचार्यांचा काल इ.स. **१६००-१६५०** असा सांगितला आहे. शेषकृष्ण दीक्षित यांच्याकडून शिक्षण घेतल्यानंतर तुलसीदास हे त्यांचे गुरुभाई होते, असे म्हणतात. भट्टोजी हे कोरड्या व्याकरणाबरोबरच भगवद्भक्तही होते. राम- कृष्णाच्या चरित्रातून त्यांनी व्याकरणाची हजारो उदाहरणे तयार केली आहेत .

भट्टोजी दीक्षित हे १७ व्या शतकातील महाराष्ट्रीय संस्कृत व्याकरणकार होते, सिद्धान्त-कौमुदीचे लेखक होते. पाणिनीच्या व्याकरणाच्या पद्धतींचे पुनरुज्जीवन करण्यात ते सक्रिय होते, त्यांच्या

कामात पाणिनीची सूत्रे शिकवण्याच्या हेतूने ती भाष्यासह मांडली. याचे वर्णन पुरातन काळातील महान संस्कृत व्याकरणकारांच्या मतांचा आणि दृष्टिकोनांचा ज्ञानकोश (सूर्यकांत बाली) असे केले आहे. त्यांचे विद्यार्थी वरदराज याने तीन संक्षिप्त आवृत्त्यांमध्ये हे काम संपादित केले होते .

**सिद्धांत कौमुदी**

भट्टोजीदीक्षितांनी रचलेल्या ग्रंथांपैकी वैयाकरणसिद्धांतकौमुदी आणि प्रौढमनोरमा हे ग्रंथ फार प्रसिद्ध आहेत. सिद्धांतकौमुदी ही पाणिनी सूत्रांची वृत्ती आहे आणि मनोरमा ही त्याची व्याख्या आहे. शब्दकौस्तुभ या तिसऱ्या पुस्तकात त्यांनी पातजल महाभाषेच्या विषयांचे कुशलतेने समर्थन केले आहे. चौथा ग्रंथ व्याकरणभूषण. त्याचा विषयही शब्दसंग्रह आहे. याशिवाय त्यांनी तत्त्वकौस्तुभ आणि वेदांततत्त्ववेका टिकविवरण या दोन वेदांत ग्रंथांची रचना केली. त्यापैकी केवळ तत्वकौस्तुभ प्रकाशित झाले आहे. ते द्वैतवाद नाकारते.

सिद्धान्त कौमुदी हे अष्टाध्यायीवरील भट्टोजीदीक्षित (१७ व्या शतकाच्या सुरुवातीस) यांनी केलेले एक प्रसिद्ध संस्कृत भाष्य आहे आणि हे पाणिनीच्या कार्यापेक्षा अधिक लोकप्रिय असल्याचे मानले जाते. हे पाणिनीच्या सूत्रांची योग्य मथळयांखाली पुनर्रचना करते आणि सुव्यवस्थित आणि अनुसरण करण्यास सोपे दर्शविते.

सूत्रांची मांडणी दोन भागात केली आहे - पहिला भागामधे अर्थ, संधि, अवनती, स्त्रीलिंगी रचना, केस समाप्ती, संयुगे दुय्यम व्युत्पत्ती आणि दुसऱ्या भागामधे संयुग्मन, प्राथमिक प्रत्यय, वैदिक व्याकरण आणि उच्चार यांच्याशी संबंधित विवरण आहे.

**सिद्धांत कौमुदीवरील भाष्ये**

बालमनोरमा-

वासुदेव दीक्षितांचे बालमनोरमा हे भाष्य सिद्धांत कौमुदीवरील सर्वात प्रसिद्ध भाष्य आहे. तो व्युत्पत्ती समजावून सांगताना मोठ्या तपशिलात जातो आणि त्यामुळे हे भाष्य नवशिक्यांसाठी सर्वात उपयुक्त आहे.

प्रौढमनोरमा-

हे भट्टोजीदीक्षित यांनी केलेले सिद्धान्त कौमुदीवरील स्वयं-भाष्य आहे. सिद्धांत कौमुदी आणि प्रौढमनोरमा या दोघांवरही इतर अनेकांनी भाष्य केले आहे.

तत्वबोधिनी-

ज्ञानेंद्र सरस्वती लिखित तत्व बोधिनी हे एक संक्षिप्त, अधिक अभ्यासपूर्ण आणि मागणी करणारे भाष्य आहे. भट्टोजी दीक्षित यांनी अष्टाध्यायी ची शब्द कौस्तुभ नावाची वृत्ती लिहिली.आता ही वृत्ती समग्ररूपाने उपलब्ध नाही,केवळ प्रारंभीचे काही अध्याय उपलब्ध आहेत. शब्द कौस्तुभ च्या प्रथम अध्याया तील प्रथम पादामध्ये प्रायः पतंजली, कैयट आणि हरदत्त यांच्या ग्रंथांचा उल्लेख आचार्यानी आपल्या शब्दामध्ये संग्रह केला आहे. हा भाग अधिक विस्ताराने लिहिलेला असून पुढील भाग मात्र संक्षेपाने लिहिलेला आहे.

**अन्य व्याकरण ग्रंथ:-**

दीक्षित यांनी शब्दकौस्तुभ च्या अतिरिक्त सिद्धांत कौमुदी आणि त्याची व्याख्या लिहिली. तिचे नाव प्रौढमनोरमा. तसेच त्यांचा वेदभाष्यसार नावाचा ग्रंथ भारतीय विद्याभवन ,मुंबई येथून प्रकाशित झाला. हा ग्रन्थ ऋग्वेदाच्या प्रथम अध्यायावर आहे.आणि हा सायणीय ऋग्भाष्याचा संक्षेप आहे.यांनी लिहिलेली अमरटीका चा हस्तलेख हा मद्रास राजकीय हस्तलेख संग्रहा मध्ये आहे.

शब्द कौस्तुभ टीकाकार:-

बृहत्सुची पत्रामध्ये शब्दकौस्तुभच्या प्रथम पादाचे सहा टीकाकारांचा उल्लेख आहे.

1.नागेश- विषमपदी

2.वैद्यनाथ पायगुंड -प्रभा

3.विद्यानाथ शुक्र - उद्योत

4.राघवेंद्राचार्य -प्रभा

5.कृष्णमित्र - भावप्रदीप

6.भास्करदीक्षित - शब्दकौस्तुभ दूषण

कृष्ण मित्र यांनी सिद्धांत कौमुदी वर रत्नार्णव नावाची टीका लिहिली

सिद्धांतकौमुदी हे भट्टोजी दीक्षित यांनी लिहिलेले संस्कृत व्याकरणाचे पुस्तक आहे. त्याचे पूर्ण नाव वैयाकरणसिद्धांतकौमुदी आहे. भट्टोजी दीक्षित प्रियकौमुदी यांनी चंद्राचा सिद्धांत रचला . त्यांनी स्वत: या पुस्तकावर प्रौढ मनोरमा भाष्य लिहिले. शिष्य भट्टोजीदीक्षित वरदराज हे व्याकरणाचेही मोठे पंडित होते. त्यांनी लघुसिद्धांतकौमुदी लिहिली .

पाणिनी व्याकरणाच्या अभ्यासाच्या प्राचीन पद्धतीमध्ये पाणिनी ग्रंथांचा क्रम हा आधार मानला जात असे. हा क्रम व्यावहारिकतेच्या दृष्टिकोनातून कठीण होता कारण एकच प्रयोग करण्यासाठी वेगवेगळ्या अध्यायांची सूत्रे वापरावी लागतात. ही अडचण पाहून अशा पद्धतीचा शोध लावण्याची गरज होती ज्यामध्ये विशिष्ट प्रयोग सिद्धीस नेण्यासाठी लागणारी सर्व सूत्रे एकाच ठिकाणी उपलब्ध असतील.

अष्टाध्यायी पेक्षा सिद्धांतकौमुदी अधिक लोकप्रिय आहे. अष्टाध्यायींची सूत्रे क्रमपरिवर्तनात योग्य शीर्षकाखाली एकत्रित केली आहेत आणि त्यांचे स्पष्टीकरण दिले आहे. अशा प्रकारे सिद्धांतकौमुदी अधिक पद्धतशीर आहे आणि सहज समजू शकते. सिद्धांतकौमुदी हा खूप मोठा ग्रंथ आहे, त्यात संस्कृत भाषेचे व्याकरण पूर्णपणे आले आहे. यामध्ये अनेक प्रकरणे आहेत, जसे की-

(१) संज्ञा वाक्यांश

(२) व्याख्या भाग

सर्व प्रतिसूत्रे स्पष्ट केली आहेत, जसे की- इतर गुणधर्म: /१/१/२. इदम् हर्स्वस्य अकरस्य अकार-ओकार्योश्च गुणसुन्निविद्यकम् सूत्रम् । अस्य सूत्रस्य वृत्तिः अवमस्ती, आदे च गुणसंख्याः स्यात् ।

सिद्धांतकौमुदी हा भट्टोजीदीक्षिताची कीर्ती पसरवणारा मुख्य ग्रंथ आहे. कौस्तुभ या शब्दानंतर लिहिले होते. स्वत: भट्टोजिदीक्षितांनी यावर प्रौढमनोरमा नावाचे भाष्य लिहिले आहे. सिद्धांत-कौमुदी हा प्रक्रिया-पद्धतीचा उत्कृष्ट ग्रंथ मानला जातो. याआधी, अष्टाध्यायीची सर्व सूत्रे लिहिल्या गेलेल्या प्रक्रिया ग्रंथांमध्ये समाविष्ट नव्हती. भट्टोजीदीक्षितांनी अष्टाध्यायीतील सर्व सूत्रांची मांडणी सिद्धांतकौमुदीमध्ये विविध

अध्यायांमध्ये केली आहे, त्याखाली त्यांनी सर्व धातूंच्या रूपांचे तपशील दिले आहेत आणि लौकिक संस्कृतच्या व्याकरणाचे विश्लेषण करून, वैदिक प्रक्रिया आणि स्वर प्रक्रिया शेवटी ठेवली आहे. काशिका, न्यास आणि पद्म जरी इत्यादी सूत्र-कालानुक्रमिक विवेचनांचा आढावा घेऊन भट्टोजीदीक्षितांनी पाणिनी व्याकरणाचे सर्वांगीण स्वरूप पद्धतीनुसार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. गरजेनुसार व्याख्या, संभाषण आणि भाष्यही त्यांनी नमूद केले आहे. यासोबतच प्रसिद्ध कवींनी वापरलेल्या कोणत्याही वादग्रस्त प्रयोगांचे संतत्वही मानले गेले आहे.

मध्ययुगात, सिद्धांतकौमुदीचा इतका व्यापक प्रसार आणि प्रसार झाला की पाणिनी व्याकरणाची प्राचीन पद्धत आणि मंत्रमुग्ध बोध सारख्या व्याकरण पद्धती यांचे एकत्रीकरण होत गेले. काळाच्या ओघात विद्वानांची नजर प्रक्रिया-पद्धती आणि सिद्धांत कौमुदीच्या दोषांकडेही गेली, पण त्यांना ते सोडता आले नाही.

भट्टोजीदीक्षितांनी पाणिनी व्याकरणात महत्त्वाचे स्थान आहे. पाणिनी-व्याकरणावर त्याचा असा अनोखा प्रभाव पडला आहे की महाभाष्याचे महत्त्वही विसरले गेले आहे. सिद्धांतकौमुदी हे केवळ महाभाष्याचे द्वार नसून महाभाष्याचे संक्षिप्त पण सर्वसमावेशक सार आहे हे समजू लागले आहे. म्हणूनच ही म्हण प्रचलित आहे:- कौमुदी यद्यंगस्थ व्रत भास्ये परिश्रमः

# आचार्य वरदराज

**प्रा. सौ. ज्योती मामडगे**
संस्कृत विभाग प्रमुख
सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूर

भाषा ही मानवाच्या भावना आणि विचारांची देवाण - घेवाण करण्याचे सर्वोत्तम साधन आहे भाषेच्या माध्यमातून मनुष्य आपले विचार दुसऱ्या पर्यंत पोहोचू शकतो आणि दुसऱ्याचे विचार ग्रहण करतो. या संसारांमध्ये भाषा नसती तर मनुष्य आपले व्यवहार करू शकला नसता.भाषेमध्ये आणि मानवी जीवनामध्ये व्याकरणाचे महत्व अधिक आहे. शब्दाचे शुद्ध उच्चारण, प्रकृती प्रत्यय नुसार अर्थबोध,वेगवेगळया प्रत्यय याद्वारे शब्दरचना, शब्दाची सरलता आणि काठिण्यपातळी अशा अनेक गोष्टी व्याकरणाच्या साहाय्याने समजतात. व्याकरण शब्द संस्काराद्वारे मनाला देखील शुद्ध करण्याचे कार्य करते, तसेच शब्द परमात्म्याचे ज्ञान करून देते. म्हणूनच व्याकरणाला वेद पुरुषाचे मुख म्हटले आहे **'मुखं व्याकरणं स्मृतम् ।'** ज्याप्रमाणे मुख व्यक्तीच्या भावना आणि विचारांचे प्रकाशन करतो त्या प्रकारे व्याकरण वेद आणि मंत्र यांच्या भावना स्पष्ट करतात. शिक्षा आणि निरुक्त व्याकरणाचे पूरक अंग आहेत. व्याकरण प्रकृती प्रत्ययाच्या विभाजना द्वारे शब्दाला शुद्ध स्वरूप देते. शिक्षा ग्रंथ शब्दाचे उच्चारण सांगते आणि निरुक्त त्याचा अर्थ स्पष्ट करते अशाप्रकारे वैदिक काला मध्ये सुरुवातीला भाषाशास्त्र अथवा भाषाविज्ञानाचे सूक्ष्म अध्ययन आवश्यक मानले जात होते. सर्वप्रथम व्या+कृ चा व्याकरण,विवेचन अथवा विश्लेषण असा अर्थप्रयोग यजुर्वेदामध्ये सापडतो.

संस्कृतचे व्याकरण वैदिक काळामध्ये देखील स्वतंत्र होते. नाम, आख्यात, उपसर्ग आणि निपात हे चार आधारभूत तथ्य यास्क यांच्या पूर्वी देखील व्याकरण लिहिले होते. परंतु संस्कृत व्याकरणाचा क्रमबद्ध इतिहास

पाणिनी पासूनच सुरु होतो. त्यांनी लिहिलेला अष्टाध्यायी व्याकरणाचा केंद्रबिंदू आहे. तो ग्रंथ आठ अध्यायामध्ये विभागलेला असून प्रत्येक अध्यायामध्ये चार पाद आहेत प्रत्येक पादात काही सूत्रे आहेत.अष्टाध्यायीमध्ये सूत्रांची रचना, भाषेच्या नियमाची व्यवस्थित मांडणी केली आहे. कारण की पदाचे संकलन तसेच पदांची प्रकृती, प्रत्यय विभाग त्याची रचना इत्यादी प्रमुख तत्व आहेत. या नियमाची पूर्ती करण्यासाठी धातु पाठ, गणपाठ तसेच उणादि सूत्र देखील पाणिनीने बनवले आहेत.पाणिनीचे व्याकरण सुलभतेने समजण्याच्या दृष्टीने श्री भट्टोजी दीक्षित यांनी अष्टाध्यायी ची संज्ञा, संधी, समास अशी प्रकरणानूसार मांडणी केली व सिद्धांतकौमुदी नावाचा ग्रंथ तयार केला भट्टोजी दीक्षित यांचे शिष्य पंडित वरदराज यांनी या सुप्रसिद्ध सिद्धांतकौमुदीचा लहानसा व्याकरण ग्रंथ तयार केला त्याचेच नाव लघुसिद्धांतकौमुदी आहे.

**वैयक्तिक परिचय**

वरदराज संस्कृत व्याकरणाचे महापंडित होते.वरदराज यांचे पिता दुर्गातनय होते. त्यांचे जन्मस्थान व निवासस्थान महाराष्ट्र होते त्यांची इतर माहिती उपलब्ध नाही.ते श्री भट्टोजी दीक्षित यांचे शिष्य होते. त्यांच्या सिद्धांतकौमुदी वर आधारित वरद राज यांनी तीन ग्रंथ लिहिले.

वरदाचार्य यांच्या विषयी एक दंतकथा आहे. ते बाल्या अवस्थेमध्ये अत्यंत मूर्ख होते. ते पाठ शाळेमध्ये शिकत होते, तेव्हा सर्व मुले त्यांना चिडवत असत की, 'जेव्हा ब्रह्मदेव बुद्धी वाटण्यासाठी आले तेव्हा तू झोपलेला होता की काय?' शेवटी त्यांच्या मूर्ख पणाला कंटाळून गुरुजींनी घरी जाण्यास सांगितले. जेव्हा वरदाचार्य घरी जाण्यासाठी निघाले तेव्हा मार्गामध्ये एक विहीर दिसली. तहान भागविण्यासाठी ते विहिरीकडे गेले. तेव्हा तेथे त्यांचे लक्ष एका शीलापट्टला कडे गेले.  तेथे शीलापट्टलाला दोरी घासल्या गेल्यामुळे त्याचे निशाण पट्टलावर पडले होते. ते पाहून त्यांच्या

मनामध्ये एक विचार आला की, जर शीला पट्टलावर दोरी घासल्यामुळे दोरीचे निषाण पडू शकतात तर मला विद्या का बरं येऊ शकत नाही? तेथून ते परत पाठशाळेमध्ये आले आणि गुरुजींना शिकविण्यास सांगितले पुढे जाऊन तेच वरदाचार्य प्रसिद्ध व्याकरणकार म्हणून प्रसिद्धीस आले.

**काळ**

आचार्य वरदराज हे भट्टोजी दीक्षित यांचे शिष्य होते. त्यामुळे वरदराज यांचा काळ भट्टोजी दीक्षित यांच्या नंतर पंचवीस वर्षाचा असावा. भट्टोजी दीक्षित यांचा काळ इ.सन १४५० आहे. त्यानुसार वरदराज यांचा काळ इ.सन १४७५ चा जवळपास असावा.

**साहित्यिक परिचय**

आचार्य वरदराज यांचे प्रमुख ग्रंथ खालीलप्रमाणे आहेत-----

1) मध्यसिद्धांतकौमुदी

2) लघुसिद्धांतकौमुदी

3) सारकौमुदी

4) गीर्वाणपदमंजरी

**1) मध्यसिद्धांतकौमुदी**

मध्यसिद्धांतकौमुदी मध्ये २३१५ सूत्र आहेत. यामध्ये वरद्रज यांनी त्यांचे गुरू श्री भट्टोजी दीक्षित यांचे स्मरण करून त्यांना नमस्कार केला आहे. हा वैदिक व्याकरणासहित एक विस्तृत व्याकरण ग्रंथ आहे.

**2) लघुसिद्धांतकौमुदी**

लघुसिद्धान्तकौमुदीमध्ये पाणिनीच्या सूत्रांना एक नवीन क्रमामध्ये ठेवले आहे कारण की एका विषयाशी संबंधित सूत्र एक साथ असावे लघुसिद्धांत कौमुदी मध्ये केवळ अशी सूत्रे घेतली आहेत की जी व्यवहारीक ज्ञानासाठी उपयोगी आहेत.

लघुसिद्धांतकौमुदी मध्ये १२७७ सूत्र आहेत. लघुकौमुदीचे मोजमाप १५०० अनुष्टुप (३२ अक्षरे) छंद एवढे आहे. अमरकोश आणि रघुवंश यांची संख्या देखील तेवढीच आहे. वरदाचार्य यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक तेवढीच सूत्रे लघुसिद्धान्तकौमुदी मध्ये घेतली आहेत. त्यांनी

सिद्धांत कौमुदीचा संक्षेप रूप करून लहानसा व्याकरण ग्रंथ तयार केला त्याचेच नाव लघुसिद्धांतकौमुदी आहे. विद्यार्थ्यांना व्याकरणाचे स्वरूप समजावे व सामान्य ज्ञान व्हावे या उद्देशाने सिद्धांतकौमुदीतील कठीण ओळी व बरीचशी सूत्रे वगळून हा ग्रंथ तयार केला आहे वरदराज यांनी सहा प्रकारची सूत्रे सांगितली आहेत ती पुढील प्रमाणे---

**संज्ञा च परिभाषा च विधीर्नियम एव च ।**
**अतिदेशोऽधिकारश्च षड्विधं सूत्रलक्षणम् ।।**

**1. संज्ञा सूत्रे -** व्याकरणाच्या दृष्टीने विशिष्ट अर्थ गृहीत धरून काही शब्द तयार केलेले असतात त्या शब्दांचा परिचय जी सूत्रे करून देतात त्यांना संज्ञा सूत्रे असे म्हणतात. उदा. 'हलन्त्यम् ।' यात इत् ही संज्ञा कोणाला द्यावी हे सांगितले आहे.

**2. परिभाषा सूत्रे -** सूत्रातील परस्पर विरोध दूर करून व्यवस्था लावण्याकरिता किंवा एखाद्या सूत्राचा अर्थ लावण्यास अडचण पडते ती अडचण सोडविण्याकरिता सांगितलेली सूत्रे परिभाषा सूत्रे असतात. उदा.'संयोगान्तस्य लोपः।' मधील अडचण दूर करण्याकरिता 'आलोऽन्त्यस्य' हे सूत्र आले आहे म्हणून ते परिभाषा सूत्र आहे.

**3. विधी सूत्रे-** जेव्हा सूत्र विशेष प्रसंगी एखादे कार्य करावयास सांगते तेव्हा त्यास विधि सूत्र असे म्हणतात. विधीसूत्राकरिता स्थानी विधेय आदेश व प्रसंग या तीन गोष्टीची आवश्यकता असते.

**4. नियम सूत्रे-** दोन उपाय किंवा मार्ग सांगितले असता त्यापैकी अमुक नको असा निषेध दाखवीत असता, अमुक घ्यावा असे सांगणाऱ्या सूत्राला नियम सूत्रे असे म्हणतात. नियम सूत्रातच ज्यावेळी निषेधावर जोर दिलेला असतो तेव्हा त्यास परीसंख्या सूत्र म्हणतात.

**5. अतिदेश सूत्रे-** मुख्याचे ठिकाणी आलेला आदेश हा मुख्य प्रमाणेच लेखणारी सूत्रे यांना अतिदेश सूत्र म्हणतात.

**6. अधिकार सूत्रे-** 'उत्तरोत्तरस्वार्थसमर्पकसूत्रमधिकारसूत्रम् ।' या सूत्राचा अधिकार पुढील अनेक क्षेत्रावर चालतो. या सूत्राचा आधार त्यांच्या अधिकाराखाली असलेल्या सूत्रांचा अर्थ लावण्याकरिता घ्यावा लागतो. ती अधिकार सूत्रे मानली जातात.

लघुसिद्धांतकौमुदी सिद्धांतकौमुदीचे केवळ संक्षिप्त रूप नाही तर त्याच्या प्रकरणांमध्ये, प्रकरणाच्या क्रमामध्ये देखील अंतर आहे लघुसिद्धान्तकौमुदीचा क्रम अधिक युक्ती संगत आहे. तो पूढीलप्रमाणे ------

1.संज्ञा प्रकरण

2.संधी

3.सुबन्त

4.अव्यय

5.तिड़न्त

6.प्रक्रिया

7.कृदंत

8. कारक

9.समास

10.तद्धित

11.स्त्री-प्रत्यय

**1.संज्ञा प्रकरण**

या प्रकरणांमध्ये एकूण चौदा सूत्रे सांगितली आहेत त्यास माहेश्वरी सूत्र किंवा अनादी सूत्र असे म्हणतात. या प्रकरणांमध्ये प्रत्याहार तयार करणे, उपदेश व शब्दाची पुनरावृत्ती, स्वरांचे प्रकार अभ्यंतर प्रयत्न,बाह्य प्रयत्न अशा अनेक घटकाची माहिती सांगितले आहे.

**2.संधी प्रकरण**

यामध्ये स्वर संधी / अच संधी, व्यंजन संधी / हल संधी, विसर्गसंधी यांचे सूत्र रूपात सविस्तर वर्णन केले आहे.

अशाप्रकारे प्रत्येक प्रकरण आणि त्यामधील माहिती ही प्रकरणाच्या नावा मध्येच दडलेली आहे.

**3) सारकौमुदी**

सारकौमुदीमध्ये त्यांचे पिता श्री दुर्गा तनय यांचे स्मरण केले आहे.

### 4) गीर्वाणपदमंजरी

हा प्रश्नोत्तर शैलीमध्ये लिहिलेला एक सामाजिक, साहित्यिक विषयाशी संबंधित ग्रंथ आहे.

**महत्व**

भाषा ही नेहमी व्याकरणाच्या माध्यमातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असते. पाणिनीकृत अष्टाध्यायीच्या नियमात न बसणारे शब्दप्रयोग दिसू लागले त्यामुळे पुढील व्याकरण कारांनी त्या प्रयोगाचा व्याकरणात समावेश व्हावा म्हणून नवीन नियम करून त्यात त्यानुसार मांडणी केली.पाणिनीय व्याकरण असेल अथवा भट्टोजी दीक्षित यांनी लिहिलेला सिद्धांत कौमुदी असेल त्याची सूत्रबद्धता ही सर्वसामान्य विद्यार्थ्यांना समजणे कठीण जात होते. त्यामुळे त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन वरदराज आचार्यांनी लघुसिद्धांतकौमुदीच्या रूपामध्ये सूत्रांची जटिलता कमी करून सोपे करण्याचा प्रयत्न केला. संस्कृत व्याकरणाकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती सगळीकडेच दिसून येते, परंतु पाणिनीय व्याकरणाचे महत्व संस्कृत अभ्यासकांना समजण्याकरिरता वरदराज विरचित लघुसिद्धांतकौमुदी चे अनन्यसाधारण महत्व आहे. त्यांनी संज्ञा, संधी, समास, कृदंत, तद्धित असे वेगवेगळे प्रकरणं तयार केले आणि लहानसा व्याकरण ग्रंथ तयार केला. विद्यार्थ्यांना व्याकरणाचे स्वरूप समजावे व सामान्य ज्ञान व्हावे या उद्देशाने सिद्धांतकौमुदीतील कठीण ओळी आणि बरीचशी सूत्रे वगळून हा ग्रंथ तयार करण्यात आला. त्याचा अभ्यासकाला खूप मोठ्या प्रमाणात फायदा झाला.

**संदर्भसूची:**


1) लघुसिद्धान्तकौमुदी- वरदाचार्य -ललिता संस्कृत हिंदी टीका
2) लघुसिद्धांतकौमुदी-वरदाचार्य- गीता प्रेस गोरखपुर
3) लघुसिद्धांतकौमुदी -वरदाचार्य- ज्वालाप्रसाद विश्रा
4) लघुसिद्धांतकौमुदी -वरदाचार्य- कौमुदीविहार- भाग एक- . सौ नीला सोमलवार -कौमुदीप्रकाशन
5) संस्कृत व्याकरण शास्त्र का इतिहास -भाग एक-श्री युधिष्ठिर मीमांसक
6) संस्कृत व्याकरण शास्त्र का इतिहास -भाग दोन-श्री युधिष्ठिर मीमांसक
7) संस्कृत व्याकरण शास्त्र का इतिहास -भाग तीन-श्री युधिष्ठिर मीमांसक

# चंद्रगोमी

**प्रा. डॉ. प्रशांत बाबुराव बिरादार**
संस्कृत विभाग प्रमुख
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

**प्रस्तावना–**

आचार्य पाणिनीनंतर अनेक व्याकरणकारांनी व्याकरणाचे अभ्यासक ग्रंथ रचले. या सर्व व्याकरणांचे मुख्य स्तोत्र बहुतेक वेळा पाणिनी व्याकरण असते. फक्त कातन्त्र हे असे व्याकरण आहे, ज्याचा आधार इतर कोणतेही प्राचीन व्याकरण नाही. पाणिनीमधील सर्व उपलब्ध व्याकरण ग्रंथांमध्ये केवळ धर्मनिरपेक्ष संस्कृतचेच शब्द वर्णिले आहेत. प्राचीन व्याकरणात खालील मजकूर–निहाय मुख्य आहे

यांशिवाय व्रतबोध, शब्दबोध, हरिनामामृत इत्यादी व्याकरणकारांनी अनेक व्याकरणकारांनी लिहिलेले आहेत, परंतु हे सर्व फार प्राचीन आहेत. त्यांचे ग्रंथही फारसे महत्त्वाचे नाहीत आणि या ग्रंथांचा प्रचारही केवळ वगळ प्रांतापुरता मर्यादित आहे. त्यामुळे या व्याकरणांचे वर्णन या ग्रंथात केले जाणार नाही.पं. गुरुपाद हलदार यांनी त्यांच्या ''व्याकरण दर्शन इतिहास'' या पुस्तकाच्या पृष्ठ ४४८ वर पाणिनीनंतर खालील व्याकरणकार आणि त्यांची निर्मिती नमूद केली आहे–

१. आमच्या मते, कष्कासन तंत्र, जे कटतंत्राचा परिणाम आहे आचार्य पाणिनीचे प्राचीन व्याकरण ४१६ यांशिवाय इतर अनेक वृत्ति काततंत्र ग्रंथावर लिहिल्या गेल्या.पण त्यांचे ज्ञान आपल्याला नाही.

**चंद्रगोमी (सं. 1000 बीसी)**

आचार्य चंद्रगोमी यांनी पाणिनीय व्याकरणाच्या आधारे नवीन व्याकरणाची रचना केली. या ग्रंथाच्या रचनेत चंद्रगोमीने पतंजली महाभाष्याचीही मोठी मदत घेतली आहे.

**परिचय**

चंद्राचार्याच्या वंशाविषयी कोणताही परिचय उपलब्ध नाही चंद्र व्याकरणाच्या आरंभी जो श्लोक उपलब्ध होतो त्यावरून चंद्रगोमी ही बौद्ध मताचे अनुसरन करणारे होते असे कळते. महाभारताचे टिकाकार

नीलकंठ यांनी अनुशासन  पर्वाच्या व्याख्येत महादेवाचा समानार्थी 'निशाकर' हा शब्द स्पष्ट करताना लिहिले आहे की 'निशाकरशचन्द्र, चन्द्रव्याकरणप्रणेता.'. हा लेख नीलकंठच्या ऐतिहासिक अज्ञानाचा दाखला आहे.

काश्मीरचे महाराजा अभिमन्यू यांच्या आज्ञेवरून चंद्राचार्यांनी काश्मीरमध्ये महाभाष्याचा उपदेश केला होता, हे कल्हणच्या लेखावरून कळते, पण चंद्राचार्यांनी भारतात कोणत्या प्रांतात जन्म घेतला हे त्यांच्या लेखनावरून कळत नाही. त्याचा जन्म कोणत्या प्रांतात झाला? इतर कोणताही पुरावा या विषयावर प्रकाश टाकत नाही. चंद्रगोमीच्या उनादिसुत्राच्या अंतर्गत तपासणीवरून असे दिसून येते की तो बांगाल प्रांताचा रहिवासी होता.

चंद्राचार्यांनी त्यांची उनादी सूत्रांची रचना ककरादि अंत्य अक्षरांच्या क्रमाने रचली आहेत.  ''शिव सर्व, उत्तवा, शुल्व, निंब, विंब, शग्व, स्तम्ब, जिहवा, ग्रीवा'' हे शब्द या शब्दांचे साधुत्व दर्शवतात. यामध्ये अन्त्यस्थान्त आणि पवर्गीयान्त अशा दोन्ही प्रकारच्या शब्दांचा एकसाथ मेळ आहे. यावरून चंद्राचार्य हे बंगदेशी होते असे दिसते. त्यामुळे प्रांत उच्चारणाच्या दोषामुळे त्यांनी अन्त्यस्थ वकारान्त पदांनाही पवर्गीय बकारान्तच्या प्रकरणामध्ये समाविष्ट केले आहे.

**काळ**

महान ऐतिहासिक कल्हणाच्या लेखानुसार, चंद्राचार्य हे काश्मीरच्या नृपती अभिमन्यूचे समकालीन होते. त्यांच्या परवानगीने चंद्राचार्यांनी नष्ट झालेल्या महाभाष्याचा पुन्हा प्रचार केला आणि नवीन व्याकरण तयार केले. महाराज अभिमन्यूचा कालखंड आतापर्यंत वादग्रस्त राहिला आहे. पाश्चात्य विद्वान अभिमन्यूला ४२३ ईसापूर्व ते ५०० इसवी पर्यंतच्या वेगवेगळ्या कालखंडातील मानतात. कल्हानाच्या मतानुसार, अभिमन्यूचा काळ विक्रमच्या कमीत कमी १००० वर्षांपूर्वीचा आहे. भारतीय वेळेच्या गणनेनुसार आम्ही याच कालावधीला योग्य मानतो.

**चंद्र व्याकरणाचे वैशिष्ट्य**

प्रत्येक ग्रंथाची स्वतःची खासियत असते. चांद्रवृत्ति आणि वामनीय लिंगनुशासन वृत्तीमध्ये चंद्र व्याकरणाचे वैशिष्ट्य असे लिहिले आहे – 'चंद्रोपज्ञमसंज्ञक व्याकरम्' म्हणजे चंद्र व्याकरणामध्ये कोणतेही

पारिभाषिक संज्ञेचा विलय न करणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. चंद्राचार्यांनी आपल्या स्वोपज्ञवृत्तीच्या आरंभी आपल्या व्याकरणाची विषेशता सांगितली आहे की,

**'लघुविस्पष्टसम्पूर्णमुच्यते शब्दलक्षणम् ।'**

म्हणजेच हे व्याकरण पाणिनीय तन्त्रपेक्षा लहान, विस्पष्ट आणि कातन्त्र इत्यादी पेक्षा संपूर्ण आहे. पाणिनी व्याकरणात वार्तिके आणि महाभाष्य यांच्या अनुग्रहाने ज्या शब्दांचे साधुत्व करण्यात आले आहे, चंद्राचार्यांनी त्या शब्दांचा सुत्रपाठामध्ये समावेश केला आहें म्हणून त्यांनी आपल्या ग्रंथाचे ''संपूर्ण'' विशेषण लिहिले आहे.

चंद्राचार्यांनी आपल्या व्याकरणाच्या रचनेत 'पातंजल महाभाष्या'चा मोठा फायदा घेतला आहे. चंद्राचार्यांनी त्यांच्या व्याकरणात तेच स्वीकारले, जे पतंजलीने पाणिनी सूत्रांना निर्दोष म्हटले आहे. त्याचप्रमाणे पाणिनी सुत्र किंवा सुत्रांश ज्यांना पतंजलीने नाकारले, त्यांना चंद्राचार्यांनी आपल्या व्याकरणात स्थान दिले नाही. असे असूनही अनेक ठिकाणी चंद्राचार्यांनी पतंजली व्याख्यांना प्रामाणिक न मानता इतर ग्रंथकारांचा आश्रय घेतला आहे.

**चंद्र–तंत्र आणि स्वर–वेदिक–प्रकरण**

डी. वेल्वाकर आणि एम.के.दे. यांचे मत आहे की चंद्रगोमी हा बौद्ध असल्याने त्याने स्वर आणि वेदविषयक सूत्रांना त्याच्या वर्णनात स्थान दिले नाही.

**डी. वेल्वाकर आणि एम.के.दे. यांचा गैरसमज** – चंद्र व्याकरणाबाबत डॉ. बेल्वाकर आणि एम.के.दे मत गैरसमजामुळे पूर्णपणे खोटे आहे. असे दिसते की या लोकांनी चंद्र व्याकरण आणि त्याची उपलब्ध वृत्ती पूर्ण अध्ययन केली नाही आणि सहाव्या अध्यायातील शेवटी चंद्रव्याकरण शुभमपाठ मजकूराचा शेवट पाहून वरील कल्पना केली.

**उपलब्ध चांद्रतंत्र अपूर्ण आहे**. यावेळी जर्मनमध्ये छापलेले चान्दव्याकरण अपूर्ण आहे. त्याचा सहावा अध्याय आणि शेवटचा समाप्त चेद चान्द्रव्याकरण शुभम हा पाठ उपलब्ध असला तरी, चंद्र व्याकरणात स्वरप्रक्रियेचा काही भाग असावा, जो सध्या अनुपलब्ध आहे हे अनेक पुराव्यांवरून ज्ञात आहे.

या सात पुराव्यांवरून हे स्पष्ट होते की चंद्राच्या व्याकरणात स्वर प्रक्रियेचा नियम नक्कीच होता. चन्द्रतंत्रात आठ अध्याय होते हे पुराव्यावरून स्पष्ट होते. वैदिक प्रयोगांमध्ये स्वरप्रक्रियेची विशेष गरज आहे. त्यामुळे चंद्राच्या व्याकरणातही वैदिक प्रक्रियेचा नियम असल्याचे दिसते. अशाप्रकारे चंद्र व्याकरणातील वैदिक आणि व्याकारिक विधायक सातवा आठवा अध्याय हे दोन अध्याय नष्ट झाल्याचे स्पष्ट होते.

विक्रमाच्या १२व्या शतकात, विद्यमान भाषाशास्त्रज्ञ पुरुषोत्तमदेव, पूर्वीच्या चंद्र व्याकरणाचे शेवटचे दोन अध्याय नष्ट झाले. त्यामुळे त्या काळातील व्याकरणकारांनी चंद्र व्याकरणालाच लौकीक शब्दानुशासन मानली. म्हणूनच पुरुषोत्तमदेव भाषाशास्त्राच्या ''चंद्रगोमी भाषासूत्रकारो यदो वेति सूत्रितवान' या मजकुरात, चंद्रगोमीला भाषासूत्रकार म्हणून लिहिले आहे.

## इतर ग्रंथ

१. चंद्रवृत्ति–ता–इमचे वर्णन अयोग्य होईल.

२. धातुपाठ

4. उणादिसूत्र

3. गणपाठ

५. लिंगानुशासन

6. उपसर्ग –यामध्ये 20 उपसर्गांचे अर्थ आणि उदाहरणे आहेत. हे फक्त तिबेटी भाषेत आढळते.

७. शिक्षासूत्र–यामध्ये वर्णोच्चारण शिक्षा संबंधित ४८ सूत्र आहेत.

8. कोष – चंद्रगोमीचे कोष ग्रंथ ही आहे

9. डॉ. वेल्वाकर यांनी चंद्रगोमीने रचलेल्या 'शिष्यलेखा' या धार्मिक काव्याचा 'लोकानंद' नाटकाचाही उल्लेख केला आहे.

10. चान्द्रवृत्ति– निश्चितच अनेक विद्वानांनी चंद्रसूत्रावर वृत्तिग्रंथ रचले असतील, परंतु ते अप्राप्य आहेत. सध्या जर्मन देशात रोमन अक्षरात छापलेली एकच प्रिंट उपलब्ध आहे.'

# पंडितराज जगन्नाथ

**प्रा. गायकवाड पी. बी.**

झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे

'वाक्यं रसात्मकं काव्यम्' अशी काव्याची रस प्रधान व्याख्या करत आचार्य मम्मट इत्यादि ध्वनिवादी काव्यशास्त्रकारांच्या विचारांच्या पुढचे पाऊल ज्यांनी टाकले अशा विद्वान पंडितरज जगन्नाथांनी 'मनोरमाकुचमर्दनम्' व 'शब्दकौस्तुभशाणोत्तेजनम्' हे व्याकरणावरील ग्रंथ व 'चित्रमीमांसाखण्डम्', 'काव्यप्रकाशटीका' व 'रसगंगाधर' हे काव्यशस्त्रावरील ग्रंथ लिहून तत्कालिन विद्वानांना आपले सामर्थ्य द◌ाखवले. संस्कृत साहित्यातील या महान ध्रुवतार्याला समकालीन विद्वानांच्या अनास्थेला सामोरे जावे लागले.

महान कविंच्या भोवती दंतकथांचे पसरलेले वलय संस्कृत भाषेच्या अभ्यासकाला नवीन नाही. पंडितराज जगन्नाथही त्याला अपवाद नाहीत. पंडितराज जगन्नाथांच्या बाबतीत अनेक दंतकथा प्रचलित झालेल्या आहेत. त्यातील लवंगी नामक राजकन्येवरील प्रेमाशी संबंधित एक दंतकथा अशी आहे. -

पंडितराज जगन्नाथ हा अत्यंत देखणा पुरुष आहे अशी गोष्ट जयपुराधिपति भानुदास यांच्या भानुमती नांवाच्या बहिणीची मुलगी लवंगी हिच्या कानी गेली व त्याच्या बुद्धीचा व सौंदर्याचा अभिनव चमत्कार वाटून ती त्याच्यावर फार लुब्ध झाली. आपल्या महालांत बसून त्याच्याकडे पहात बसे. तीही पंडितराज जगन्नाथांप्रमाणेच अत्यंत रूपवती, गुणवती व विदुषी होती. पंडितराज जगन्नाथांसोबत लग्न करण्याचा आपला निश्चय झाला आहे असें एकदा तिने आपल्या आईला कळविलें.

जयपुराहून दिल्लीस आल्यावर जेव्हा अकबराची प्रथम भेट झाली तेव्हां पंडितराज जगन्नाथांनी एक चटकदार श्लोक तत्काल अनुष्टुप् छंदांत रचून बादशहास सुप्रसन्न केले, तो श्लोक असा:- "जयत्यकबरः पृथ्वीपतिरूर्जितविक्रमः।येनारातिवधूवर्गः सर्वोऽप्यकबरीकृतः ॥"

"प्रचंड पराक्रमी अशा पृथ्वीपती अकबराचा जयजयकार असो. ह्या अकबराने शत्रुस्त्रियांचा सगळा समूह देखील अकबर ( कशपाशरहित ) केला आहे (सर्व शत्रूचा नाश करून त्याने त्यांच्या स्त्रियांस वैधव्य दीक्षा दिली आहे असा भावार्थ)".

एकदा पंडितराज जगन्नाथ व अकबर बादशहा बुद्धिबळ खेळत असता बादशहास तहान लागली तेव्हा राजकन्या लवंगी तांबडे वस्त्र परिधान करून व स्वजात्यनुरूप एक सुवर्णकलश मस्तफावर घेऊन आली. राजाने पाणी पिल्यानंतर ती पुनः पूर्वीप्रमाणेच मस्तकावर कलश. ठेवून जाऊ लागली. तेव्हां बादशहाने पंडितराज जगन्नाथांना थट्टेने म्हटले की, "तुम्ही शीघ्र कवी आहात तर मग या माझ्या मुलीचे यथार्थ वर्णन करा." यांकडे ही आज्ञा होतांच पंडितराज जगन्नाथांनी पुटील श्लोक म्हटला - 'इयं सुस्तनी मस्तकन्यस्तकुम्भा कुसुम्भारुणं चारु चेलं दधाना। समस्तस्य लोकस्य चेतः प्रवृत्तिम् गृहीत्वा घटे स्थापयातीव भाति॥ 'कुसुम्भा (करडई) प्रमाणे गर्द तांबडे सुंदर वस्त्र परिधान केलेली व मस्तकावर घट घेऊन जाणारी ही सुंदरी सर्व लोकांच्या मनोवृत्ती ग्रहण करून व त्या सर्व मनोवृत्तींना ह्या घटांत ठेवून जणूं चालली आहे असे वाटते."

(ह्या श्लोकांत जगन्नाथ पंडितांनी सुस्तनी या एका शब्दाने तिच्या सौंदर्याचे वर्णन केले. मस्तकन्यस्तकुम्भा ह्या पदाने मुसलमान लोकांच्या स्त्रियांची पाणी नेण्याची पद्धत सूचवली आहे. पुढील पदांनी त्याच समाजातील अत्यंत गर्द रंगाचे विशेषतः रक्त वर्णाचे कपडे वापरण्याची चाल दाखविली आहे. कोणीही सुंदरी रस्त्याने जाऊ लागली असतां

लोकांच्या ज्या मनोवृत्ती होतात, त्यांस जाता जाता एक फटकारा मारलेला आहे व त्याच मनोवृत्ती कशा तटस्थ होतात हे दाखविण्याकरितां त्या मनोवृत्तींना खेचून घटांत भरून जणूं चालली आहे असे सुंदर रुपक केलेले आहे.)

हा श्लोक ऐकून पंडितरायांच्या शीघ्र कवित्वाबद्दल व यथार्थ वर्णन करण्याच्या चातुर्याने बादशहा अत्यंत खूष झाला व त्याने पंडितराज जगन्नाथांना इच्छेस येईल ते मागण्यास सांगीतले. तेव्हा पंडितराज जगन्नाथ भलतीच काही मागणी करतात की काय ? या भीतीने लवंगीने मागे वळून आपली स्वतःची मागणी करण्यास पंडितरायांस खुणविले. त्याबरोबर पंडितरायांनी पुढील श्लोक रचून लवंगीची मागणी केली.

'यवनी रमणी विपदः शमनी कमनीयतमा नवनीतसमा।' उहिऊहियचोऽमृतपूर्णमुखी स सुखी जगतीह यदङ्कगता॥ यवनी नवनीतकोमलांगी शयनीये यदि लभ्यते कथंचित् ।

अपनीतलमेव साधु मन्ये न पनी माघवनी विलासहेतुः ।। ५ ॥ - न याचे गजालिं न वा वाजिराजि न वित्तेषु चित्तं मदीयं कदाचित् । इयं सुस्तनी मस्तकन्यस्तकुम्भा लवंगी फुरंगीरगंगीकरोतु ॥ ६ ॥'

"अतिशय सुंदर व नवनीताप्रमाणे कोमल अशी यावनी स्त्री तर्कयुक्त वचनामृताने पूर्णमुख असलेली ज्याच्या अंकांचा आश्रय करील तो या जगांत सुखीच समजावा."

नवनीताप्रमाणे कोमलांग असलेली ही यवनी (तुझी कन्या) जर कदाचित् मला प्राप्त झाली तर इन्द्राच्या नन्दनवनापेक्षां ह्या भूलोकीचेच सुख मी विशेष मानीन."

'हे राजा, तुझ्या ह्या गजसमुदायाची अगर अश्वसमुदायाची याचना मी करीत नाही. माझे मन द्रव्याच्या ठायीं नाहींच नाही; परंतु

मस्तकावर घडा घेऊन चाललेली ही हरिणाक्षी तुझी कन्या लवंगी माझा अंगीकार करो, एवंढेच मागणे आहे"

पंडितरायांची अशी मागणी होईल ही कल्पनाच नसल्यामुळे बांदशहा मनांत अत्यंत खिन्न झाला. परंतु वचन गेल्यामुळे कुंठितमती होऊन 'आमच्या बरोबर जेवन कताल तर मुलगी देऊ' असे पंडितराज जगन्नाथास सांगीतले, त्यावर आपलें ब्राह्मण्य नष्ट झाले तरी चालेल, पण राजकन्या

आपणांस मिळत आहे. असा विचार करून पंडितराज जगन्नाथांनी ती गोष्ट कबूल केली. भानुमती राणीच्या मनातून आपल्या कन्येचें लग्न पंडितराज जगन्नाथांशी होऊ नये असे होते, परंतु मुलीची इच्छा पूर्ण न केल्यास ती प्राणत्याग करील असे जाणून एके दिवशी बादशहाची मर्जी पाहून ती गोष्ट तिने बादशहाला सांगीतली. तोच बादशहाने स्वतःच ही गोष्ट राणीस कळविली. नंतर पंडितरायांचा लवंगीबरोबर विवाह मोठ्या थाटाने बादशहानेच लावून दिला. तिच्यावर अनेक प्रसंग आले. शेवटी यातून बाहेर येऊन, चांगल्या रीतीने एकत्र राहूं लागले.

अबुल फझलच्या संमतीने त्यांस एक बंगला देण्यात आला. अशाप्रकारे अनेक वर्षे लोटल्यावर पंडितरायांस वैराग्य उत्पन्न झाले व यवनीसह काशीस येऊन राहिले. तेव्हां तेथील विद्वान लोकांकडून बहिष्कृत व्हावे लागले.

**पदवी –**

शहाजहान बादशहापासून पंडितराज व पंडितराजराज तिलक अशी उपपदे मिळाली असे पंडितरायांनी स्वतःच लिहून ठेवलेले सांपडते. “मूर्तिमतेव नबाबासफखानस्य प्रसादेन द्विजकुलसंवाहवाकिवाङ्मनःकायेन माथुरकुलसमुद्रेन्दुना रायमुकुन्देनादिष्टेन सार्वभौमश्रीशहाजहांप्रसादाधिगत

-पंडितराज-पदवीविराजितेन तैलंगकुलावतंसेन पण्डितजगन्नाथेन आसफविलासाख्येयमाख्यायिका निरमीयत" आसफविलास-प्रस्तावना.

'भूमीनाथ शहाबुदीन भवतस्तुल्यो गुणानां गणैः एतद्भूतभवत्प्रपंचविषये नास्तीति किं महे। धाता नूतनकारणैर्यदि पुनः सृष्टिं नवां भावयेत् न स्यादेव तथापि तावकतुलालेशं दधानो नरः ॥ १९॥

**पंडित जगन्नाथांचे जीवन चरित्र : -**

पंडितराज जगन्नाथांच्या वडीलाचे नाव पेरू अथवा पेरमभट्ट आणि आईचे नाव लक्ष्मी होते. 'श्रीसार्वभौमश्रीशाहजहाँनप्रसादादधिगतपण्डितराजपदवीविराजितेन तैलङ्गकुलावतंसेन पण्डितराजजगन्नाथेनासफविलासाख्येयमाख्यायिका निरमीयत ।' आसफविलास नामक ग्रन्थात आलेल्या या उल्लेखावरून ते जन्माने तेलंग ब्राह्मण होते.

प्राणाभरण तथा जगदाभरण ग्रंथात आपल्या वडीलांबद्दल ते लिहितात की, 'तैलङ्गान्वयमङ्गलालयमहालक्ष्मीदयालालितः श्रीमत्पेरमभट्टसूनुरनिशं ... विद्वल्ललाटन्तपः । सन्तुष्टः कमताधिपस्य कवितामाकर्ण्य तद्वर्णनं श्रीमत्पण्डितराजपण्डितजगन्नाथो व्यधासीदिदम् ॥ तैलङ्गान्वयमङ्गलाल-यमहालक्ष्मीदयालालितः श्रीमत्पेरमभट्टसूरितनयो विद्वल्ललाटन्तपः । श्रीराणाकलिक-र्णनन्दनजगत्सिहप्रभोवर्णनं । श्रीमत्पण्डितरायसत्कविजगन्नाथो व्यतानीदिदम् ॥'

तसेच रसगङ्गाधर ग्रंथात पिता पेरुभट्ट यांना वंदन करताना म्हणतात की, - 'पाषाणादपि पीयूषं स्यन्दते यस्य लीलया। - तं वन्दे पेरुभट्टाख्यं लक्ष्मीकान्तम्महागुरुम् ।।'

यावरून त्याचे वडील प्रकांड पंडित होते. आपल्या वडिलांजवळच पंडितराजांनी शास्त्राध्ययन केले होते असे मनोरमाकुचमर्दनम् नामक ग्रंथात त्यांनी आपले गुरू पंडित वीरेश्वर असल्याचे सांगितले आहे.

श्री.ल.रा.वैद्य यांच्या मते पंडितराज जहंगिराच्या दरबारात होते. त्यांच्यावर सरस्वती व लक्ष्मी यांची कृपा होती. त्यांनी उत्तरायुष्यात मथुरेत राहून हरिचण-सेवा केली होती.

**पंडित जगन्नाथांचा काळ :**

पंडितराज शहाजहान बादशाहाकडे आश्रयास होते. इ.स. १६२७ - १६५८ हा कालखंड शहाजहानचा मानला जातो. तसेच त्याचे वडील जहांगीर यांचा इ.स. १६०५ - १६२७ हा कालखंड मानला जातो. या दोघांशिवाय पंडितराजांचे संबंध शहाजहानचा समकालीन जयसिंहाबरोबरही होते. यावरून पंडितराज इ.स.च्या १६ व्या शतकाच्या उत्तरार्धात अथवा १७ व्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेले, असे मानले जाते. पंडितराजांव्यतिरिक्त अनेक जगन्नाथ संस्कृत साहित्यात होऊन गेले आहेत.

**जगन्नाथांचे समकालीन विद्वान –**

नागेश भट्टांचा गुरु हरी दीक्षित यांनी जगन्नाथांस आव्हान दिले होते. हरी दीक्षितांचा काल इ. स. १७५० असावा या डॉ. किला नच्या मतावरून कै. वैद्य म्हणतात की हरी दीक्षित व पंडितराज जगन्नाथ हे समकालीन नसावेत. परंतु कै. पंडित दुर्गाप्रसाद यांनी नागेशभट्टांचा काळ सुमारे इ. स. १७०६ असावा असे रसगंगाधरच्या प्रस्तावनेत प्रतिपादन केले आहे. त्यांनी तेथे दिलेल्या कोष्टकावरून व प्रो. गोडे यांनीही संमत असलेल्या त्याच कोष्टकावरून पंडितराज जगन्नाथ व हरी दीक्षित हे समकालीन असावे असे ठरते. ते कोष्टक येथे दिले आहे.

**शेषश्रीकृष्णः**

| | |
|---|---|
| भट्टोजिदीक्षितः ( शिष्यः ) | शेषवीरेश्वरः (पुत्रः) |
| वीरेश्वरदीक्षितः ( पुत्रः) | पंडितजगन्नाथः (शिष्यः) |
| हरी दीक्षिता (पुत्रः) | माधवः (पुत्रः) |

नागेशंभट्टः (शिष्यः) महादेवः (पुत्रः)

(पंडितरायांचा पुत्र माधव व नातु महादेव होता ही माहिती प्रो. गोड ह्यांच्या निबंधावरून घेतलेली आहे ).

**पंडितराज जगन्नाथांच्या ग्रंथ कृती -**

पंडितराज जगन्नाथांचा त्यांच्या विद्वत्तेबद्दलचा अभिमान निराधार नाही, त्यांची भाषा प्रसादयुक्त असून त्यांत रस व अलंकार मिसळण्याची शैली अपूर्व आहे. काव्यरस मोठया काव्यांत भरणे सोपे असते परंतु तो लहान काव्यांत विशेषतः तर एकेक श्लोकांत भरणे फार चातुर्याचे असते हे पंडितराज जगन्नाथांच्या काव्यावरून सिद्ध होते. फारशी भाषा त्यांस चांगली येत असल्यामुळे त्यांनी संस्कृत व फारशी भाषा ह्या उभयतांत अनेक मिश्र श्लोक लिहून आपले श्रेष्ठत्व स्थापिलेले आहे. पंडितराज जगन्नाथांच्या ग्रंथकृती पुढील प्रमाणे आहेत.

पंडितराज जगन्नाथ यांनी लहान मोठी एकवीस काव्ये आहेत. त्यांचे साधारणतः पुढील विभाग पडतात.

I) काव्यग्रंथ:-

अ) लहरी ( स्तोत्र)

1. गंगालहरी (पीयूषलहरी)
2. अमृतलहरी
3. सुधालहरी
4. करुणालहरी
5. लक्ष्मीलहरी
6. विष्णुलहरी

ब) विलास (२).

1. भामिनीविलास (पद्य)
2. आसफविलास (गद्य )

क) आभरण

1. प्राणाभरणम्

2. जगदाभरणम्

(II) अलंकार ग्रंथ

1. चित्रमीमांसाखंडनम्

2. काव्यप्रकाशटीका

3. रसगंगाधर

III) व्याकरण चर्चा

1. मनोरमाकुचमर्दनः

2.शब्दकौस्तुभशाणोत्तेजनम्

(IV) विविध

1. चम्पू- यमुनावर्णनचम्पू

2. नाटकम्- रतिमन्मथनाटकम्, वसुमतीपरिणयः - पंचचामर वृत्तांतील मिश्रलोक वगैरे..

3. शशिसेना

**III) व्याकरण चर्चा -**

वरील विविध विषयाशी संबंधित ग्रंथ रचनेवरून पंडितराज जगन्नाथांची विद्वत्ता सर्वस्पर्शी होती हे स्पष्ट होते. भट्टोजिदीक्षितांनी श्रीकृष्णशेषांजवळ महाभाष्यान्त व्याकरण शास्त्राचे अध्ययन केले होते. महाभाष्याचे काळजीपूर्वक स्वतंत्र अध्ययन केल्यावर यांना असे दिसून आले की काशिका, पदमंजरी, प्रक्रियाकौमुदी व प्रक्रिया कौमुदीवरील प्रसाद व प्रकाश या टीकांमध्ये कित्येक ठिकाणी केलेली विधाने व्याख्याने भाष्यविरुद्ध आहेत. भट्टोजी दीक्षितांचे वेळी वरील ग्रंथांचे पठनपाठन सुरू होते. ह्या ग्रंथांत केलेली कित्येक चूक विधाने दुरुस्त करण्याच्या हेतूने व व्याकरणशास्त्र अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांना महाभाष्यावरून निष्पन्न होणाऱ्या सिद्धांतांचा तात्त्विक बोध व्हावा या सदिच्छेने भट्टोजी दीक्षितांनी आपला सिद्धान्तकौमुदी हा ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथाच्या

प्रसिद्धीमुळे वर दिलेले ग्रंथ हळू हळू मागे पडत चालले व सिद्धांतकीमुदीचेंच पठन सर्वत्र सुरू झाले. सिद्धान्तकौमदीत केलेले व्याख्यान व तीत सांगितलेले सिद्धान्त बरोबर आहेत व त्यांविरुद्ध पूर्ववैयाकरणांनी केलेले व्याख्यान व दिलेले सिद्धान्त चूक आहेत, हे सिद्ध करण्याच्या हेतूनेच मट्टोजिदीक्षितांनी प्रौढमनोरमा नांवाची टीका स्वरचित सिद्धांतकौमदीवर लिहिली. श्रीकृष्ण शेषांच्या निधनानंतर त्यांनी शब्दकौस्तभ हा ग्रंथ लिहिला. त्यावेळी आपल्या स्वतःच्या गुरूने केलेली व त्या काळी प्रमाणभूत मानली जाणारी अनेक विधाने खोडून टाकण्याचे कटु कर्तव्य त्यांना करावे लागले. केवळ आपल्या गरूच्या मताचे केवळ खंडन केले नाही तर काशिका, माधवीयधातवृत्ति, प्रक्रियाकौमुदी व प्रसाद इत्यादि अनेक व्याकरण ग्रंथात जी भाष्यविरुद्ध भ्रामक विधाने आहेत त्या सर्वांचे खंडन भट्टोजी दीक्षितांनी केले. हे खंडन फरताना त्यांनी कोणासही वगळले नाही व भागवतावरील प्रसिद्ध पूज्य टीकाकार श्रीधरस्वामी याच्याही व्याकरणविषयक चूक दाखविण्यांत कसर केली नाही. नागोजीभट्टांनी सुद्धा विद्यार्थ्यांना तात्त्विक सिद्धांतांचा बोध व्हावा या हेतूनेच आपल्या शब्दरत्न ह्या ग्रंथांत भट्टोजींच्या मतांचे खंडन केले. या वरून नागेशभट्ट जसे दीक्षितांचे द्रोही ठरत नाहीत त्याचप्रमाणे भट्टोजीही गुरुद्रोही ठरत नाहीत. प्रौढमनोरमा हा ग्रंथ श्रीकृष्णशेषांच्या मृत्युनंतर लिहिला गेला व त्यांत ठिकठिकाणी आपल्या गुरूच्या मतांचं खंडन केल्यामुळे श्रीकृष्णशेषांच्या वंशबांना व त्यांच्या शिष्यपरंपरेतील पंडिताना भट्टोजींचा फार राग आला व त्यांपैकी काही जणांनी मनोरमेवर विरुद्ध टीका लिहिण्यास सुरवात केली. अशा टीका भट्टोजींच्या हयातीत झाल्या असत्या तर त्यांना समर्पक उत्तरही भट्टोजीनी दिलें असते. श्रीकृष्णशेषांचा पुत्र शेषवीरेश्वर हा जगन्नाथपंडितांचा गुरु होता. व त्याचा पुत्र चक्रपाणि ह्याने प्रथम मनोरमेचे खंडन करणारा ग्रंथ लिहिला. कारण मट्टोजींनी

श्रीकृष्णशेषांच्या प्रकाशाचे खंडन केलेले होते. भट्टोजीनी याला स्वजातीय तैलंग प्रसिद्ध विद्वान् श्रीकृष्णशेष यास सोडून दूर प्रातांत राहणाऱ्या अप्पय्य दीक्षित ह्या विजातीय ब्राह्मणाचे शिष्यत्व स्वीकारले. या रागाने व आपल्या गुरूंच्या मतांचे खंडन केले. यामुळे पंडितराज जगन्नाथांनी मनोरमेवर मनोरमाकचमर्दनम् नांवाचा ग्रंथ लिहिला. त्याच्या आरंभ - 'लक्ष्मीकान्तप-दाम्भोज प्रणम्य श्रेयसां पदम् । पंडितेन्द्रो जगन्नाथः स्यति गर्व गुरुद्रुहाम् ॥ २७ ॥

असे मंगलाचरण करून पुर्दे असे म्हटले आहे. 'इह फेचित् निखिल विदन्मुकुटमयूखमालालालितचरणकमलानां शेषवंशावतंसान श्रीकृष्णपाण्डसाना चिरादचितयोः पादुकयोः प्रसादात् आसादितशब्दानुशासनाः सेषु च पारमेश्वरं पदं प्रयातेषु कलिकालवशंवदीभवन्तः तत्रभवद्भिल्लासित प्रक्रियाप्रकाशमाशयानवबोधनिबन्धनैः दूषणैः स्वयंनिर्मितायो मनोरमायामाकुल्यकार्पः । सा च प्रक्रियाप्रकाशकृता पौत्रैः अखिलशास्त्रमहार्णवमंथाचलाय. मानमानसाना अस्मद्गुरुपंडितवीरेश्वराणां तनयः दूषितापि स्वमतपरीक्षार्थे पुनर. स्माभिनिरीक्ष्यते"

मनोरमाकुचमर्दने, एवढें करूनही पंडितराज जगन्नाथांचा क्रोध नाहीसा झाला नाही. त्यांनी पुढे लवकरच भट्टोजिदीक्षितांच्या शब्दकौस्तुभावर शब्दकौस्तुभशाणोत्तेजन नावाचा ग्रंथ लिहिला व त्या ग्रंथात त्यांनी भट्टोजींबद्दल 'अप्पय्य ग्रंडविचेतितचेतनानामाहामयम शमयेऽवलेपान् ' असे उद्गार काढले.

पंडितराज जगन्नाथांनी अप्पय्य दीक्षितांच्या कुवलयानंद ग्रंथावर टीकास्त्र उचलेले असल्याचे वृत्त पूर्वी आलेलेच आहे. भट्टोजि दीक्षितांप्रमाणेच अप्पय्य दीक्षितांवर रसगंगाघरांत चित्रमीमांसेचे खण्डन

करताना 'द्राविडशिशुः प्रलपति' 'अप्पय्यदीक्षितदवानलदग्धशेषं साहित्यमंकुरयते सरसैनिबन्धैः " इत्यादि अयोग्य शिव्यांचा वर्षाव केलेला आहे. अशा रीतीने अप्पय्य दीक्षितांवर ताशेरा अोढून मोठया प्रौढीने आत्मप्रशंसा केलेली आहे.

नागेशभट्टांनी रसगंगाघरावर मर्मप्रकाश नांवाची टीका लिहिलेली आहे. त्या टीकेच्या आरंभी 'नत्वा गंगाधरं मर्मप्रकाशं तनुते गुरुम् ' (रसगं. प्र.) (गंगाधर गुरुजींना वंदन करून हा मी मर्मप्रकाशनांवाची टीका लिहीत आहे. अथवा 'गंगाधरं (शिव) नत्वा गुरु मर्मप्रकाशं तनुते' असा अन्वय केल्यास शिवाला वंदन करून हा नागेश मर्मप्रकाश नांवाची मोठी टीका लिहीत आहे) असे वर्णन आढळते. सुभाषित हारावलीच्या एका हस्तलिखितात पंडितराज जगन्नाथ यांचे दोन श्लोक आढळतात.

'वितण्डाहेत्यायैरति विततवाक्यैरपि नृभिः न जेयोऽसौ विद्वज्जनसदसि गंगाधरबुधः ॥२८॥ या सारख्या उच्चारलेल्या वाक्यांनीं वितण्डवाद करणा-या लोकांकडून या विद्वानांच्या सभेमध्ये ही जिंकले जाणे शक्य नाही - उरस्यस्य भ्रश्यत्कबरभरनियमनसः पतन्ति स्वर्नालाः स्मरपरवशाः दीनमनसः । सुरास्तं गायन्ति स्फुरिततनुगंगाधरमुखाः तवाऽयं दृक्पातः यदुपरि कृपातो विलसति ॥ २९॥

**१. मनोरमाकुचमर्दनम्**

मट्टोजी दीक्षितांनी महाभाष्यावरून निष्पन्न होणान्या सिद्धांतांचा तात्विक घ विद्यार्थ्यांना सहाय्यक व्हावा या हेतूने सिद्धान्तकौमुदी ग्रंथ लिहिला. सेद्धांतकौमुदीत केलेले व्याख्यान व त्यात सांगितलेले सिद्धांत बरोबर असून यांविरुद्ध पूर्ववैयाकरणांनी केलेले व्याख्यान व दिलेले सिद्धांत चूक आहेत असे

दाखविण्याच्या इच्छेनेंच भट्टोजीदिक्षितांनी प्रौढमनोरमा नांवाचा ग्रंथ लिहिला. याचे खंडन करण्याकरिता पंडितराज जगन्नाथांनी हा ग्रंथ

लिहिला असे पूर्वी दाखविलेले आहे. हा संपूर्ण ग्रंथ अद्ययावत् उपलब्ध नाही. याचा काही थोडासा भाग काशी सीरिजमध्ये सिद्धान्तकौमुदी व प्रौढमनोरमा ह्या ग्रंथांमध्ये छापलेला आहे. हा ग्रंथ संपूर्ण तरी आहे की नाही हीच शंका आहे. या ग्रंथाचे नाव मनोरमाकुचमर्दनम् असे आहे.

**२. शब्दकौस्तुभशाणोत्तेजनम्**

भट्टोजी दीक्षितांच्या शब्दकौस्तुभ ग्रंथावरील खंडनासत्मक ग्रंथ आहे असे वर स्पष्ट केले आहे. दुर्देवाने म्हणा की विद्वानांच्या अनस्थेने म्हणा आजही हा ग्रंथ हस्तलिखित स्वरूपातच आहे.

# संपादकाचा परिचय

| | |
|---|---|
| **नाव** – डॉ.. प्रशांत बाबुराव बिरादार<br>**शिक्षण** – एम.ए.(संस्कृत), बी.एड.,सेट. ,पीएच.डी<br>**पद** – सरस्कृत विभागप्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपरू<br>**निवड** – अध्यक्ष, संस्कृत अभ्यास मंडळ, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड<br>**संशोधन** – राष्ट्रीय आन्तर्राष्ट्रीय पत्रिकामध्ये जवळपास 30 लेख प्रकाशित<br>**संपर्क** – मो. 9764120822<br>**ई मेल** – **biradarsir22@gmail.com** | 1. स्वाध्याय परिवार व संस्कृतीचे पुनरूज्जीवन<br>2. लघुसिद्धान्तकौमैमुदुदी (निवडक व्याकरण)<br>3. संस्कृत नाटके<br>4. देवांना कन्या का नव्हत्या?<br>5. काव्यप्रकाश व काव्यशास्त्रकार<br>6. काव्यालंकार<br>7. पांडुरंगशास्त्री आठवलेंचे गीतायोगदान |

# लेखकांचा परिचय

| | | |
|---|---|---|
| 1 | प्रा. राजेन्द्र प्रसाद किशनराव आर्य | संस्कृत विभागप्रमुख,<br>राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) लातूर. |
| 2 | प्रा. पेठकर गणेश कुमार सोपानराव | संस्कृत विभाग प्रमुख,<br>संजीवनी महाविद्यालय चापोली ता. चाकूर जि. लातूर |
| 3 | डॉ. शशिकान्त बसवेश्वर दरगु | संस्कृत विभाग प्रमुख ,<br>नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय नांदेड.<br>०९४०५७७३१३४ |
| 4 | प्रा. शंकर धारबा घाडगे | संस्कृत विभाग<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,<br>महाविद्यालय राणीसावरगाव<br>ता.गंगाखेड जि.परभणी भ्रमणध्वनी<br>क्र.९७६५६६१३७२ |

| | | |
|---|---|---|
| 5 | प्रा. अभय सखाराम पाटील | संस्कृत विभाग प्रमुख, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव मो. न. 9423438438 |
| 6 | डॉ. अखिलेश शर्मा | संस्कृत विभाग, मूलजी जेठा महाविद्यालय जलगांव दूरभाष -9422968508 |
| 7 | प्रा. डॉ. अरुण चव्हाण | कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वैजनाथ जिल्हा-बीड |
| 8 | प्रा. रमेश रामलिंगी स्वामी | संस्कृत विभाग, राजर्षी शाहू महविद्यालय लातूर |
| 9 | प्रा.डॉ. गनंजय कहाळेकर | महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अहमदपरू |
| 10 | श्रीमती कांबळे बकुल भगवानराव | संजीवनी महाविद्यालय चापोली ता. चाकुर जि. लातुर मो. नं. 9960639306 |
| 11 | प्रा. डॉ. संजिवनी नेरकर | संस्कृत विभाग प्रमुख वै. धुंडा महाराज देगलुरकर, महाविद्यालय, देगलूर |
| 12 | प्रा. सौ. ज्योती मामडगे | संस्कृत विभाग प्रमुख,सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूर |

[i] आचार्य नन्दिकेश्वर और उनका नाठ्य साहित्य, डॉं पारसनाथ द्विवेदी, संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी.१९८९

[ii] भरतार्णव १३७, ६३८, ७०५, ७६४ तथा नन्दिकेश्वरकाशिका उपमन्युकृत टीका, पृ.०१

[iii] भरतार्णव ६६६, ७६५, ८८९, ९७४

[iv] भरतार्णव १९३, ७७१, ९२३ तथा नन्दिकेश्वरकाशिका उपमन्युकृत टीका, पृ.०१

[v] लिंगपूराण पूर्वार्ध्र अध्याय ४२-४४ तसेच कूर्मपूराण उत्तरार्ध अध्याय ४३, हरिवंश पुराण १८२।८६ व वाराहपूराण

[vi] Ibid

[vii] नाठ्यशास्त्र, चौखम्बा प्रकाशन, वाराणसी,३।३, ३।३१

[viii] लिंगपूराण पूर्वार्ध्र अध्याय ४२-४४ तसेच कूर्मपूराण उत्तरार्ध अध्याय ४३, हरिवंश पुराण १८२।८६ व वाराहपूराण

[ix] भरतार्णव ६६०, ७७४, ७८६

[x] बृहद्देशी (मतङ्ग) पृ.३२, काव्यमीमांसा (राजशेखर) १।१ संगीतरत्नाकर (शाङ्र्गदेव) १।१७

[xi] अभिनयदर्पण ४-५ तसेच नाठ्यशास्त्र ४ अध्याय.

[xii] आचार्य नन्दिकेश्वर और उनका नाठ्य साहित्य, डॉं पारसनाथ द्विवेदी, संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी.१९८९ अध्याय१. पृ. २२

[xiii] Ibid पृ.२९

[xiv] https://hi.wikipedia.org/wiki/नन्दिकेश्वरकाशिका

[xv] नन्दिकेश्वरकाशिका, पृ.०१

[xvi] https://hi.wikipedia.org/wiki/नन्दिकेश्वरकाशिका